# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## २०१०-२०११ चा सहावा वार्षिक अहवाल

### अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| १. | कंपनीच्या संचालकांची नावे | १ |
| २. | संचालकांचा अहवाल | ३ |
| ३. | पुरवणी तक्ता (अ) लेखा परिक्षकांचा अहवाल व दिलेली उत्तरे | १० |
| ४. | लेखा नियंत्रक व भारताचे महालेखा परिक्षक यांचे अभिप्राय व त्यास दिलेली उत्तरे | १८ |
| ५. | लेखा परिक्षकांचा अहवाल | ३७ |
| ६. | ताळेबंद | ४२ |
| ७. | नफा-तोटा विवरण पत्रक | ४३ |
| ८. | ताळेबंदांतर्गत येणाऱ्या अनुसूची | ४४ |
| ९. | समभाग भांडवल | ४४ |
| १०. | राखीव आणि अधिक्य | ४४ |
| ११. | सुरक्षित कर्जे | ४४ |
| १२. | असुरक्षित कर्जे | ४४ |
| १३. | स्थिर मत्ता | ४५ |
| १४. | प्रगतीपथावरील भांडवली कामे | ४६ |
| १५. | गुंतवणूकी | ४६ |
| १६. | भांडार साठा | ४६ |
| १७. | किरकोळ ऋणको | ४६ |
| १८. | रोकड आणि बँकेतील शिलकी | ४६ |
| १९. | कर्जे आणि अग्रीमे | ४७ |

| अ.क्र. | तपशिल | पान क्र. |
|---|---|---|
| २०. | चालु दायित्वे ........ | ४७ |
| २१. | तरतुदी ........ | ४७ |
| २२. | संकीर्ण खर्च ........ | ४७ |
| २३. | नफा-तोटा विवरणपत्रांतर्गत अनुसूची ........ | ४८ |
| २४. | संचालनापासून महसूल ........ | ४८ |
| २५. | इतर उत्पन्ने ........ | ४८ |
| २६. | संचालनासाठी खर्च ........ | ४८ |
| २७. | कर्मचाऱ्यांवरील खर्च ........ | ४८ |
| २८. | प्रशासनावरील खर्च ........ | ४९ |
| २९. | घसारा आणि इतर कर्ज फेडीची तरतूद ........ | ४९ |
| ३०. | व्याज व वित्तीय आकार ........ | ४९ |
| ३१. | गतकालीन बाबी (नक्त) ........ | ५० |
| ३२. | रोकड प्रवाह पत्रक ........ | ५१ |
| ३३. | लेखा टिप्पणी ........ | ५२ |
| ३४. | आर्थिक ताळेबंदाचा गोषवारा आणि कंपनीच्या सर्व साधारण व्यवसायाची रुपरेखा ........ | ७५ |

# संचालक मंडळ

| अ.क्र. | नाव |
|---|---|
| १. | श्री. अरविंद सिंह<br>अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक |
| २. | श्री. आर. एम. प्रेमकुमार<br>अध्यक्ष<br>(दि. ११-०६-२०१० पासून कार्यकाल समाप्त) |
| ३. | श्री. सुब्रत रथो<br>ऊर्जा सचिव<br>संचालक<br>(नियुक्ती दि. २२-०६-२०१० पासून दि. ०२-०८-२०११ पर्यंत) |
| ४. | श्री. सिताराम कुंटे<br>ऊर्जा सचिव<br>संचालक<br>(नियुक्ती दि. ०३-०८-२०११ पासून दि. १७-११-२०११ पर्यंत) |
| ५. | श्री. विद्याधर कानडे<br>ऊर्जा सचिव<br>संचालक<br>(नियुक्ती दि. १७-११-२०११ पासून) |
| ६. | श्री. प्रमोद जी. खंडाळकर<br>संचालक (वित्त)<br>(दि. ०७-०५-२०१० रोजी कार्यकाल समाप्त) |
| ७. | श्री. डी.डी.वाव्हळ<br>संचालक (वित्त)<br>(नियुक्ती दि. ०७-०५-२०१० पासून दि. २५-०४-२०११ पर्यंत) |
| ८. | श्री. प्रताप जी. मोहिते<br>संचालक (वित्त)<br>(नियुक्ती दि. २५-०४-२०११ पासून) |
| ९. | श्री. उत्तम जी. झाल्टे<br>संचालक (प्रकल्प)<br>(नियुक्ती दि. ०५-०८-२०१० पासून) |
| १०. | श्री. डब्लू आर. अस्वार<br>संचालक (प्रकल्प)<br>(दि. ०३-०३-२०११ पासून कार्यकाल समाप्त) |

| अ.क्र. | नाव |
|---|---|
| ११. | श्री. ओमप्रकाश के येम्पाल<br>संचालक (प्रकल्प)<br>(नियुक्ती दि. ०६-०७-२०११ पासून) |
| १२. | श्री. अविनाश पाटील<br>स्वतंत्र संचालक<br>(दि. २५-०७-२०११ पासून कार्यकाल समाप्त) |
| १३. | डॉ. ज्योती अरोरा<br>कंपनी सचिव<br>(नियुक्ती दि. १८-०२-२०१० पासून) |

लेखा परिक्षक
**शहा ॲन्ड टापडिया**
सनदी लेखापाल

---

रजिस्टर्ड ऑफिस
प्रकाशगंगा, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

# संचालकांचा अहवाल

प्रती

सन्माननीय सभासद,

महाराष्ट्र राज्य पारेषण कंपनी मर्यादित या कंपनीने ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षात केलेल्या व्यवसाय व कार्य आणि त्यासोबत वर्षाचे लेखापरिक्षित केलेले विवरण पत्र कंपनीचे संचालक आनंदपूर्वक सादर करीत आहेत.

**वित्तीय निष्कर्ष**

दि.३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षातील कंपनीचे वित्तीय निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

| | ₹ कोटीत | |
|---|---|---|
| **तपशील** | **२०१०-११** | **२००९-१०** |
| व्यवसायापासून महसूल | २०९८ | १६०० |
| अधिक : इतर उत्पन्न | ५० | १०८ |
| **एकूण महसूल** | **२१४८** | **१७०८** |
| व्यवसाय खर्च | २८८ | ३०४ |
| कर्मचाऱ्यावरील खर्च | ५२९ | ३९४ |
| प्रशासकीय खर्च | १३७ | १०३ |
| व्याज व वित्तीय आकार | २८३ | २१० |
| **घसारा सोडून एकूण खर्च** | **१२३७** | **१०११** |
| **घसारा व करपूर्व नफा** | **९११** | **६९७** |
| घसारा आणि इतर कर्जफेडीची तरतूद | ३६८ | ३०० |
| **करपूर्व नफा** | **५४३** | **३९७** |
| कराची तरतूद (फ्रिंज बेनिफिट करासाठीची तरतूद समाविष्ट) | १०४ | ६४ |
| स्थगित कर | ८७ | ५९ |
| करोत्तर नफा | **३५२** | **२७४** |
| पूर्वकालीन बाबी (निव्वळ) | २३ | २९ |
| कर आणि समायोजना नंतरचा नफा | **३२९** | **२४५** |
| अधिक : मागील वर्षाचा शिल्लक नफा पुढे नेलेला | २१६ | ९ |
| वजा : खास राखीवसाठी अंशदान | - | १३ |
| वजा : आकस्मिक राखीवसाठी अंशदान | २६ | २५ |
| शिल्लक नफा पुढे नेलेला | **५१९** | **२१६** |

**वित्तीय ठळक वैशिष्टये**

वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये महसूलात २६ टक्के वाढ झाली, मागील वर्षी २००९-१० मध्ये ₹ १७०८ कोटी महसूल होता. तो यावर्षी ₹ २१४८ कोटी झाला. ही वाढ प्रामुख्याने दर वाढवून मिळाल्यामुळे झाली. प्रतीवर्षी ₹ १२४.२७ कोटी चा दर सप्टेंबर

२०१० पासून म.वि.नि.आयोगाच्या दि. १० सप्टेंबर २०१० च्या आदेशानुसार ₹ १८८.६९ कोटी इतका झाला. याशिवाय इतर उत्पन्नात ₹ ५८ कोटीची घट होऊन ती ₹ १०८ कोटी वरुन ₹ ५० कोटी झाली.

वित्तीय वर्ष २०१०-११ करपूर्व नफा ₹ ५४३ कोटी झाला. वर्ष २००९-१० मध्ये तो ₹ ३९७ कोटी होता. वर्ष २०१०-११ चा करोत्तर नफा ₹ ३२९ कोटी झाला, मागील वर्ष २००९-१० मध्ये तो ₹ २४५ कोटी होता.

## भाग भांडवल

या वर्षात कंपनीचे अधिकृत भाग भांडवल वाढले ते ₹ ५ लाखावरुन ₹ ५,००० कोटी झाले.

## संयुक्त कारभार

महापारेषण कंपनीने जे एस डब्ल्यू एनर्जी सोबत केलेल्या जयगड पॉवर ट्रान्सको लिमिटेड (जे पी टी एल) या संयुक्त कंपनीने ४०० केव्ही क्षमतेच्या राज्यांतर्गत वीज पारेषण प्रकल्प महाराष्ट्रात कार्यान्वित केला.

या पारेषण यंत्रणेची वीज वाहून नेण्याची क्षमता सुमारे २५०० मेवॅ ते ३००० मेवॅ आहे. हा प्रकल्प दोन टप्यात स्थापित करण्यात आला आहे. गेल्या वर्षी जयगड-नवीन कोयना हा तारमार्ग पूर्ण झाला. त्याची लांबी ५५ कि.मी. आहे आणि सर्कीट लांबी ११० किमी आहे. यावर्षी नुकताच जयगड-कराड पारेषण तारमार्ग पूर्ण करण्यात आला आहे. त्याची लांबी ११० कि.मी. असून सर्कीट लांबी २२० कि.मी. आहे.

हा संयुक्त उपक्रम म्हणजे पारेषण क्षेत्रातील सार्वजनिक खाजगी सहभागाचे एकमेव उदाहरण आहे यात जे एस डब्ल्यू एनर्जी कंपनीकडे ७४ टक्के समभाग (इक्विटी) आहेत तर २६ टक्के महापारेषण कंपनीकडे आहेत. जे एस डब्ल्यू व महापारेषण यांनी वीज वहनाच्या क्षेत्रात मूलभूत काम केले आहे. त्याचा फायदा महाराष्ट्रातील भविष्यात निर्माण होणाऱ्या वीज प्रकल्पांना होईल. अशा प्रकारे वीज पारेषण यंत्रणेच्या विकासात मार्गदर्शक ठरणारी पायरी महापारेषण कंपनीने निर्माण केली आहे.

सदर ४०० केव्ही जयगड-नवीन कोयना पारेषण वाहिनी २४ महिन्यांपेक्षा कमी इतक्या विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आली तर ४०० केव्ही डबल सर्कीट जयगड-कराड पारेषण वाहिनी (Quad) ३९ पेक्षा कमी महिने या कालावधीत पूर्ण झाली.

या दोन्ही पारेषण वाहिन्यांमधून सध्या १२०० मेवॅ क्षमतेच्या जयगड औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील वीज महाराष्ट्राच्या वीज जाळयात (ग्रीड) पारेषित केली जाते आणि राज्यांतर्गत पारेषण यंत्रणा कार्यान्वित झाल्यावर सदर भाग महाराष्ट्र राज्याच्या अती उच्च व्होल्टता प्रणाली सोबत एकात्मिक रित्या काम करील. नवीन कोयना येथील निर्मिती स्थळ व कराड हे भार केंद्र दरम्यान विजेचे स्थलांतर वाढेल.

## लाभांश

महापारेषण कंपनीने वर्ष २०१०-११ रोजी कोणताही लाभांश जाहीर केला नाही. कारण विविध पायाभूत प्रकल्पाच्या कामासाठी ही रक्कम वापरली गेली आहे.

## मुदतीच्या ठेवी

कंपनीने कोणत्याही मुदतीच्या ठेवी स्वीकारलेल्या नाहीत म्हणून ताळेबंदाच्या तारखेला मुद्दल किंवा व्याज यासाठी कोणतीही रक्कम बाकी नव्हती. यामुळे बँक व वित्तीय कंपन्या व्यतिरिक्त कंपन्याकरीता (रिझर्व बँक) आदेश १९५६ अंतर्गत व कंपनी (ठेवी स्वीकारणे) नियमावली १९७५ अंतर्गत थकीत ठेवींच्या संदर्भात कोणतीही माहिती देण्याची आवश्यकता नाही.

## सूत्रधारी कंपनी

आपली कंपनी ही कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ४(१) (अ) आणि ४(२) यातील तरतूदींनुसार म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनीची एक उपकंपनी आहे.

## संचालक

### अ) रचना

**आपल्या कंपनीच्या संचालक मंडळाची सध्याची रचना खालील प्रमाणे आहे.**

- श्री. अरविंद सिंह (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक)
- श्री. विद्याधर कानडे (अतिरिक्त संचालक)
- श्री. उत्तम गोपीनाथराव झाल्टे (अतिरिक्त संचालक)
- श्री. प्रताप ग. मोहिते (अतिरिक्त संचालक)
- श्री. ओमप्रकाश के येम्पाल (अतिरिक्त संचालक)

### ब) वर्षभरातील बदल :-

**आपल्या कंपनीच्या संचालक मंडळात अहवाल वर्षात खालील प्रमाणे बदल झाले**

- श्री डी.डी. वाव्हळ, संचालक (वित्त), महावितरण यांनी संचालक (वित्त) महापारेषण या पदाची सूत्रे दि. ७ मे २०१० रोजी हाती घेतली होती. त्यांनी आपल्या पदाचा भार दि. २५ एप्रिल २०११ रोजी सोडला
- महाराष्ट्र शासनाच्या आदेश दि.२.८.२०११ नंतर श्री सुब्रत रथो हे कंपनीचे संचालक नाहीत.
- श्री सीताराम कुंटे हे महाराष्ट्र शासनाच्या आदेश दि.१६ नोव्हेंबर २०११ यानुसार दि.१७ नोव्हेंबर २०११ पासून कंपनीचे संचालक नाहीत.
- श्री अविनाश पाटील, स्वतंत्र संचालक, यांनी कंपनीच्या संचालक पदाचा राजीनामा दि.२५ जुलै २०११ रोजी दिला.
- नियुक्तीच्या शर्तीप्रमाणे श्री डब्ल्यु.आर.अस्वार , संचालक (प्रकल्प) यांच्या तीन वर्षाच्या कार्यकालाची मुदत दि.३ मार्च २०११ रोजी संपली.
- श्री. यु.जी. झाल्टे संचालक (संचालन) यांनी संचालक (प्रकल्प) या पदाचा दि. ३ मार्च २०११ रोजी स्वीकारलेला अतिरिक्त भार दि. ६ जुलै २०११ रोजी सोडला.
- श्री प्रताप जी मोहिते यांची दि. २५ एप्रिल २०११ पासून अतिरिक्त संचालक पदावर नियुक्ती झाली
- श्री ओमप्रकाश के येम्पाल यांची दि. ६ जुलै २०११ रोजी अतिरिक्त संचालक पदी नियुक्ती झाली
- श्री विद्याधर कानडे प्रधान सचिव (ऊर्जा) यांना महाराष्ट्र शासनाने आदेश दि.१६.११.२०११ नुसार कंपनीचे अतिरिक्त संचालक पदावर नियुक्ती केले.

## मंडळाच्या बैठका

३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षात संचालक मंडळाच्या १० बैठका घेण्यात आल्या.

## लेखा परिक्षण समिती

या वर्षात लेखा परिक्षण समितीची बैठक झाली नाही.

## संचालकांच्या जबाबदाऱ्यांविषयी निवेदन

कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २१७(२ए ए) यातील आवश्यकतेनुसार संचालक, त्यांना संबंधित विभागांच्या प्रमुखांकडून प्राप्त झालेल्या प्रतिवेदनाच्या आधारे हमी देतात की :-

१. वार्षिक लेखे तयार करतांना त्यासाठी लागू होणाऱ्या लेखा मानकांचे पालन करण्यात आले आहे व जेथे त्याबाबत प्रत्यक्ष विचलन झाले, तेथे त्याचे योग्य स्पष्टीकरण त्यासोबत दिले आहे.

२. संचालकांनी योग्य अशा लेखा धोरणांची निवड केली आहे व त्याचा सातत्याने वापर केला आहे. तसेच वित्तीय वर्षाच्या अखेरीस कंपनीचे व्यवहार व त्या कालावधीचे नफा-तोटा यांचे हिशेब यांचे यथातथ्य व योग्य चित्र दिसावे यासाठी समर्पक व सूज्ञ निर्णय घेतले व रास्त अंदाज केले.

३. संचालकांनी कंपनीच्या मत्तांचे रक्षण करण्यासाठी व गैरप्रकार आणि अनियमीतता याला आळा घालण्यासाठी, कंपनी अधिनियमाशी सुसंगत अशा प्रकारांनी लेखा दस्तावेजांचे जतन करण्यासाठी योग्य व पुरेशी काळजी घेतली आहे.

४. संचालकांना वार्षिक लेखे तयार करण्याचे काम 'कार्यरत संस्था' या आधारे केले आहे.

## आवश्यक अंतर्गत नियंत्रणे :

कंपनीच्या सर्व मत्तांचा कोणत्याही अनधिकृत वापर किंवा निरासन यापासून सुरक्षा व रक्षण करण्यासाठी आणि सर्व व्यवहार अधिकृत, नोंदणी केलेले असून गैरव्यवहारापासून होणाऱ्या तोटयाच्या हमीसाठी कंपनीकडे अंतर्गत नियंत्रणाची योग्य व पुरेशी प्रणाली आहे.

## आपले वीजपारेषणाचे जाळे

महापारेषण कंपनी मर्यादित ही महाराष्ट्र राज्याचा पारेषणाची उपयुक्त संस्था आहे. ती भारतातील सर्वात मोठया पारेषण उपयोगिता संस्थांपैकी एक आहे. कंपनीच्या पारेषण तारांची लांबी एकूण ३८०६८ सर्कीट किमी आहे व राज्यभरात अती उच्च व्होल्ट क्षमतेची ५३६ वीज उपकेंद्रे आहेत मार्च २०११ मध्ये कंपनीची पारेषण क्षमता ८२६१९ एम व्ही ए एवढी होती.

**३१ मार्च २०११ रोजी महापारेषण कंपनीची पायाभूत रचना**

| अनुक्रमांक | व्होल्टेज लेव्हल | एम व्ही ए क्षमता | उपकेंद्रांची संख्या | तारांची लांबी (सर्कीट कि.मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | ५०० केव्ही एच व्ही डी सी | ३५८२ | २ | १५०४ |
| २ | ४०० केव्ही | १५१३० | २१ | ६८१६ |
| ३ | २२० केव्ही | ३५९५७ | १५८ | १२५६७ |
| ४ | १३२ केव्ही | २१६९७ | २५२ | ११५२६ |
| ५ | ११० केव्ही | २४८४ | ३३ | १६९९ |
| ६ | १०० केव्ही | २६३० | ३६ | ६८६ |
| ७ | ६६ केव्ही | ११३९ | ३४ | ३२७० |
| | **एकूण** | **८२६१९** | **५३६** | **३८०६८** |

## कंपनीचे सांघिक प्रशासन

### पूर्णवेळ संचालकांसाठी आचारसंहिता

कंपनीच्या संचालक मंडळाने आपल्या पूर्ण वेळ संचालकांकरीता एक आचार संहिता अंगीकारली आहे. ही आचारसंहिता व्यवस्थापकीय कामगिरीसाठी सांघिक प्रशासनावर भर देते तसेच भागधारकांना सेवा देते व मंडळ सदस्यांची जबाबदारी व प्रकल्पांच्या गरजा याची प्रमाणके निश्चित करते.

### कंपनीची सामाजिक जबाबदारी

कंपनीच्या सामाजिक जबाबदारीचे ध्येय असे आहे : कंपनी एक जबाबदार सांघिक नागरिक असून तसे व्यक्तिमत्व म्हणून कंपनी प्रभावी संवाद कार्यक्रम विकसित करणे, समाजात आत्मविश्वास व सदिच्छा निर्माणास साह्य करणारे कार्यक्रम विकसित करून त्याची अंमलबजावणी करणे.

## कर्मचाऱ्यांविषयीची माहिती

कंपनी अधिनियम १९५६, यातील कलम २१७ (२ए) ज्याचे सहवाचन कंपन्यांचे (कर्मचाऱ्यांची माहिती) नियमावली १९७५ यासोबत होते, त्यात विनिर्देशित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त वेतन कंपनीच्या कुठल्याही कर्मचाऱ्यास मिळालेले नाही.

### ऊर्जा संवर्धन, तंत्रज्ञानाचे समावेशन, परकीय चलनातील मिळकत व खर्च :

कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २१७ (१) (इ) अनुसार आवश्यक असणारी माहिती येथे जोडली आहे व ती या अहवालाचा तसेच कंपन्यांचे (संचालक मंडळाच्या अहवाल तपशीलाचे प्रकटीकरण) नियमावली १९६८ याचा एक भाग आहे.

१) **ऊर्जा संवर्धन :**

एकूण यंत्रणा व साधने यातील ऊर्जेची परिणामकारकता / कार्यक्षमता सुधारावी यासाठी कंपनीने ऊर्जा संवर्धनाची उपाययोजना केली. तसेच त्यासाठी विविध वीज उपकेंद्रातील जुने साहित्य बदलण्यात आले. ऊर्जा लेखन नोंदण्यासाठी पारेषण ते वितरण, पारेषण ते निर्मिती यामधील जागांवर एबीटी मिटर्स स्थापित करण्यात आले. विविध वीज प्रदायी वाहिन्या, इ एच व्ही उपकेंद्रातील ट्रान्स्फॉमर्स यावर मीटर्स लावून उपकेंद्रातील वीजहानी व ट्रान्स्फॉमर्सची हानी, ऊर्जा व्यवस्थापन व लेखा करण्याकरिता शोधण्यात आली.

२) **तंत्रज्ञानाचा समावेश**

१) **तंत्रज्ञान समाविष्ट करणे, अंगीकार करणे व नवीन शोध यासाठी केलेल्या प्रयत्नांची संक्षिप्त माहिती :**

१) क्षेत्रीय कार्यालयांना चाचणी घेण्यासाठी अद्यावत व दोष निदान शोधक उपकरणे पुरविण्यात आली.

२) विद्यमान रक्षण व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्यासाठी, सध्याच्या जुन्या व कालबाह्य रक्षण व्यवस्था बदलून तेथे अद्यावत संख्यात्मक रक्षण प्रणाली स्थापित करण्यात येत आहे.

३) उपकेंद्रे निरिक्षण प्रणाली सर्व ४०० केव्ही व महत्वाच्या अ. उ. व्होल्टता उपकेंद्रात देण्यात आली. तर नवीन उपकेंद्रात अलीकडची पुर्णरूपी उपकेंद्र स्वयंचलन प्रणाली देण्यात आली.

४) उ. उ. व्होल्टता उपकेंद्रातील जुन्या साहित्यात बदल करण्यासाठी आयुष्य विस्तार योजना कार्यरत आहे.

५) ट्रान्सफॉर्मरच्या आगी टाळण्यासाठी अग्नी रक्षक प्रणाली देण्यात आली.

६) ''अंदाजात्मक देखभाल कार्यपद्धती'' या संकल्पनेचा वापर

७) हॉट लाईन देखभाल पद्धती कार्यरत.

**२) या प्रयत्नातून झालेले लाभ :**

१) अंदाज केलेली प्रतिबंधात्मक देखभालीची कामे प्रभावीरित्या करणे शक्य होते.

२) दोष शोधण्याच्या व अलग करण्याच्या प्रक्रिया विश्वासार्हतेमध्ये सुधारणा होते.

३) वीज प्रवाह खंडीत होणे / बिघाड होणे याचे योग्य व निर्दोष पृथ:करण करून त्याचे मूळ कारण शोधता येते.

४) कमीत कमी व्यत्यय येतात.

५) यंत्रणेची विश्वासार्हता, उपलब्धता व स्थैर्य यामध्ये सुधारणा होते.

**२) परकीय चलनातील मिळकत व खर्च :**

वर्ष २०१०-११ मध्ये कोणत्याही परकीय चलनातील मिळकत झाली नाही. परकीय चलनातील वर्षातील खर्च रू. ५,८०,०९३/- झाला.

**खर्च परिक्षक :**

केंद्र सरकार (कंपनी व्यवहार मंत्रालय) यांच्या आदेशानुसार मेसर्स प्रवीण मोहनी अॅड असोशिएटस् यांची परिव्यय (खर्च) लेखा परिक्षक म्हणून वर्ष २०१०-११ साठी नियुक्ती करण्यात आली.

**सांविधिक लेखापरिक्षक :**

आपली कंपनी ही कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१७ नुसार एक शासकीय कंपनी आहे. कारण संपूर्ण समभाग भांडवल महाराष्ट्र शासनाने आपल्या ७ नामनियुक्तांमार्फत धारण केले आहे. म्हणून कलम ६१९ (२) च्या तरतुदीनुसार शासकीय कंपन्याच्या लेखापरिक्षकाची नेमणूक भारताचे लेखा नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्यामार्फत केली जाते. यानुसार वित्तीय वर्ष २०१०-११ साठी भारताचे लेखानियंत्रक व महालेखा निरिक्षक यांनी कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९ च्या तरतुदीनुसार मेसर्स शहा अॅड टपाडीया, सनदी लेखापाल, यांची सांविधिक लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती केली.

**सांविधिक लेखा परिक्षकांच्या अभिप्रायांवर स्पष्टीकरणे**

कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २१७ (३) यातील आवश्यकतेनुसार सांविधिक लेखापरिक्षकांनी दिलेल्या अभिप्रायांवर कंपनी व्यवस्थापनाची स्पष्टीकरणे या अहवालाचे जोडपत्र 'अ' येथे जोडली आहेत.

मा.लेखानियंत्रक व भारताचे महालेखापरिक्षक (कॅग) यांचे लेख्यांवरील अभिप्रायांची प्रतिक्षा आहे. ते मिळल्यानंतर पूरवणीपत्र म्हणून वितरित केली जातील.

**कृतज्ञता :**

कंपनी संचालक, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, बँका, सल्लागार, विक्रेते, जे. एस. डब्ल्यू. एनर्जी लि., कंपनी निबंधक, कार्पोरेट व्यवहार मंत्रालय, ग्रा. वि. महामंडळ, वि. वि. महामंडळ, सांविधिक लेखापरिक्षक, परव्यय लेखा परिक्षक आणि भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सातत्याने मिळणाऱ्या सहकार्य व पाठींब्याबद्दल कृतज्ञ आहे.

तसेच संचालक, कंपनीतील सर्व स्तरावरील कर्मचारी यांनी जे मोलाचे योगदान दिले व समर्पित वृत्तीने परिश्रम केले त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतात.

**संचालक मंडळाकरिता व त्यांच्या वतीने**
**अरविंद सिंह**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
## दिनांक : ३१-०३-२०११ वर्षाच्या रोजी मिळालेल्या लेखा परीक्षा अहवलास दिलेली उत्तरे

| अनु क्र. | लेखा परिक्षकांचा अहवाल | म.रा.वि.पा.कं.लि.ची उत्तरे |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित कंपनीच्या (यानंतर म.रा.वि.पा.कं.म. असे संबोधले आहे.) दि.३१-०३-२०११ रोजीच्या ताळेबंदाचे व त्यास जोडलेल्या ३१ मार्च २०११ रोजीच्या नफा तोटा व रोकड प्रवाह पत्रकाचे आम्ही लेखा परीक्षण केले. या वित्तीय विवरण पत्राची जबाबदारी कंपनी व्यवस्थापनाची आहे. आम्ही केलेल्या लेखा परिक्षणाच्या आधारे आर्थिक विवरण पत्रावर आमचे मत देणे ही आमची जबाबदारी आहे. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| २. | सर्वसाधारणपणे भारतामध्ये मान्य करण्यात आलेल्या लेखापरिक्षण विषयक पध्दतीनुसार आम्ही लेखा परिक्षण केले आहे. सदर पध्दतीनुसार आमच्याकडून अपेक्षा अशी आहे की वित्तीय विवरण वस्तुगत असत्यकथन पासून मुक्त असल्याची योग्य ती खातरजमा करण्याच्या दृष्टीकोनातून आम्ही योजना व कृती करावी. वित्तीय विवरण पत्रामध्ये दिलेल्या रकमेचे व खुलाशांचे आधारभूत पुरावे नमुन्यादाखल तपासणे या बाबींचा परिक्षणामध्ये समावेश असतो. तसेच उपयोगात आणलेली लेखा तत्त्वे, व्यवस्थापनाने केलेले महत्वाचे अंदाज आणि एकूणच विवरण पत्राचे सादरीकरण याचे मुल्यमापन करणे याचा परिक्षणामध्ये समावेश असतो. आम्हाला विश्वास आहे की आमच्या अभिप्रायाला आमच्या लेखा परिक्षणाचा योग्य आधार आहे. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| ३. | कंपनी अधिनियम १९५६ कलम २२७ उपकलम (४अ) अंतर्गत भारत सरकारने बनविलेल्या कंपनी (लेखा परिक्षकांचा अहवाल) आदेश २००३ आणि कंपनी (लेखा परिक्षकांचा अहवाल) (दुरुस्त) आदेश २००४ मध्ये केलेल्या सुधारणा अंतर्गत नमूद केलेल्या आदेशातील परिच्छेद ४ व ५ मधील कंपनीला लागू असणाऱ्या बाबी संबंधीचे विवरण परिशिष्ट म्हणून जोडले आहे. | संबंधित परिच्छेदबाबतची उत्तरे स्वतंत्रपणे दिली आहेत. |
| ४. | खालील बाबींकडे आम्ही आपले लक्ष विशेष करुन वेधू इच्छितो.<br>अ) महाराष्ट्र शासनाने ४ जून २००५ रोजी अधिसूचित केलेल्या महाराष्ट्र विद्युत सुधारणा हस्तांतरण योजना २००५ नुसार (यानंतर हस्तांतरण योजना असे संबोधले आहे) पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामधील पारेषण उपक्रमातील भाग असलेले उपक्रम, ज्यांचे | <br>वस्तुस्थितीस धरुन आहे. |

| | | |
|---|---|---|
| | विवरण त्या अधिसूचनेच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दिले आहे ते ६ जून २००५ पासून महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड मध्ये हस्तांतरीत झाले. या हस्तांतरणमुळे रु.२६,९५,९९,२०,४५५/- (दायित्वापेक्षा मालमत्ता जास्त असल्यामुळे) दर्शनी किंमत असलेले समभाग म.रा.वि.मं.सुत्रधार कंपनीच्या नावे वाटप करावयाचे होते (यानंतर सुत्रधार कंपनी असा उल्लेख करण्यात येईल). ही वाटणी अद्याप व्हायची असल्याने सदर रक्कम शेअर सस्पेंस अकाऊंट अशी दाखवली आहे | |
| | ब) वरील हस्तांतर योजने अंतर्गत मालमत्ता व दायित्वे कंपनीला ६जून २००५ पासून हस्तांतरीत केलेली आहे. जे राज्य शासनाच्या अंतिम मान्यतेच्या अधिन आहे, अशी अधिसूचना राज्य शासनाने अद्याप अधिसूचित करावयाची आहे. अधिसूचनेमधे अशा रक्कमामध्ये काही बदल झाल्यास त्याचा परिणाम वित्तीय विवरणावर होईल. | यासंबंधी ऊर्जा सचिवांनी व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं. होल्डींग कंपनीला पाठविलेले पत्र क्र. रिफॉर्म-२००६/सीआर-५११/एनआरजी-३ ता. २-६-२००६ नुसार ४-६-२००५ ला शासनाने अधिसूचित केलेली तात्पुरती हस्तांतरण योजना अंतिम आदेश येईपर्यंत ५ जून २००६ नंतरही चालू राहील असे कळविले आहे. |
| ५ | कंपनीची सुरक्षित कर्जे, असुरक्षित कर्जे, ऋणको, किरकोळ ऋणको, कर्जे व अग्रीमे यातील काही शिल्लकी, बारामती मुख्य भांडारातील वस्तुसूची आणि विविध इतर खर्च /जमांच्या शिल्लकी, सुत्रधारी कंपनी इतर सहकंपन्या यातील शिल्लकींसह या सर्व त्यांचा मेळ घातल्यानंतर करावयाच्या समायोजनाच्या अधीन आहेत. मेळ घातल्यावरचे समायोजन व जुनी बाकी वसुली करणे व अशा बाकीची वसूली पूर्णत: न होणे किंवा अंशत: होणे यामुळे होणाऱ्या तोटयाचा अंदाज करता आलेला नाही. वरील अशा रकमांचा प्रभाव ताळेबंदात त्या प्रमाणे प्रकट केला असून त्याच्या वर्षाच्या नफ्यावर होणारा परिणामाची संख्या मोजणी करता आलेली नाही. | कंपनीची सुरक्षित कर्जे, असुरक्षित कर्जे व अग्रीमे आणि विविध इतर खर्च /जमा यांची शिल्लकी रकमेसाठी संबोधित वित्तीय संस्था, बँक व कंपन्या म्हणजे आर इसी, पी एफ सी, एल आय सी, बी ओ एम व सूत्रधारी महावितरण व महानिर्मिती यांना विचारणा करण्यात आली. यापैकी आर इ सी, एल आय सी, बी ओ एम आणि जे आय् सी ए यांच्याकडून शिल्लकीची निश्चिती मिळाली. किरकोळ ऋणकोंकडील शिलकीच्या निश्चिती संदर्भात नमूद करण्यात येते की त्यातील बहूसंख्य शिल्लक ही पारेषण आकाराची रु.१८७.६६ कोटी इतकी आहे. ती राज्य पारेषण उपक्रमा कडून एप्रिल २०११ मध्ये मिळविण्यात आली.<br>बारामती मुख्य भांडाराच्या वस्तूसूचीचे मूल्यांकन योग्य प्रकारे करण्यासाठी मागील खरेदी आदेशातील दरांचा आधार घेण्यात आला. |

| | | |
|---|---|---|
| ६ | वरील परिच्छेद ४ ते ५ मध्ये उल्लेखलेल्या परिशिष्टातील आमच्या निरीक्षणांना अनुसरुन आम्ही असा अहवाल देतो की, | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| | अ) वरील परिच्छेद ४ ब आणि ५ मधील आमच्या निरीक्षणांची नोंद घेऊन जी आमच्या सर्ववेक्षक दृष्टीने आणि विश्वासानुसार आमच्या हिशेब तपासणीसाठी जरुर होती अशी सर्व माहिती व स्पष्टीकरणे मिळाली आहेत. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| | ब) आमच्या मते कंपनीची लेखा पुस्तके कायद्यातील तरतुदींनुसार योग्य अशी आहेत हे आमच्या तपासणी दरम्यान, जेवढे आढळले त्यावरुन सांगू शकतो. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| | क) या अहवालामध्ये उल्लेख केलेल्या ताळेबंदाचा नफा व तोटा पत्रक व रोकडता प्रवाह ही विवरणपत्रे लेखा पुस्तकाशी सुसंगत आहेत | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| | ड) आमच्या मते ताळेबंद, नफा तोटा पत्रक व रोकडता प्रवाह ही विवरणपत्रे कंपनी अधिनियम १९५६ मधील कलम २११ उपकलम ३ क यामध्ये उल्लेखलेल्या लेखांकन मानकाच्यानुसार आहेत. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| | इ) भारत सरकारने जारी केलल्या अधिसूचना नंबर जीएसआर ८२९(इ) दि. २१-१०-२००३ अनुसार कंपनी अधिनियम १९५६ कलम २७४(१)(ग) च्या तरतुदी कंपनीला लागू नाहीत. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| | फ) वरील परिच्छेद ४ (ब) आणि ५ वर आमचे शेरे, ज्यामुळे वित्तीय विवरणावर होणाऱ्या परिणामाचे मोजमाप केलेले नाही, या सापेक्ष आमच्या मते आणि जरुर असणाऱ्या आमच्या महितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार ही लेखा पत्रके ज्यांचे लेखा विवरण पत्र / निती आणि लेख्यावरील टिप्पणी, जे दोन्ही लेख्याचेच भाग आहेत. यांचा एकत्र विचार केल्यानंतर कंपनी अधिनियम १९५६ प्रमाणे आवश्यक माहिती आवश्यक असलेल्या पध्दतीप्रमाणे देतात आणि खालील बाबी संबंधी सत्य व उचित परिस्थिती दर्शवितात.<br>१ ताळेबंदाच्या बाबतीत ३१ मार्च २०११ रोजी कंपनीची स्थिती दर्शविते.<br>२ नफा-तोटा पत्रकानुसार हे त्या वर्षी संपलेल्या काळात नफा दाखवितात.<br>३ रोकड प्रवाह विवरणपत्रात सदर दिनांकाला संपलेल्या वर्षाचा रोकड प्रवाह आहे. | |

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाचा आमच्या लेखा परिक्षण अहवालाच्या परिच्छेद क्र.३ मध्ये उल्लेखलेले जोडपत्र

| अनु क्र. | लेखा परिक्षकांचा अहवाल | म.रा.वि.पा.कं.लि.ची उत्तरे |
|---|---|---|
| १(अ) | कंपनीने आपल्या प्रत्येक विभागामध्ये पूर्वीच्या राज्य विद्युत मंडळाची (म.रा.वि.मं) स्थावर मालमत्ता नोंदवही पुढे चालू ठेवली आहे. ही नोंद वही (यामध्ये भांडवली प्रगती पथावरील कामाची ज्यात नोंद होते अशा नोंद वह्याचा समावेश आहे)मात्र स्थावर मत्तेसंबंधी संपूर्ण योग्य तपशील तसेच संख्यात्मक तपशील व परिस्थिती दाखविण्यासाठी त्या अद्ययावत करणे गरजेचे आहे. | इ.आर.पी. प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी स्थावर मत्ता नोंदवहीत मत्तेचा संख्यात्मक तपशील देऊन अद्ययावत करण्याबाबतचा अभ्यास केलेला आहे व प्रक्रिया चालू आहे. |
| १(ब) | २००६-०७ म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी मर्यादित (सूत्रधार कंपनी) या कंपनीने, महापारेषण या कंपनीचे स्थिर मूल्यांकन करण्यासाठी, बाहेरील सल्लागाराची नेमणूक केली होती. या तज्ञाच्या अहवालानुसार, स्थिर मत्तेचे मूल्य ठरविण्यासाठी त्यापैकी ९० टक्के मालमत्तेची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. कंपनीच्या सल्लागारानी प्रत्यक्ष तपासणी केलेल्या स्थिर मालमत्तेची, कंपनीने ठेवलेल्या (वरील कलम १(अ) नुसार स्थिर मालमत्तेची नोंदवहीत नोंद केलेली नाही. | इआरपी प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी स्थावर मत्ता नोंदवहीत मत्तेचा संख्यात्मक तपशील देऊन अद्ययावत करण्याबाबतचा अभ्यास केलेला आहे व प्रक्रिया चालू आहे. |
| १(क) | कंपनीची एकूण स्थिर मत्ता लक्षात घेता या कालावधीत, निकालात काढलेली स्थावर मत्ता ही कंपनीच्या एकूण मत्तेवरील भरीव भाग नसल्यामुळे आमच्या मते, त्याचा कंपनीच्या चालू स्थितीवर काहीही परिणाम होणार नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| २(अ) | आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व सादर केलेल्या अहवालानूसार व्यवस्थापनाने मार्च २०११ मध्ये चार भांडार मंडळे, चार भांडार केंद्र व फ्रॅब्रिकेशन वर्कशॉप मधील वस्तुसूचीची प्रत्यक्ष तपासणी केली. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| २(ब) | आमच्या मतानुसार, व्यवस्थापनाने, अमलात आणलेली वस्तूसूचींच्या प्रत्यक्ष तपासणीची पध्दत कंपनीने आकारमान व तिच्या व्यवसायाचे स्वरुप पाहता अधिक बळकट करणे गरजेचे आहे. | महापारेषणने यापूर्वीच इआरपी/एसएपी सुरु केली आहे. व त्यामुळे सध्याच्या प्रणालीची योग्य ती निगा घेतली जाईल. |
| २(क) | आमच्याकडे दिलेल्या वस्तुसूचीचे आम्ही चाचणी दाखल परिक्षण केले. त्याआधारे आमच्या मते कंपनीने वस्तुसूचीचे व्यवस्थित अभिलेख ठेवलेले आहेत.सामानाची प्रत्यक्ष तपासणी व सामानाची नोंद या मधील | वस्तुस्थितीस धरुन आहे |

| | | |
|---|---|---|
| | त्रुटी कंपनी संचालनाची एकूण व्याप्ती पाहता महत्वाच्या नाहीत असे आम्हाला स्पष्टीकरण देण्यात आले. | |
| ३ | आम्ही जे अभिलेख तपासले त्यानुसार कंपनी अधिनियम १९५६ कलम ३०१ नुसार तयार केलेल्या रजिस्टर मध्ये नोंद असलेल्या कंपन्या, संस्था व इतर संस्थाकडून कर्ज घेतलेले किंवा दिलेले नाही | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| ४ | आमच्या मते व आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, कंपनीचा आकार व व्यवसायाच्या स्वरुपाच्या प्रमाणात, स्थिर मत्तेच्या व सामानाच्या खरेदीचे लेखांकन करण्यासाठी अंतर्गत नियंत्रण कार्यप्रणाली मजबूत करणे आवश्यक आहे. तसेच आम्ही केलेली तपासणी व आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार वर सांगितलेल्या अंतर्गत नियंत्रण प्रणाली कमकुवत असल्याचे किंवा तिला सातत्याने अपयश आलेले दिसले नाही. | महापारेषणने यापूर्वीच इआरपी/एसएपी सुरु केली आहे. व त्यामुळे सध्याच्या प्रणालीची योग्य ती निगा घेतली जाईल. |
| ५ | आम्हाला दिलेल्या माहितीप्रमाणे व स्पष्टीकरणे कंपनी अधिनियम १९५६, कलम ३०१ नुसार ठेवलेल्या नोंदवहीत नोंद करणे आवश्यक आहेत असे करारनामे दुसऱ्या कंपनीबरोबर किंवा इतर कोणाबरोबर केलेले नाहीत. म्हणून खंड ४(५) (अ) आणि ४(५)(ब) या वर्षासाठी कंपनीला लागू नाहीत. | वस्तुस्थितीस धरुन आहे |
| ६ | कंपनीकडून जी माहिती व स्पष्टीकरण मिळाली त्याप्रमाणे कंपनी अधिनियम १९५६ आणि नियम यामधील कलम ५८ अ मधील तरतुदींप्रमाणे जनतेकडून ठेवी स्विकारलेल्या नाहीत. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| ७ | चालु वर्षी कंपनीने अंतर्गत लेखा परिक्षण कामासाठी बाहेरील सनदी लेखापालाच्या फर्मची नेमणूक केली. आमच्या मते व आम्ही केलेल्या विविध अंतर्गत लेखा अहवालाच्या पाठपुराव्यास अनुसरुन लेख्यामध्ये अधिक अचूकता येण्यासाठी व वेळेवर होण्यासाठी अंतर्गत लेखा परिक्षकांनी कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरुप लक्षात घेऊन आतापर्यंत अंगीकारलेल्या लेखापरिक्षणाची पध्दत व व्याप्ती यात सुधारणा करणे आवश्यक आहे. | कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरुप लक्षात घेऊन अंतर्गत लेखापरिक्षकांची कार्यप्रणाली व व्याप्ती यात सुयोग्य सुधारणा करण्यात आल्या आणि वित्तीय वर्ष २०११-१२ साठी कार्यादेश देण्यात येत आहेत. जेणेकरुन वित्तीय वर्ष २०११-१२ चे अंतर्गत लेखापरिक्षण ३१ मार्च २०१२ पर्यंत पूर्ण होईल व अंतर्गत लेखा तपासणीचा अहवाल ३१ मे २०१२ पूर्वी देता येईल. |
| ८ | आम्हाला जे अभिलेखे देण्यात आले त्यानुसार प्रथमदर्शनी आमचे असे मत झाले आहे की केंद्र सरकारने कायद्यातील कलम २०९ (१) (ड) खाली विहीत केलेल्या नमुन्याप्रमाणे मुल्याचे अभिलेखे व लेखे | वस्तुस्थितीस धरुन आहे. |

| | | |
|---|---|---|
| | कंपनीने तयार केले आहेत. तथापि या अभिलेख्याचे व लेख्याचे सविस्तर परिक्षण आम्ही करणे गरजेचे नाही व तसे परिक्षण आम्ही केलेले नाही. | |
| ९(अ) | आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणाप्रमाणे तसेच आम्ही तपासणी केलेली पुस्तके व अभिलेखानुसार कंपनीने मुळातून वजावट केलेला कर ₹ २१,८२,८०६.०० व वर्क कॉन्ट्रॅक्ट टॅक्स ₹ ८,७७,०९२.०० वगळता इतर निर्विवाद स्वरुपाची देणी जसे भविष्य निर्वाह निधी इन्व्हेस्टर एज्युकेशन व प्रोटेक्शन फंड, विक्रीकर, संपत्तीकर, सेवाकर, जकातकर, सीमाशुल्क, जमीनीवरील शुल्क इ. सर्वसाधारणरित्या नियमितपणे योग्य त्या प्राधिकाऱ्याकडे भरणा केलेला दिसत आहे. | म.रा.वि. पारेषण कंपनीने नियमीतपणे व देय तारखेस मुळातून वजावट केलेला कर व वर्क कॉन्ट्रॅक्ट टॅक्स प्रदान केलेला आहे. तथापि लवकरच त्याचे मेळ करण्यात येईल. |
| ९(ब) | ₹१५.९० कोटी रकमेची विवादीत वैधानिक देणी की जी.विवादीत कारणास्तव योग्य प्राधिकारी यांचे कडे आहेत अशांचा तपशिल खालील प्रमाणे आहे. | |

| | अ. क्र. | संविधानाचे नाव | देय रकमेचे स्वरुप | रक्कम (₹ कोटी) रक्कम | कुठल्या कालावधीकरिता आहे | विवादीत देणी बाकी असलेल्या न्याय संस्थेचे नांव | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | कामगार राज्य विमा अधिनियम १९४८ | कामगार राज्य विमा | ०.२२ | वित्तीय वर्ष पासून (६८-९६) विविध वर्षे | कामगार राज्य विमा न्यायालय पुणे | सदरची बाब पुर्वीच्या म.रा.वि. मंडळाअंतर्गत असलेल्या पुणे शहर विभागाशी संबंधीत कामगार राज्य विमा योजना लागु करण्याच्या व्यवहारातेसंबंधात आहे. सदरची रक्कम पुणे शहर विभागाने, ग्रहणकेंद्र (सं.व सु.) विभाग पुणे कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्या कार्यालयास पाठविली आहे. राज्य कामगार विमा मंडळाने सन २००६ मध्ये कामगार राज्य विमा मंडळ न्यायालय, पुणे यांनी म.रा.वि.मंडळाच्या बाजुने दिलेल्या निकालाविरोधात उच्च न्यायालय मुंबई येथे दाद मागितलेली आहे. सध्या ही बाब मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबीत आहे. |
| | २. | आयकर अधिनियम १९६१ | आयकर | १४.७७ | कर निर्धारण वर्ष २००८-०९ | आयुक्त आयकर अपील याचेकडे ते म्हणाले की मागणीचे समायोजन निर्धारण वर्ष २००९-१० च्या परताव्यात १४३(१) अन्वये केले | सहायक आयुक्त आयकर यांनी आयकर अधिनियमच्या कलम १५६ अंतर्गत ₹ ४२.४२ कोटीची मागणीची सूचना दिली होती. त्यावर महापारेषण कं.ने आयुक्त आयकर (अपील) यांनी अंतीम निर्णय देई पर्यंत स्थगीत ठेवण्याचा अर्ज केला होता. महापारेषणने ₹२७.६४ कोटी भरले म्हणजे करदाता. महापारेषण दोषी ठरणार नाही. उर्वरित मागणीची रक्कम ₹१४.७७ कोटी देय असेल किंवा आयुक्त आयकर (अ) यांच्या अंतीम निर्णयानुसार ठरेल. |
| | ३. | आयकर अधिनियम १९६१ | फ्रिंज बेनीफिट कर | ०.१८ | कर निर्धारण वर्ष (०६-०७) | कलम १५४ अंतर्गत दुरुस्तीचे पत्र दाखल केले व ₹०.०७ कोटी सदर मागणी पोटी भरले | महापारेषण ने मागणी दुरुस्त करण्याची अर्ज दि. १८.०७.२०११ रोजी दिला आणि मागणी ₹०.०६ कोटी झाली कमी केली ती यापूर्वीच भरली आहे. मात्र आयकर विभागाने अद्याप दुरुस्तीच्या अर्जावर विचार केलेला नाही. |
| | ४. | आयकर अधिनियम १९६१ | फ्रिंज बेनीफिट कर | ०.७३ | कर निर्धारण वर्ष (०७-०८) | कलम १५४ अंतर्गत दुरुस्तीचे पत्र दिले | महापारेषणने मागणी दुरुस्त करण्याचा अर्ज दिला आहे. मात्र आयकर विभागाने त्यावर विचार अद्याप केलेला नाही. |
| | | एकूण | | १५.९० | | | |

| | | |
|---|---|---|
| १० | ३१ मार्च २०११ रोजी कंपनीच्या नांवे संचित तोटा नाही. तसेच याच दिवशी संपणाऱ्या आर्थिक वर्षात किंवा या आर्थिक वर्षाच्या आधीच्या लगतच्या कालावधीत कंपनीला रोकडीच्या रुपात नुकसान झालेले दिसत नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| ११ | आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व खुलाशा वरुन या वर्षात बँका, वित्तीय संस्था आणि कर्ज रोखे धारकांच्या देय रकमांची परतफेड करण्यात कंपनीने कसूर केलेली नाही असे आमचे मत आहे. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| १२ | आम्हाला देण्यात आलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीने समभाग, कर्जरोखे किंवा इतर प्रतिभूती तारणावर कोणत्याही प्रकारची कर्जे किंवा अग्रीमे मंजूर केलेली नाहीत. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| १३ | कंपनी ही चीट फंड कंपनी नाही किंवा निधी/म्युच्युअल बेनीफिट फंड/सोसायटी नसल्यामुळे आदेशामधील कलम ४(१३) कंपनीला लागू नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| १४ | आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणाच्या आधारे आमचे असे मत आहे की प्रतिभूती च्या संदर्भात कंपनी विक्रेता किंवा व्यवसायी नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| १५ | आम्हाला देण्यात आलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार बँका किंवा वित्तीय संस्था यांच्याकडून इतरांनी घेतलेल्या कर्जासाठी कंपनीने कोणतीही हमी दिलेली नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| १६ | आमच्या मते आणि आम्हाला देण्यात आलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीच्या ताळेबंदाच्या सर्वसाधारण परिक्षणाप्रमाणे कंपनीने घेतलेली मुदतीची कर्जे ज्या कारणासाठी घेतली त्याच कारणासाठी वापरली आहेत असे प्रथम दर्शनी दिसत आहे. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| १७ | आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आमच्या मते कंपनीने अल्प मुदतीसाठी उभारलेल्या कर्जाचा विनियोग दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीसाठी केलेला नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| १८ | ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षात कंपनीने कोणालाही अधिक पसंती दाखवून भागाचे वाटप केलेले नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| १९ | कंपनीने कोणतेही कर्ज रोखे काढले नाहीत त्यामुळे कर्ज रोख्यांच्या हमी पत्राचा प्रश्न उदभवत नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |

| | | |
|---|---|---|
| २० | आमच्या अहवालाच्या वर्षामध्ये निधी उभारण्यासाठी कंपनीने भागाची विक्री केलेली नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |
| २१. | भारतामध्ये सर्वसामान्यपणे मान्य असलेल्या लेखा परिक्षण पध्दतीनुसार आम्ही कंपनीच्या पुस्तकांचे व अभिलेख्यांचे परिक्षण करीत असताना तसेच आम्हाला देण्यात आलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणावरुन या वर्षामध्ये कंपनीने कोणाची फसवणूक केल्याची किंवा कंपनीची कोणाकडून फसवणूक झाल्याचे आढळत नाही. | वस्तुस्थितीस धरुन आहे. |

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार
**शहा आणि टापडिया**
सनदी लेखापाल
सभासद क्र. १०९४६३ डब्ल्यु

रमेशचद्र एस.जोशी
भागीदार
सभासद क्र.३३५९४
स्थळ : मुंबई
दिनांक : ०३/०९/२०११

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित करीता**

सही
**प्रताप जी. मोहिते**
संचालक (वित्त)
मुंबई

# संचालकांचा अहवाल २०१०-२०११ ला पुरवणी तक्ता

## भारताचे लेखानियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाच्या लेख्यांवर कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६९४(४) अनुसार दिलेले अभिप्रायः

कंपनी अधिनियम १९५६ यात विहीत केलेल्या वित्त विषयक अहवाल सादर करण्याच्या आकृती बंधानुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मुंबई यांचा दि.३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाची वित्तीय विवरणपत्रे तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे.

भारताचे लेखा नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९(२) यानुसार नियुक्त केलेल्या सांविधिक लेखापरिक्षक यांचेवर कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २२७ नुसार या वित्तीय विवरण पत्रावर, त्यांची व्यावसायिक संस्था दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडीया यांनी निश्चित केलेल्या लेखा परिक्षणाची व हमी संबंधीची मानके यानुसार स्वतंत्रपणे केलेल्या लेखापरिक्षणावर आधारीत अभिप्राय व्यक्त करण्याची जबाबदारी आहे. ती त्यांनी पार पाडली आहे असे त्यांच्या **दि. ३ सप्टेंबर २०११** च्या लेखापरिक्षणाचा अहवालात नमूद केलेले आहे.

मी भारताचे लेखानियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्यावतीने **महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित** च्या दि. ३१मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय अहवालाचे कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९(३) (बी) नुसार पूरक लेखा परिक्षण केले. हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे आणि सांविधिक लेखापरिक्षकांची कामाची कागदपत्रे न मिळविता करण्यात आलेले आहे. तसेच ते सांविधिक लेखापरिक्षक व कंपनीचा कर्मचारी वृंद यांचेकडे विचारणा करणे आणि काही लेखा अभिलेखांचे निवडक परिक्षण करणे या मर्यादेत करण्यात आलेले आहे. माझ्या या पूरक लेखापरिक्षणात माझ्या लक्षात आलेली व माझ्या मते जी सदर वित्तीय विवरणपत्रे व त्यासंबंधीत लेखापरिक्षण अहवाल अधिक चांगल्याप्रकारे समजण्यास साह्यकारक ठरतील अशा कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९(४) नुसार खालील महत्वाच्या बाबींकडे लक्ष वेधीत आहे.

अ) **फायदेशिरपणा विषयी अभिप्राय**

**नफा व तोटा लेखा**

**उत्पन्न :**

**प्रवर्तनापासून चे उत्पन्न (अनुसूची १२) ₹ २०९७.७८ कोटी**

**खुला प्रवेश आकार ₹ ५७.६९ कोटी**

१. यामध्ये चालू वर्षाची एस टी यू आकाराची रक्कम ₹ ३.३० कोटी समाविष्ट नाही यामुळे नफा व प्राप्त योग्य रकमा यांचे ₹ ३.३० कोटीने कमी विवरण झाले आहेत **(मुख्यालय)**

**इतर उत्पन्न (अनुसूची-१३) ₹ ५०.४५ कोटी**

**इतर संकीर्ण उत्पन्न ₹५४.८० कोटी**

२. यामध्ये वीजतारा व उपकेंद्रे यांची कामे करण्यासाठी महावितरण कंपनीने वर्ष २००८ मध्ये सदर कंपनीच्या वतीने स्वीकारलेल्या ₹ १.८१ कोटीचा समावेश आहे. त्याचा लेखा वर्ष २००८ मध्ये करण्यात आला नव्हता. यामुळे व ‘इतर संकीर्ण उत्पन्न व नफा यात ₹ १.८१ कोटीने जादा विवरण आणि पूर्वकालिन उत्पन्नात तितकेच कमी विवरण झाले आहे. **(मुख्यालये)**

**व्यय**

**प्रशासन व सर्वसाधारण खर्च (अनुसूची-१६) ₹ १३६.६८ कोटी**

**दर व कर ₹ १२.८५ कोटी**

३. यामध्ये महावितरण कंपनीने अ.ऊ.व्होल्टता (स.वसू) मंडळ परळी यांचेवर औद्योगिक दराने लावलेल्या ₹ ०.९१ कोटीच्या देयकाचा समावेश नाही. थकीत ऊर्जा देयकांसाठी तरतूद केलेली नसल्याने व्ययाचे आणि चालू दायित्वे यांचे ₹ ०.९१ कोटीने कमी विवरण तर नफ्याचे तेव्हढेच जादा विवरण झाले आहे.

**व्याज व वित्तीय आकार**

**(अनुसूची-१८) ₹२८३.०० कोटी**

**ओपन मार्केट बॉड्स वरील व्याज ₹१५.९० कोटी**

४. यामध्ये पूर्वकाळातील खर्च या अंतर्गत हिशेब करताना ३२ दिवसाऐवजी ६० दिवस धरण्यात आले. त्यामुळे ₹ ०.७५ कोटीने जादा रकमेचे कमी विवरण झाले. यामुळे चालू वर्षाचा नफा यात जादा विवरण तर पूर्वकाळातील खर्च याचे कमी विवरण झालेले आहे.

**जपान आंतरराष्ट्रीय सहकारी संस्थेच्या कर्जाचे व्याज : ₹ १.७३ कोटी**

५. यामध्ये कर्जावरील चालू वर्षाच्या व्याजाचे ₹१.५१ कोटी यांचा समावेश केलेला नाही तसेच वर्ष २००९-१० या वर्षीच्या व्याजासाठी ₹०.३४ कोटीची तरतूद केलेली नव्हती. यामुळे यावर्षीच्या नफ्याचे ₹१.५१ कोटीने जादा विवरण झाले आहे. तर पूर्वकालिन खर्चाचे ₹१.५१ कोटीने कमी विवरण झाले आहे तसेच दायित्वाचे ₹१.८५ कोटीने कमी विवरण झालेले आहे. **(मुख्यालय)**

६ **खर्च / व्यय**

**पूर्वकालिन घसाऱ्यासाठी कमी तरतूद - ₹२२.२२ कोटी**

वर्ष २००९-१० मध्ये स्थिर मत्तेचे मूल्य ₹८.३१ कोटी यावर घसारा कार्यान्वियनाच्या तारखेपासून आकारलेला नसल्याने वरील बाबीचे विवरण ₹०.५० कोटीने कमी झाले आहे. यामुळे ₹ ०.५० कोटीने स्थिरमत्तेचे ढोबळ गट याचे विवरण जास्त आणि संचित घसाऱ्याचे विवरण कमी तर राखीव व आधीक्य याचे विवरण जास्त झालेले आहे. **(परळी)**

**ब) वित्तीय स्थितीवर अभिप्राय**

**ताळेबंद**

**निधीचा वापर**

**स्थिर मत्ता (अनुसूची-५) ढोबळ ₹ १३,९१८.६१ कोटी**

**जमीन - ₹ ५५.३३ कोटी**

७ वरील बाबीमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना बुटीबूरी (जिल्हा नागपूर, नागपूर विभागांतर्गत) येथे उपकेंद्रे उभारणीसाठी संपादित केलेल्या १४०४५० चौरस मीटर जमीनीच्या संपादनासाठी दिलेल्या ₹२.११ कोटी या जमीनीच्या अधिमूल्याचा समावेश आहे. यामुळे ₹२.११ कोटीने जमिनीबाबत जादा विवरण आणि भाडेपट्टीच्या जमिनीचे कमी विवरण झालेले आहे. **(स्था.बां.व दे.मं. नागपूर)**

**प्रगतीपथावरील भांडवली कामे (अनुसूची-६) ₹ ३६८३.९९ कोटी**

८. आय्.बी.एम. मार्फत अमलात आलेल्या साहस संसाधन नियोजन व व्य.मा.प्र. यावरील ₹६.५१ कोटीचे कमी विवरण वरील लेख्यात झालेले आहे. सदर खर्च हा अग्रीमे (स.वसु) पुरवठादार अंतर्गत नोंदण्यात आला. अशाप्रकारे ₹६.५२ कोटीने प्रगतीपथावरील भांडवली कामे याचे कमी विवरण झाले आहे तर तेव्हढयाच रकमेने कर्जे व अग्रीमे यांचे जादा विवरण झाले आहे.

९. वरील लेख्यामध्ये वर्ष २०१०-११ मधील तरतूद न केलेल्या कामाच्या देयकांची रक्कम ₹१.४० कोटीचे कमी विवरण झाले आहे. यामुळे एवढया रकमेचे 'प्रगतीपथावरील भांडवली कामे' आणि शिल्लक दायित्वे यांचे कमी विवरण दिसते. **(नाशिक)**

१०. यामध्ये 'उपकेंद्र उभारणी विभाग, नागपूर यांच्या अधिकार क्षेत्रात ज्यांची तरतूद नाही अशा उभारणी संपादन व कार्यान्वयन कंत्राटदार यांनी सादर केलेल्या विविध कामाची एकूण ₹६.७५ कोटी मूल्याच्या सहा बीजकांचा (Invoice) समावेश नाही. यामुळे रु.६.७५ कोटीने भांडवली कामे यात कमी विवरण झालेले आहे. **(अ.उ.व्हो.पा. बांधकाम मंडळ, नागपूर)**

११. वरील लेख्यामध्ये दि. २९ जून २००८ रोजी पूर्ण झालेल्या परंतु आजपावेतो भांडवलीकरण न झालेल्या ₹०.२५ कोटी एवढया रकमेचे जादा विवरण झालेले आहे. यामुळे दि. २९ जून २००८ ते ३१ मार्च २०११ या कालावधीत घसारा न लावल्यामुळे 'प्रगतीपथावरील भांडवली कामे यांचे जादा विवरण व स्थिर मत्तेचे कमी विवरण झाले असून नफ्याचेही जादा विवरण झाले आहे. **(रक्कम अनिश्चित)(नाशिक)**

१२. वरील लेख्यात दि.३१ मार्च २०११ रोजी वापरात न आणलेल्या दोन ट्रान्सफॉर्मरचा खर्च ₹९.०४ कोटीचा समावेश आहे. त्यानुसार ती रक्कम 'कामाच्या जागेवरील साहित्याचा लेखा' यात दाखवायची होती. त्याऐवजी ती 'प्रगतीपथावरील भांडवली कामांचा लेखा' यात दाखविली गेली. यामुळे ₹९.०४ कोटीचे कमी विवरण चालू मत्ता (साठा) यामध्ये दिसते तर तेव्हढयाचे जादा विवरण 'प्रगतीपथावरील भांडवली कामे' यात दिसते. **(परळी)**

१३. यामध्ये नागपूर विभागातील नांदूरा येथील प्रस्तावित १३२ केव्ही उपकेंद्रच्या साधनसामग्री स्थापन करण्यासाठी वर्ष १९९८-९९ पर्यंत केलेल्या ₹०.१३ कोटी एवढया खर्चाचा समावेश आहे. हे काम जागेकडे जाण्याच्या हक्काबाबत काही समस्या निर्माण झाल्याने सोडून दिले. मात्र त्याचा पर्यायी हेतूसाठी वापर करण्यात येत आहे.

यामुळे सदर खर्चाचे स्थानांतर स्थिर मत्तेमध्ये करावयास हवे होते व त्यासाठी योग्य प्रकारे छाननी करुन घसाऱ्याची तरतूदी करायला हवी होती. सदर 'प्रगतीपथावरील स्थापत्य कामे (W.I.P.) यात स्थानांतरण मंडळ झाल्याने ₹ ०.१३ कोटी एवढया रकमेचे स्थिर मत्तेचे कमी विवरण झाले आहे तर प्रगतीपथावरील स्थापत्य कामे याचे कमी विवरण झालेले आहे. **(स्था.बा.व.दे. नागपूर)**

१४. वरील लेख्यात सेवा आकार (₹०.१९ कोटी) अग्रीम सेवा आकार (₹०.०४ कोटी) आणि विलंबित भरण्याचा आकार (₹०.०७ लाख) या म.औ.वि.मं. यांनी बुटीबूरी, नागपूर येथील उपकेंद्राच्या उभारणीच्या पाण्याच्या देयकावर लावलेल्या आकारांचा समावेश नाही. त्याचे भांडवलीकरण झाले नाही व कंपनीने जाहीर केलेल्या लेखा धोरणानुसार स्थिरमत्ते संबंधी कमी विवरण झाले आहे. भाडेपट्टी कराराचा तपशील नसल्याने या व्यवहाराचा नफा-तोटा लेखा व ताळेबंद यावर होणारा प्रभाव निश्चित करता येत नाही. **(स्था. व दे मंडळ नागपूर)**

**चालू मत्ता, कर्जे व अग्रीमे (अनुसूची - ८) ₹ १२२६.२५ कोटी , वस्तूसूची -₹२१३.७१ कोटी**

१५. संचालक (वित्त) यांनी (परिपत्रक क्र. १४८१ दि. २८ जानेवारी २०११) भांडारातून काढलेल्या मालांच्या लेखांसाठी एम.ए.एस.ए. ही पद्धत दि. १ एप्रिल २०१० पासून अंमलात आणण्यासाठी एक सुधारित प्रक्रिया करावी म्हणून मार्गदर्शक सूचना केल्या. मात्र परळी मंडल कार्यालयाने वर्ष २०१०-११ मध्ये एम. ए. एस. ए. पद्धतीची अंमलबजावणी केली नव्हती. यामुळे डब्ल्यू आय पी / आर ॲंड एम यांच्या खर्चाचे व साठा यांचे लेखा सदोष नोंदले गेले व मंडळ कार्यालयाच्या वार्षिक लेखांचे खालील प्रमाणे चुकीचे दर्शन होते.

१५.१ ३१ मार्च २०१० रोजी न वापरलेले साहित्य, एम ए एस ए कडे पूर्वकालिन उत्पन्नांची जमा करण्यासाठी हस्तांतरीत झालेले नव्हते.

१५.२ तसेच ३१ मार्च २०११ रोजी न वापरलेले साहित्यांचा लेखा एम ए एस ए साठी नोंदला जाणे आवश्यक होते एम ए एस ए मध्ये न वापरलेले साहित्य दाखविले नसल्याने आर ॲंड एम खर्चाचे जादा विवरण झाले व त्याप्रमाणात नफ्याचे कमी विवरण झाले. **(परळी)**

१५.३ वरील बाबीत महापारेषणला दिलेल्या वापरलेल्या ट्रान्सफॉर्मर तेलाची अखेरच्या साठ्याच्या किमतीचे ₹ ०.२३ कोटी या रकमेचा समावेश नाही. त्यामुळे चालू मत्ता, पूर्वकाळातील जमा, राखीव व अधिक्य या सर्व बाबींमध्ये कमी विवरण झाले आहे. **(परळी)**

**कर्जे व अग्रीमे ₹ ३६९.१७ कोटी**

**लिज फायनान्स प्रॉजेक्टसाठी भरलेले अग्रीम ₹ १५३.७८**

१६. यामध्ये आय एल एफ एस कडून लिज फायनान्स (फायनाशियल लिज) याद्वारे संपादन केलेल्या मत्ता असतात व त्याचे भाडेपट्टीच्या आकाराच्या देण्यासाठी सममूल्य रकमेचे दायित्वही असते. कंपनी सदर वित्तीय विषयक भाडे चुकती करते व मार्च २०११ मध्ये भाड्यासंबंधी कोणतेही दायित्व अस्तित्वात नसून कंपनीने संपूर्ण भाड्याची नोंद नफा व तोटा लेखा यामार्फत दाखविली. (व्याज व वित्त आकार) त्याऐवजी ती दायित्व लेखात मुद्दलाचा पुनर्भरणा याच्या मर्यादेत तसेच व्याज व वित्त आकाराच्या मर्यादेपर्यंत नफा तोटा पत्रकात दाखवावयास हवी होती. म्हणून दायित्वाच्या लेखा चुकता करण्याचे काम राहिले. तसेच भाड्याच्या मत्तांचा घसारा करण्यात आला नाही. म्हणून ३१ मार्च २०११ पर्यंतच्या काळात घसाऱ्याचे कमी विवरण झाले. भाडेपट्टा कराराचा तपशील उपलब्ध नसल्याने या व्यवहाराचा नफा व तोटा लेखा व ताळेबंद यावर होणाऱ्या परिणामाचा अंदाज करता येत नाही.

मागील वर्ष २००९ मध्ये या बाबींवर अभिप्राय दिला होता. मात्र कंपनीने त्याची नोंद घेतली नाही.

**अनुसूची - ८**
**चालू मत्ता, कर्जे व अग्रीम**
**क) रोख व बँक शिल्लक शेडयूल्ड बँकांवरील शिल्लकी रकमा**

१७. चालू लेख्याची ₹३१.१९ कोटी ही जमा शिल्लक समायोजित करण्यात आली आणि सदर लेखाशिर्षाच्या अंतर्गत दर्शविण्यात आली. ती त्या ऐवजी 'अधिकर्ष-चालू दायित्वे व तरतुदी' यात दर्शवायची होती.

**निधीचे स्त्रोत**

**सुरक्षित कर्जे (अनुसूची-३) ₹५८३९.६४ कोटी**

**वि.वि.मं.(पीएफसी) कडून प्रकल्प कर्ज - ₹१६९६.७० कोटी**

१८. विद्युत वित्त महामंडळ यांचे कडून आलेल्या निश्चित शिल्लकी रकमेत ₹१६९९.८२ कोटी एवढी शिल्लक कर्जाच्या लेखात दर्शविली आहे. वि.वि.म.ने. वर्ष २००५-०६ मध्ये पुरवठादारांना भांडवली खर्चासाठी थेट दिलेल्या चार कर्जाची रक्कम ₹३.११ कोटीची लेखा नोंद केली नसल्यामुळे तेवढे कमी विवरण झाले आहे. हा फरक ३१ मार्च २००६ पासून पुढे नेण्यात आला आहे. या कर्जापैकी ₹१.७७ कोटीचा पूनर्भरणा यापूर्वीच केलेला आहे. कंपनी हमीचे शूल्क व व्याज याचाही भरणा करीत आहे. तपशीलाच्या अभावी याचा, निर्माण केलेल्या मत्तांच्या व्याजाचे भांडवलीकरण न करणे, मत्तांचे भांडवलीकरण घसारासाठी तरतूद आणि नफा या सर्वांवर होणाऱ्या परिणामांची निश्चिती करता येणे शक्य नाही.

**चालू दायित्वे व तरतुदी**

**दायित्वे (अनुसूची-९) ₹ २०५५.३७ कोटी**

**किरकोळ धनको**

**भांडवली खर्चाचे धनको-₹ ४३०.७८ कोटी**

**साहित्याचा पुरवठा / भांडवली कामे यांचे दायित्व**

१९. यामध्ये ₹१.८१ कोटीचे विवरण कमी झाले आहे. (₹२.०१ कोटी वजा कंत्राट दारांना मंजूर केलेली विनाव्याज अग्रीम ₹०.२० कोटी) उभारणी, नियोजन, कार्यान्वयन (EPC) यांच्या कंत्राटाच्या देयकांच्या न दिलेल्या रकमांचे दायित्वासाठी तरतूद केली नव्हती, यामुळे झाली आहे. ही देयके विभाग क्र.२ ने मार्च २०११ या महिन्यात स्वीकारली. यामुळे प्रगती पथावरील भांडवली कामे यांचे विवरण ₹२.०१ कोटीने कमी, चालू दायित्वाचे विवरण ₹१.८१ कोटीने कमी, तर पुरवठा दारांचा अग्रीम याचे विवरण ₹ ०.२० कोटीने जास्त झाले आहे. **(पुणे)**

**भांडवली खर्चा व्यतिरिक्त इतर धनको - ₹ २४१.१८ कोटी**

**नेमलेली कामे/ (Jobs) / कार्ये (Works) पार पाडण्यासाठी जमा**

२०. यामध्ये कंपनीने खाजगी संस्थांना दिलेली / देण्यात येणारी कामे यांच्या ऐवजी विविध कामांच्या दिलेल्या सेवा यांच्यासाठी जमा केलेल्या व परत न करावयाचा पर्यवेक्षणाच्या आकाराची रक्कम ₹ २८.१७ कोटी (नागपूर मंडळ कार्यालय ₹१.५० कोटी + नागपूर उपकेंद्र विभाग ₹२६.६७ कोटी) चा समावेश आहे. अशा प्रकारे पर्यावेक्षणाचा आकार मिळाल्यावर नागपूर मंडळ व विभागाची, त्यांच्या उत्पन्न म्हणून लेखा नोंद केली नसल्याने इतर उत्पन्न व नफा यांचे ₹२८.१७ कोटी कमी विवरण तर इतर दायित्वाचे तेव्हेढयाच रकमेने जास्त विवरण झाले आहे. **(अ.उ.व्हो.पा. बांधकाम मंडळ, नागपूर)**

**ग्रा.वि.महामंडळाचे कर्ज (REC) ₹१०.१२ कोटी**

२१. यात आरंभीच्या तरतूदी जादा उलट केली असल्याने ₹०.१३ कोटीने लेखामध्ये कमी विवरण झाले आहे. परिणामी पूर्वकालिन खर्चाचे विवरण सुध्दा ₹०.१३ कोटीने कमी झाले आहे.

**वि.वि. महामंडळाचे कर्ज (PFC)– ₹ ३६.३५ कोटी**

२२. या सारख्या एका लेख्यात आरंभीच्या तरतुदी जादा उलट केल्या असल्याने ₹ ०.८१ कोटीचे कमी विवरण झाले आहे. परिणामी पूर्वकालिन (जमा) व संचित नफा यांचे ₹ ०.८१ कोटीने जादा विवरण झालेले आहे.

**संकीर्ण खर्च – निर्लेखित करावयाच्या मर्यादेपर्यंत (अनुसूची-११)**

**अद्याप मंजूर न झालेल्या प्रकल्पांसंबंधी सर्वेक्षण / शक्यता अजमावण्याचे अभ्यासावरील खर्च ₹ ०.५५ कोटी**

२३. लेखा धोरण यातील परिच्छेद क्र. २(सी)(८) यात जाहीर केल्याच्या विपरित कृती, कंपनीने प्रकल्पाच्या तीन पारेषण तारमार्ग कार्यान्वित करण्यासाठीच्या सर्वेक्षणांवर केलेला ₹ ०.२८ कोटीचा खर्च सर्वेक्षण नाकारल्यावर निर्लेखित करण्याऐवजी वरील लेखामध्ये समाविष्ट करण्यात आहे. यामुळे नफ्याचे निर्लेखित न केलेल्या रकमेच्या मर्याद इतके म्हणजे ₹ ०.२८ कोटीने अधिक विवरण नफ्यामध्ये आणि संकिर्ण खर्चामध्ये झाले आहे.

**क) अन्य अभिप्राय**

**रोकडता प्रवाह विवरण पत्र**

**चालू मत्ता, कर्जे व अग्रीमे (अनुसूची-८) ₹ १२२६.२५ कोटी वस्तू सूची – ₹ २१३.७१ कोटी**

२४. यामध्ये सदोष /नाकारलेल्या व वापरण्यास योग्य नसलेल्या वाहकतारेचे मूल्य ₹ ०.७४ समाविष्ट आहे. सदोष वाहक तारेच्या समावेशामुळे तेवढया रकमेने साठयाचे जादा विवरण, खर्चाचे कमी विवरण (सदोष साहित्यासाठी तरतूद) आणि नफ्याचे जादा विवरण झालेले आहे. याबद्दल गतवर्षी अभिप्राय दिला होता, मात्र कंपनीने सुधारणा केली नाही.

**रोकड व बँकेतील शिल्लकी रकमा – ₹ ३६४.२५ कोटी**

**शेडयुल्ड बँकेतील शिल्लक चालू खाते – ₹ ३१.१९ कोटी (उणे शिल्लक)**

२५. उणे चिन्हांकित शिल्लक, ही दि. ३१ मार्च २०११ रोजी दिलेल्या धनादेशमुळे परंतु त्याचे बँक ऑफ इंडिया मधील मुदतीच्या ठेवीच्या खात्यातून स्वयंचलीत पध्दतीने बाजूला काढणे प्रलंबित असल्याने झाली आहे. ही रक्कम चालू दायित्व म्हणून दाखविणे योग्य होते. यामुळे चालू मत्ता व दायित्वे यांच ₹ ३१.१९ कोटीने कमी विवरण झाले आहे.

**कर्जे व अग्रीमे – ₹ ३६९.१७ कोटी**

**भाडेपट्टीवरील वित्त प्रकल्पासाठी दिलेली अग्रीम – ₹ १५३.७८ कोटी**

२६. कंपनीने आय एफ सी एल च्या अपरिवर्तनीय ऋणपत्रांच्या पूनर्रचनेसाठी वर्ष २००६ मध्ये ₹ ०.३० कोटीचे शूल्क भरले होते. सदर कर्ज नंतर महानिर्मिती कंपनीने स्थानांतरीत करण्यात आले व कंपनीने महानिर्मिती कंपनीकडे पूनर्रचना शूल्काची मागणी केली. पण ती मान्य केली गेली नाही. यामुळे किरकोळ प्राप्ती मध्ये ₹ ०.३० कोटीचे जादा विवरण आणि खर्च व नफा यात कमी विवरण झाले आहे. मागील वर्षी याबाबत अभिप्राय देऊनही कंपनीने सुधारणा केली नाही. आधीच्या वर्षी अभिप्राय देऊनही कंपनीने सुधारणेची कृती केली नाही.

**आधीचे खर्च ₹ १०.१३ कोटी**

२७. दीर्घ मुदतीच्या कर्जाची पुनर्रचना करण्यासाठी केलेले परंतु निर्लेखित करावयाचे हे खर्च आहेत. ते स्थगित महसूली खर्च या स्वरुपाचे असल्याने त्याचे तसे वर्गीकरण करायला हवे होते. मागील वर्षी अभिप्राय देऊनही कंपनीने यावर्षी सुधारणा केली नाही.

**संबधित संस्थांविषयी प्रकटने**

२८. कंपनीने संचालक मंडळ ठराव क्र. ४९/११ दि. ३०/१०/०९ नुसार मेसर्स अदानी याचे सोबत संयुक्त साहसी उपक्रमाच्या रचनेस मंजुरी दिली व प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर केला व तो प्रलंबित आहे. वरील ठरावाच्या आधारे मे. अदाणी यांनी 'महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड' नावाच्या संयुक्त साहसी उपक्रम कंपनीची रचना केली आणि म.वि.नि. आयोगाकडून पारेषणाची परवानगी प्राप्त केली. संयुक्त साहस उपक्रमासाठी महापारेषण सोबत दि.२/०७/१० रोजी केलेल्या करारातील तरतूदींनुसार महापारेषण कंपनीने सदर प्रकल्पासाठी निविदा प्रसारीत करण्यास परवानगी दिली तसेच कंपनीने मंडळास क्र. ५९/३१ दि. ३१/१२/२०१० नुसार सदर सं.सा.कंपनीकडून मत्ता व ₹५.७६ कोटीचा खर्च यांचे हस्तांतरणास मान्यता दिली. कंपनीकडे चेक क्र. ११३६४६ दि.३१/०३/२०११ यानुसार ₹५.९८ कोटी एवढया रकमेचा भरणा झाला आहे. ही वस्तुस्थिती लेखा मानक १८ अंतर्गत प्रकट केलेली नव्हती.

स्थळ :- **मुंबई**
दिनांक :- ३० डिसेंबर २०११

**भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक**
यांचे साठी व त्यांच्यावतीने
सही/-
**(पी.एन.शेषाद्रि)**
महालेखापाल
(वाणिज्य लेखापरिक्षण)

**लेखानियंत्रक व भारताचे महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९ (४) नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी, मुंबईच्या ३१ मार्च २०१२ रोजी संपलेल्या वर्षाच्या लेखांवर दिलेल्या अभिप्रायांवर कंपनीची उत्तरे :**

| अनु क्र. | भारताचे लेखानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचा अभिप्राय | महापारेषण कंपनीचे उत्तर |
|---|---|---|
| | कंपनी अधिनियम १९५६ यात विहीत केलेल्या वित्त विषयक अहवाल सादर करण्याच्या आकृती बंधानुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मुंबई यांचा दि.३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाची वित्तीय विवरणपत्रे तयार करणे ही कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे.<br><br>भारताचे लेखा नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९(२) यानुसार नियुक्त केलेल्या सांविधिक लेखापरिक्षक यांचेवर कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २२७ नुसार या वित्तीय विवरण पत्रावर, त्यांचेवर त्यांची व्यावसायिक संस्था दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडीया यांनी निश्चित केलेल्या लेखा परिक्षणाची व हमी संबंधीची मानके यानुसार स्वतंत्रपणे केलेल्या लेखापरिक्षणावर आधारीत अभिप्राय व्यक्त करण्याची जबाबदारी आहे. ती त्यांची पार पाडली आहे असे त्यांचा दि.३सप्टेंबर २०११ च्या लेखापरिक्षणाचा अहवालात नमूद केलेले आहे. | वस्तुस्थिती |
| | मी भारताचे लेखानियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्यावतीने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित च्या दि. ३१मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय अहवालाचे कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९(३) (बी) नुसार पूरक लेखा परिक्षण केले. हे पूरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे आणि सांविधिक लेखापरिक्षकांची कामाची कागदपत्रे न मिळविता करण्यात आलेले आहे. तसेच ते सांविधिक लेखापरिक्षक व कंपनीचा कर्मचारी वृंद यांचेकडे विचारणा करणे आणि काही लेखा अभिलेखांचे निवडक परिक्षण करणे या मर्यादेत करण्यात आलेले आहे. माझ्या या पूरक लेखापरिक्षणात माझ्या लक्षात आलेली व माझ्या मते जी सदर वित्तीय विवरणपत्रे व त्यासंबंधीत लेखापरिक्षण अहवाल अधिक चांगल्याप्रकारे समजण्यास साह्यकारक ठरतील अशा कंपनी अधिनियम | वस्तुस्थिती |

| | | |
|---|---|---|
| | १९५६ च्या कलम ६१९(४) नुसार खालील महत्वाच्या बाबींकडे लक्ष वेधीत आहे. | |
| अ) | **फायदेशिरपणा विषयी अभिप्राय**<br>**नफा व तोटा लेखा**<br>**उत्पन्न :**<br>**प्रवर्तनापासून चे उत्पन्न (अनुसूची १२) ₹ २०९७.७८ कोटी**<br>**खुला प्रवेश आकार ₹ ५७.६९ कोटी** | |
| १. | यामध्ये चालू वर्षाची एस टी यू आकाराची रक्कम ₹ ३.३० कोटी समाविष्ट नाही यामुळे नफा व प्राप्त योग्य रकमा या ₹ ३.३० कोटीने कमी झाल्या आहेत (मुख्यालय) | खुला प्रवेश आकार यांचा प्रथम रा. भा. प्रे. केंद्र कळवा (४७६) येथे लेखा होतो व नंतर मुख्यालयाच्या लेख्यात स्थानांतरित होतो. यासाठी खुला प्रवेश आकार यापोटी आंतरशाखा समायोजन रक्कम ₹ ३,२५,८१,५९०/- चे ऑगस्ट २०११ मध्ये करण्यात आले म्हणून अशी रक्कम २०११-२०१२ वर्षात पूर्वकालीन बाब म्हणून दाखविण्यात आली. |
| | **इतर उत्पन्न (अनुसूची-१३) ₹५०.४५ कोटी**<br>**इतर संकीर्ण उत्पन्न ₹५४.८० कोटी** | |
| २. | यामध्ये वीजतारा व उपकेंद्रे यांची कामे करण्यासाठी महावितरण कंपनीने वर्ष २००८ मध्ये सदर कंपनीच्या वतीने स्वीकारलेल्या ₹१.८१ कोटीचा समावेश आहे. त्याचा लेखा २००८ मध्ये करण्यात आला नव्हता. यामुळे व 'इतर संकीर्ण उत्पन्न व नफा यात ₹१.८१ कोटीने जादा विवरण आणि पूर्वकालिन उत्पन्नात तितकेच कमी विवरण झाले आहे. | इतर संकीर्ण उत्पन्न ₹ ५४.८० कोटी यामध्ये ₹ १.८१ कोटी ही रक्कम समाविष्ट असून ती मे. सेरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया लि. पुणे यांच्या लाईन व उपकेंद्राच्या पर्यावेक्षक कामाची आहे. या संदर्भात येथे स्पष्ट करण्यात येते की, पर्यावेक्षण आकारापोटी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. यांनी मे. सेरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया लि. पुणे यांचेकडून जमा केली होती. संदर्भ मुख्य अभियंता (वाणिज्य) यांचे पत्र क्र. को-ऑर्ड सेल / सेरम / ३०२२६, दि. २९.७.२००८. सदर रक्कम निधी व्यवस्थापन कक्ष, महापारेषण, मुंबई यांना देण्यात आली. आणि जमा (क्रेडिट आय बी ए ) आदेश अ. ऊ. व्होल्टता बांधकाम मंडळ पुणे यांना संदर्भ - जेव्ही क्र. २२८४४५ दि. ३१.०१.२०११ यांना पाठविला होता. त्यानी नजरचुकीने सदर रक्कम पूर्वकालिन उत्पन्नात नोंदण्याऐवजी इतर संकीर्ण उत्पन्न यात नोंदली. |

| | | |
|---|---|---|
| ३. | **व्यय**<br>**प्रशासन व सर्वसाधारण खर्च (अनुसूची-१६) ₹१३६.६८ कोटी**<br>**दर व कर ₹१२.८५ कोटी**<br><br>यामध्ये महावितरण कंपनीने अ.अु.व्होल्टता (स.व सू) मंडळ परळी यांचेवर औद्योगिक दराने लावलेल्या ₹०.९१ कोटीच्या देयकाचा समावेश नाही. थकीत उर्जा देयकांसाठी तरतूद केलेली नसल्याने व्ययाचे आणि चालू दायित्वे यांचे ₹०.९१ कोटीने कमी विवरण तर नफ्याचे तेव्हढेच जादा विवरण झाले आहे. | महापारेषणच्या सहाय्यकारी पुरवठ्यासाठीच्या ऊर्जा आकाराचा भरणा नियमितपणे केला जातो. मात्र १३२ केव्ही रायमोहा, काजी, आष्टी आणि २२० केव्ही उपकेंद्र उस्मानाबाद, बीड येथील ऊर्जा मीटर सदोष आढळल्याने सरासरी वापरांची देयक नियमितपणे भरली. वरील उपकेंद्रातील सदोष मीटर्स वि. वर्ष २०१०-११ मध्ये महावितरण कंपनीने बदलले आणि त्यातील एक महिन्याच्या वापराच्या आधारे महावितरणने बीड विभागास ₹ ४७,०५,७२०/- चे, लातूर विभागास ₹ ३३,९२,११२/- व गिरवली विभागास ₹९,९५,८२०/- चे देयक मागील काळातील मूल्यांकनासाठी पाठविले. रकमा जास्त असल्याने सदर प्रकरण उच्चस्तरीय प्राधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आले. व त्यांच्या आदेशानुसार भरणा रोखून ठेवला. यासाठी वित्तीय वर्ष २०११-१२ साठी जेव्ही १४,१८,२० नुसार ऑक्टोबर २०११ मध्ये तरतूद करण्यात आली. |
| ४. | **व्याज व वित्तीय आकार**<br>**(अनुसूची-१८) ₹२८३ कोटी**<br>**ओपन मार्केट बॉड्स वरील व्याज ₹१५.९० कोटी**<br>यामध्ये पूर्वकाळातील खर्च या अंतर्गत हिशेब करताना ३२ दिवसाऐवजी ६० दिवस धरण्यात आले. त्यामुळे ₹०.७५ कोटीने जादा रक्कमेचे कमी विवरण झाले. यामुळे चालू वर्षाचा नफा यात जादा विवरण तर पूर्वकाळातील खर्च याचे कमी विवरण झालेले आहे. | मार्च २०११ मध्ये दिवसांची मोजणी ३२ ऐवजी ६० अशी चुकीची झाल्याने जादा तरतूद केली गेली होती. |
| ५. | **जपान आंतरराष्ट्रीय सहकारी संस्थेच्या कर्जाचे व्याज : ₹१.७३ कोटी**<br><br>यामध्ये कर्जावरील चालू वर्षाच्या व्याजाचे ₹१.५१ कोटी यांचा समावेश केलेला नाही तसेच वर्ष २००९-१० या वर्षीच्या | जे आय सी ए च्या कर्जाच्या व्याजाची तरतूद करणे नजरचुकीने राहिले. मात्र वि. वर्ष २०११-१२ मध्ये |

| | | |
|---|---|---|
| | व्याजासाठी ₹०.३४ कोटीची तरतूद केलेली नव्हती. यामुळे यावर्षीच्या नफ्याचे ₹१.५१ कोटीने जादा विवरण झाले आहे. तर पूर्वकालिन खर्चाचे ₹१.५१ कोटीने कमी विवरण झाले आहे तसेच दायित्वाचे ₹१.८५ कोटीने कमी विवरण झालेले आहे. **(मुख्यालय)** | जेव्ही २२९१८८ दि. ३०.०९.२०११ नुसार सुधारणा करण्यात आली. |
| | **खर्च / व्यय**<br>**पूर्वकालिन घसाऱ्यासाठी कमी तरतूद - ₹२२.२२ कोटी** | |
| ६ | वर्ष २००९-१० मध्ये स्थिर मत्तेचे मूल्य ₹८.३१ कोटी यावर घसारा कार्यान्वयनाच्या तारखेपासून आकारलेला नसल्याने वरील बाबीचे विवरण ₹ ०.५० कोटीने कमी झाले आहे. यामुळे ₹ ०.५० कोटीने स्थीरमत्तेच सरसकट गट याचे विवरण जास्त आणि संचित घसाऱ्याचे विवरण कमी तर राखीव व आधीक्य याचे विवरण जास्त झालेले आहे. **(परळी)** | या कार्यालयाने सदर स्थिर मत्तेचे भांडवलीकरण डिसेंबर २०१० मध्ये ₹ ८,३०,७४,९११ /- साठी करण्यात आले व त्यानुसार वि. वर्ष २०१०-११ रोजी घसारासाठी तरतूद केली. मात्र जुलै २००८ ते मार्च २०१० साठीच्या बाकीची तरतूद केली नव्हती. आता वरील कालावधीसाठी जेव्ही क्र. २२ नुसार ऑक्टोबर २०११ या महिन्यात घसाऱ्याची तरतूद करण्यात आली. |
| **ब)** | **वित्तीय स्थितीवर अभिप्राय**<br>**ताळेबंद**<br>**निधीचा वापर**<br>**स्थिर मत्ता (अनुसूची-५)**<br>**एकूण गट ₹ १३,९१८.६१ कोटी**<br>**जमीन - ₹ ५५.३३ कोटी** | |
| ७ | वरील बाबीमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना बुटीबूरी (जिल्हा नागपूर, नागपूर विभागांतर्गत) येथे उपकेंद्रे उभारणीसाठी संपादित केलेल्या १४०४५० चौरस मीटर जमीनीच्या संपादनासाठी दिलेल्या ₹२.११ कोटी या जमीनीच्या अधिमूल्याचा समावेश आहे. यामुळे ₹२.११ कोटीने जमिनीबाबत जादा विवरण आणि भाडेपट्टीच्या जमिनीचे कमी विवरण झालेले आहे. **(स्था.बां.व दे. नागपूर)** | यातील ₹ २,१०,६७,५००/- ही रक्कम जमीनीसाठीचे अधिमूल्य आहे. ती चुकीने १०.१०१ म्हणजे मालकीची जमीन यात नोंदली गेली. आता ती या लेखाशीर्षातून काढून १०.१०२ या भाडेपट्टयाने धारण केलेली जमीन यात नोंदली आहे. संदर्भ जेव्ही क्र. ०७, ऑक्टोबर २०११. |
| | **प्रगतीपर कामाचे भांडवल (अनुसूची-६)**<br>**₹ ३६८३.९९ कोटी** | |
| ८. | आय्.बी.एम. मार्फत अमलात आलेल्या उद्योगिक संसाधन नियोजन व व्य.मा.प्र. यावरील ₹६.५१ कोटीचे कमी विवरण वरील लेख्यात झालेले आहे. सदर खर्च हा अग्रीमे (स.वसु) | इ आर पी आणि एम आय एस अंमलबजावणीसाठी केलेला खर्च ₹ ६.५२ कोटी याची नोंद वर्ष २००९-१० मध्ये लेखाशीर्ष ''अमूर्त मत्ता' यात केली होती. मात्र |

| | | |
|---|---|---|
| | पुरवठादार अंतर्गत नोंदण्यात आला. अशाप्रकारे ₹६.५२ कोटीने प्रगतीपथावरील भांडवली कामे याचे कमी विवरण झाले आहे तर तेव्हढयाच रकमेने कर्जे व अग्रीमे यांचे जादा विवरण झाले आहे. | लेखा परिक्षणात सांविधिक लेखापरिक्षक यांना सदर इ आर पी प्रकल्प पूर्ण होईपर्यंत त्याचे स्थानांतरण पुरवठादारांना अग्रीम यात केले. म्हणून सदर रक्कम वर्ष २०१०-११ मध्ये 'पुरवठादारांना अग्रीम' यात दिसते. |
| ९. | वरील लेख्यामध्ये वर्ष २०१०-११ मधील तरतूद न केलेल्या कामाच्या देयकांची रक्कम ₹१.४० कोटीचे कमी विवरण झाले आहे. यामुळे एवढया रकमेचे 'प्रगतीपथावरील भांडवली कामे' आणि शिल्लक दायित्वे यांचे कमी विवरण दिसते. **(नाशिक)** | मे. एम्को. लि. (₹ ०.७८ कोटी) आणि मे. ए बी बी लि. (₹ ०.६२ कोटी) यांनी भुसावळ उपविभागात मे २०११ मध्ये सादर केले. त्याची छाननी जून २०११ मध्ये झाली व लेखा परिक्षण ऑगस्ट २०११ या महिन्यात झाले. मात्र त्याची तरतूद जी. वि. वर्ष २०११-१२ मधे केली गेली. |
| १०. | यामध्ये 'उपकेंद्र उभारणी विभाग, नागपूर यांच्या अधिकार क्षेत्रात ज्यांची तरतूद नाही अशा उभारणी संपादन व कार्यान्वयन कंत्राटदार यांनी सादर केलेल्या विविध कामाची एकूण ₹६.७५ कोटी मूल्याच्या सहा बीजकांचा (Invoice) समावेश नाही. यामुळे ₹६.७५ कोटीने भांडवली कामे यात कमी विवरण झालेले आहे. **(अ.उ.व्हो.पा. बांधकाम मंडळ, नागपूर)** | सदर सहा इनव्हायसेस ज्याचे मूल्य ₹ ६.७५ कोटी होते त्याचा लेखा वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये नोंदण्याचे राहिले होते. तो वर्ष २०११-१२ मध्ये नोंदण्यात आला. |
| ११. | वरील लेख्यामध्ये दि. २९ जून २००८ रोजी पूर्ण झालेल्या परंतु आजपावेतो भांडवलीकरण न झालेल्या ₹०.२५ कोटी एवढया रकमेचे जादा विवरण झालेले आहे. यामुळे दि. २९ जून २००८ ते ३१ मार्च २०११ या कालावधीत घसारा न लावल्यामुळे 'प्रगतीपथावरील भांडवली कामे' यांचे जादा विवरण व स्थिर मत्तेचे कमी विवरण झाले असून नफ्याचेही जादा विवरण झाले आहे. **(रक्कम अनिश्चित)(नाशिक)** | मे. एस. पी. पॉवर एंटरप्रायझेस ज्याचे ₹ १७४,५७५/- चे अंतीम देयक मंडळ कार्यालयात पाठविण्यात आले व डब्ल्यूसीआर अंतीमीकरण करतांना या अंतीम देयकाचा भांडवलीकरण करण्यासाठी विचार झाला नाही. कारण त्याचा लेखा झाला नव्हता व त्याचे अंतीमीकरण जून २०११ मध्ये झाले. कार्यान्वयनाच्या तारखेपासून घसारासाठी तरतूद करण्यात आली. उर्वरित ₹ ०.२४ कोटीचे भांडवलीकरण यापूर्वीच जेव्ही १६ दि. ३१.१०.२००९ नुसार करण्यात आले आहे. |
| १२. | वरील लेख्यात दि.३१ मार्च २०११ रोजी वापरात न आणलेल्या दोन ट्रान्स्फॉर्मरचा खर्च ₹९.०४ कोटीचा समावेश आहे. त्यानुसार ती रक्कम 'कामाच्या जागेवरील साहित्याचा लेखा' यात दाखवायची होती. त्याऐवजी ती 'प्रगतीपथावरील भांडवली कामांचा लेखा' यात दाखविली गेली. यामुळे ₹९.०४ कोटीचे कमी विवरण चालू मत्ता (साठा) यामध्ये दिसते तर तेवढयाचे जादा विवरण 'प्रगतीपथावरील भांडवली कामे' यात दिसते. (परळी) | सामग्रीची किंमत म्हणजे २२० केव्ही एम व्ही ए २२०/१३२ केव्ही टी/एफ मार्च २०११ या महिन्यात ₹ ९.०४ कोटी काढण्यात आले व ते एम ए एस ए ऐवजी प्रगतीपथावरील कामे यात वर्ष २०११-१२ मध्ये खर्ची दाखविण्यात आले. मात्र वित्तीय वर्ष २०११-१२ मध्ये एम ए एस ए लेखापद्धती अनुसरण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| १३. | यामध्ये नागपूर विभागातील नांदूरा येथील प्रस्तावित १३२ केव्ही उपकेंद्रच्या साधनसामग्री स्थापन करण्यासाठी वर्ष १९९८–१९९९ पर्यंत केलेल्या ₹०.१३ कोटी एवढया खर्चाचा समावेश आहे. हे काम जागेकडे जाण्याच्या हक्काबाबत काही समस्या निर्माण झाल्याने सोडून दिले मात्र त्याचा पर्यायी हेतूसाठी वापर करण्यात येत आहे.<br><br>यामुळे सदर खर्चाचे स्थानांतर स्थिर मत्तेमध्ये करावयास हवे होते व त्यासाठी योग्य प्रकारे छाननी करुन घसाऱ्याची तरतूदी करायला हवी होती. सदर 'प्रगतीपथावरील स्थापत्य कामे' (W.I.P.) यात स्थानांतरण न झाल्याने ₹ ०.१३ कोटी एवढया रकमेचे स्थिर मत्तेचे कमी विवरण झाले आहे तर प्रगतीपथावरील स्थापत्य कामे याचे कमी विवरण झालेले आहे. **(स्था.बा.व.दे. नागपूर)** | १३२ केव्ही उपकेंद्र, नांदूरा याचा प्रत्यक्ष ताबा अ. उ. व्होल्टता बांधकाम व सं व सू परिमंडळ, अमरावती यांचेकडे आहे. मात्र त्याचा आंतरशाखा समायोजन (आयबीए) अद्याप स्वीकारलेला नाही. गेल्या ११ वर्षांपासून आय बी ए प्रलंबित असल्याने तो निर्लेखित करण्याचा प्रस्ताव या कार्यालयामार्फत लवकरात लवकर तयार करण्यात येईल. |
| १४. | वरील लेख्यात सेवा आकार (₹०.१९ कोटी) अग्नी सेवा आकार (₹०.०४ कोटी) आणि विलंबित भरण्याचा आकार (₹०.०७ लाख) या म.औ.वि.मं. यांनी बुटीबूरी, नागपूर येथील उपकेंद्राच्या उभारणीच्या पाण्याच्या देयकावर लावलेल्या आकारांचा समावेश नाही. त्याचे भांडवलीकरण झाले नाही व कंपनीने जाहीर केलेल्या लेखा धोरणानुसार स्थिरमत्ते संबंधी कमी विवरण झाले आहे. भाडेपट्टी कराराचा तपशील नसल्याने या व्यवहाराचा नफा–तोटा लेखा व ताळेबंद यावर होणारा प्रभाव निश्चित करता येत नाही. | बुटीबोरी, एम. आय. डी. सी. येथील भूखंड क्र. पी–७८/ पी –७९ याची किंमत एम. आय. डी. सी. ला यापूर्वीच देण्यात आली आहे. मात्र अंतीम कराराची कार्यवाही अद्याप व्हायचे असल्याने सेवा आकार व आग विषयक आकार कराराची अंमलबजावणी झाल्यावर किंवा प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर दिले जातील. सदर वीज उपकेंद्र अद्याप कार्यान्वित न झाल्याने सेवा आकार व आगी संदर्भीचे आकार यांचा भरणा करण्यापूर्वी सदर प्रकरण उचित प्राधिकारी यांचेकडे नेण्यात येईल. |
| | **चालू मत्ता, कर्जे व अग्रीमे (अनुसूची - ८) ₹ १२२६.२५ कोटी, वस्तूसूची ₹२१३.७१ कोटी** | |
| १५. | संचालक (वित्त) यांनी (परिपत्रक क्र. १४८१ दि. २८ जानेवारी २०११) भांडारातून काढलेल्या मालांच्या लेखांसाठी एम.ए.एस.ए. ही पद्धत दि. १ एप्रिल २०१० पासून अंमलात आणण्यासाठी एक सुधारित प्रक्रिया करण्यासाठी मार्गदर्शक सूचना केल्या. मात्र परळी मंडल कार्यालयाने वर्ष २०१०–११ मध्ये एम. ए. एस. ए. पद्धतीची अंमलबजावणी केली नव्हती. यामुळे डब्ल्यू आय पी / आर ॲंड एम यांच्या खर्चाचे व साठा यांचे लेखा सदोष नोंदले गेले व मंडळ कार्यालयाचे वार्षिक लेखांचे खालील प्रमाणे चुकीचे दर्शन होते. | |

| | | |
|---|---|---|
| १५.१ | ३१ मार्च २०१० रोजी न वापरलेले साहित्य एम ए एस ए कडे पूर्वकालिन उत्पन्नांची जमा करण्यासाठी हस्तांतरीत झालेले नव्हते. | कामाच्या जागेवरील सामग्रीचा लेखा (एमएएसए) याची कार्यवाही / सुरुवात परिपत्रक क्र. १४८१ दि. १८.०१.२०११ नुसार झाली आहे. सदर परिपत्रक क्षेत्रीय कार्यालयाना वि. वर्ष २०११-१२ मध्ये मिळाले. वित्तीय वर्ष २०१०-११ बंद झाल्याने सदर लेखा पुनः उघडणे व एम ए एस ए लेखन समाविष्ट करणे या कार्यालयास शक्य नव्हते. एम ए एस ए ची अंमलबजावणी १ एप्रिल २०११ नंतर चालू करण्यात येईल.<br>यानुसार या मंडळातील ३१.०३.२०११ रोजीची अखेरची साठ्यातील शिल्लक एम ए एस ए मध्ये घेण्यात येईल व त्यापुढील व्यवहार एम ए एस ए मध्ये समाविष्ट करण्यात येतील. |
| १५.२ | तसेच ३१ मार्च २०११ रोजी न वापरलेले साहित्यांचा लेखा एम ए एस ए साठी नोंदला जाणे आवश्यक होते एम ए एस ए मध्ये न वापरलेले साहित्य दाखविले नसल्याने आर अ‍ॅड एम खर्चाचे जादा विवरण झाले व त्याप्रमाणात नफ्याचे कमी विवरण झाले. (परळी) | |
| १५.३ | वरील बाबीत महापारेषणला दिलेल्या वापरलेल्या ट्रान्सफॉर्मर तेलाची अखेरच्या साठ्याच्या किमतीचे ₹०.२३ कोटी या रकमेचा समावेश नाही. त्यामुळे चालू मत्ता, पूर्वकाळातील जमा, राखीव व अधिक्य या सर्व बाबींमध्ये कमी विवरण झाले आहे. (परळी) | वापरलेल्या ट्रान्स्फॉर्मर तेलाच्या नोंदी मासिक प्रगती अहवालात करण्यात येईल आणि त्याची नोंद विक्रीच्या वेळेच्या आधारे उत्पन्न म्हणून केली जाईल. |
| १६. | **कर्जे व अग्रीमे ₹ ३६९.१७ कोटी**<br>**लिज फायनान्स प्रॉजेक्टसाठी भरलेले अग्रीम ₹ १५३.७८**<br>यामध्ये आय एल एफ एस कडून लिज फायनान्स (फायनाशियल लिज) याद्वारे संपादन केलेल्या मत्ता असतात व त्याचे भाडेपट्टीच्या आकाराच्या देण्यासाठी सममूल्य रकमेचे दायित्वही असते. कंपनी सदर वित्तीय विषयक भाडे चुकती करते व मार्च २०११ मध्ये भाड्यासंबंधी कोणतेही दायित्व अस्तित्वात नसून कंपनीने संपूर्ण भाड्याची नोंद नफा व तोटा लेखा यामार्फत दाखविली (व्याज व वित्त आकार) त्याऐवजी ती दायित्व लेखात मुद्दलाचा पुनर्भरणा याच्या मर्यादेत व व्याज व वित्त आकाराच्या मर्यादेपर्यंत नफा व तोटा पत्रकात दाखववयास हवी होती. म्हणून दायित्वाच्या लेखा चुकता करण्याचे काम राहिले. तसेच भाड्याच्या मत्तांचा घसारा करण्यात आला नाही. म्हणून ३१ मार्च | याची नोंद हस्तांतरण योजनेच्या वेळी पूर्वीच्या म. रा. वि. मं. कडून मिळालेल्या आरंभीच्या शिलकीनुसार केली आहे. (भाडेपट्टी प्रकल्प लेखा संहिता २७.८७० ₹ १५३.७८ कोटी खर्ची एच व्ही डी सी आय एल एफ एस लेखा) यात दिलेला अग्रीम आणि महावितरण कंपनीच्या प्रतिसादानुसार त्यावर पुढील कार्यवाही केली जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | २०११ पर्यंतच्या काळात घसाऱ्याचे कमी विवरण झाले. भाडेपट्टा कराराचा तपशील उपलब्ध नसल्याने या व्यवहाराचा नफा व तोटा लेखा व ताळेबंद यावर होणाऱ्या परिणामाचा अंदाज करता येत नाही.<br><br>मागील वर्ष २००९ मध्ये या बाबींवर अभिप्राय दिला होता. मात्र कंपनीने त्याची नोंद घेतली नाही. | |
| १७. | **अनुसूची - ८**<br>**चालू मत्ता, कर्जे व अग्रीम**<br>**(क) रोख व बँक शिल्लक शेडयूल्ड बँकांवरील शिल्लकी रकमा**<br><br>चालू लेख्याची ₹३१.१९ कोटी ही जमा शिल्लक समायोजित करण्यात आली आणि सदर लेखाशिर्षाच्या अंतर्गत दर्शविण्यात आली. ती त्या ऐवजी 'अधिकर्ष–चालू दायित्वे व तरतुदी' यात दर्शवायची होती. | दि. ३१.०३.११ रोजी बँक ऑफ इंडियाच्या रोकड पुस्तकातील जमा असलेली अखेरची शिल्लक ₹ ६९.४५ कोटी होती. ती मार्च २०११ मध्ये केलेल्या भरण्याच्या कारणास्तव होती. कारण मार्च ११ मध्ये ₹ ७२.८६ कोटीचे (चेक) धनादेश काढण्यात आले परंतू भरण्यासाठी एप्रिल २०११ मध्ये सादर करण्यात आले. |
| १८. | **निधीचे स्त्रोत**<br>**सुरक्षित कर्जे (अनुसूची-३) ₹५८३९.६४ कोटी**<br>**वि.वि.मं.(पीएफसी) कडून प्रकल्प कर्ज - ₹१६९६.७० कोटी**<br><br>वीज वित्त महामंडळ यांचे कडून आलेल्या निश्चित शिल्लकी रकमेत ₹ १६९९.८२ कोटी एवढी शिल्लक कर्जाच्या लेखात दर्शविली आहे. वि.वि.म.ने. वर्ष २००५-०६ मध्ये पुरवठादारांना भांडवली खर्चासाठी थेट दिलेल्या चार कर्जाची रक्कम ₹३.११ कोटीची लेखा नोंद केली नसल्यामुळे तेवढे कमी विवरण झाले आहे. हा फरक ३१ मार्च २००६ पासून पुढे नेण्यास आला आहे. या कर्जापैकी ₹१.७७ कोटीचा पूनर्भरणा यापूर्वीच केलेला आहे. कंपनी हमीचे शूल्क व व्याज याचाही भरणा करीत आहे. तपशीलाच्या अभावी याचा निर्माण केलेल्या मत्तांच्या व्याजाचे भांडवलीकरण न करणे, मत्तांचे भांडवलीकरण घसारासाठी तरतूद आणि नफा या सर्वांवर होणाऱ्या परिणामांची निश्चिती करता येणे शक्य नाही. | वीज वित्त महामंडळ व महापारेषण यांच्या थकीत शिलकी मध्ये ₹ ३,११,४४,२२०/- चा फरक आहे व त्याचा मेळ घालण्याचे काम चालू आहे. जेथे फरक पडला त्या नोंदी शोधण्यात आल्या व त्याचा समझोता योग्य काळात केला जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | **चालू दायित्वे व तरतुदी**<br>**दायित्वे (अनुसूची-९) ₹ २०५५.३७ कोटी**<br>**किरकोळ धनको**<br>**भांडवली खर्चाचे धनको - ₹४३०.७८ कोटी**<br>**साहित्याचा पुरवठा / भांडवली कामे यांचे दायित्व** | |
| १९. | यामध्ये ₹१.८१ कोटीचे विवरण कमी झाले आहे. (₹२.०१ कोटी वजा कंत्राट दारांना मंजूर केलेली विनाव्याज अग्रीम ₹०.२० कोटी) उभारणी, नियोजन, कार्यान्वयन (EPC) यांच्या कंत्राटाच्या देयकांच्या न दिलेल्या रकमांचे दायित्वासाठी तरतूद केली नव्हती यामुळे झाली आहे ही. देयके विभाग क्र.२ ने मार्च २०११ या महिन्यात स्वीकारली यामुळे प्रगती पथावरील भांडवली कामे यांचे विवरण ₹२.०१ कोटीने कमी, चालू दायित्वाचे विवरण ₹१.८१ कोटीने कमी, तर पुरवठा दारांचा अग्रीम याचे विवरण ₹ ०.२० कोटीने जास्त झाले आहे. **(पुणे)** | उभारणी, नियोजन व कार्यान्वयन (इपीसी) याची नोंद वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये करण्याचे राहिले आहे. सदर खर्चाची नोंद जेव्ही १२ दि. ३१.१०.२०११ नुसार केली गेली. |
| | **भांडवली खर्चा व्यतिरिक्त इतर धनको -**<br>**₹ २४१.१८ कोटी**<br>**नेमलेली कामे (Jobs) / कार्ये (Works) पार पाडण्यासाठी जमा** | |
| २०. | यामध्ये कंपनीने खाजगी संस्थांना दिलेली / देण्यात येणारी कामे यांच्या ऐवजी विविध कामांच्या दिलेल्या सेवा यांच्यासाठी जमा केलेल्या व परत न करावयाचा पर्यवेक्षणाचे आकाराची रक्कम ₹ २८.१७ कोटी चा (नागपूर मंडळ कार्यालय ₹१.५० कोटी + नागपूर उपकेंद्र विभाग ₹२६.६७ कोटी) चा समावेश आहे. अशा प्रकारे पर्यावेक्षणाचा आकार मिळाल्याप्रमाणे नागपूर मंडळ व विभागाची त्यांच्या उत्पन्न म्हणून लेखा नोंद केली नसल्याने इतर उत्पन्न व नफा यांचे ₹२८.१७ कोटी कमी विवरण तर इतर दायित्वाचे तेव्हढयाच रकमेने जास्त विवरण झाले आहे. (अ.उ.व्हो.पा. बांधकाम मंडळ, नागपूर) | वरील ₹ १.५० कोटीच्या संदर्भात मंडळ कार्यालयाने जेव्ही क्र.१२ ऑगस्ट २०११ नुसार पूर्वकालिन उत्पन्नात ₹४९.७३ लाख स्थानांतरित केले आहेत. उर्वरित ₹१.०० कोटीचे समायोजन काम पूर्ण झाल्यावर केले जाईल. कारण ते ओआरसी डिपॉझीट आहे. नागपूर उपकेंद्र उपविभागाने ₹२६.६७ कोटीचे स्थानांतर जेव्ही क्र. १० नुसार सप्टेंबर ११ मध्ये केले आहे. |

| | | |
|---|---|---|
| २१. | **ग्रा.वि.महामंडळाचे कर्ज (REC) ₹१०.१२ कोटी**<br>यात आरंभीची तरतुदी जादा वळती केली असल्याने ₹०.१३ कोटीने लेखामध्ये कमी विवरण झाले आहे. परिणामी पूर्वकालिन खर्चाचे विवरण सुध्दा ₹०.१३ कोटीने कमी झाले आहे. | जादा तरतुद वळती करण्याची सुधारणा जेव्ही क्र. २२९४६३ दि. ३१.१०.२०११ रोजी केली आहे. |
| २२. | **वि.वि. महामंडळाचे कर्ज (PFC)- ₹३६.३५ कोटी**<br>या सारख्या एका लेखात आरंभीची तरतुदी जादा वळती केली असल्याने ₹०.८१ कोटीचे कमी विवरण झाले आहे. परिणामी पूर्वकालिन (जमा) व संचित नफा यांचे ₹०.८१ कोटीने जादा विवरण झालेले आहे. | जादा तरतुद वळती करण्याची सुधारणा जेव्ही क्र. २२९४६४ दि. ३१.१०.२०११ रोजी केली आहे. |
| २३. | **संकीर्ण खर्च - निर्लेखित करावयाच्या मर्यादेपर्यंत (अनुसूची-११)**<br>**अद्याप मंजूर न झालेल्या प्रकल्पांसंबंधी सर्वेक्षण / शक्यता अजमावण्याचे अभ्यासावरील खर्च ₹०.५५ कोटी**<br>लेखा धोरण यातील परिच्छेद क्र. २(सी)(८) यात जाहीर केल्याच्या विपरित कृती कंपनीने प्रकल्पाच्या तीन पारेषण तारमार्ग कार्यान्वित करण्यासाठी सर्वेक्षणांवर केलेला ₹०.२८ कोटीचा खर्च सर्वेक्षण नाकारल्यावर निर्लेखित करण्याऐवजी वरील लेखामध्ये समाविष्ट करण्यात आहे. यामुळे नफ्याचे निर्लेखित न केलेल्या रकमेच्या मर्याद इतके म्हणजे ₹०.२८ कोटीने अधिक विवरण नफ्यामध्ये आणि संकिर्ण खर्चामध्ये झाले आहे. | दि. ३१.०३.२०११ रोजी मंजूरी विचाराधीन असणाऱ्या योजनांचा हा खर्च असून तो लेखाशीर्ष १७.३०० नाव अद्याप मंजूर न झालेल्या प्रकल्पांचे सर्वेक्षण / अभ्यास यावरील खर्च यात स्थानांतरित केला आहे जर भविष्यात अशा योजनांना मंजूरी मिळाली तर सदर खर्चाचे संबधित योजना क्रमांकावर भांडवलीकरण केले जाईल. आणि जर योजना रद्द झाली तर तो खर्च १७.३०० मधून निर्लेखित केला जाईल. नाव ''अद्याप मंजूर न झालेल्या प्रकल्पांचे सर्वेक्षण / अभ्यास यावरील खर्च |
| २४. | **(क) अन्य अभिप्राय**<br>**रोकड प्रवाह विवरण पत्र**<br>**चालू मत्ता, कर्जे व अग्रीमे (अनुसूची-८)**<br>**₹ १२२६.२५ कोटी वस्तू सूची - ₹२१३.७१ कोटी**<br>यामध्ये सदोष /नाकारलेल्या व वापरण्यास योग्य नसलेल्या वाहकतारेचे मूल्य ₹ ०.७४ समाविष्ट आहे. सदोष वाहक तारेच्या समावेशामुळे तेवढया रकमेने साठयाचे जादा विवरण, खर्चाचे कमी विवरण (सदोष साहित्यासाठी तरतूद) आणि नफ्याचे जादा विवरण झालेले आहे. याबद्दल गतवर्षी अभिप्राय दिलेल असलं तरी कंपनीने सुधारणा केली नाही. | सदर प्रकरणी अद्याप पत्रव्यवहार चालू आहे. म्हणून त्याचा एस आर टिपणी तयार केलेल्या नाहीत व त्याचा लेखा मुख्य भांडार औरंगाबाद यांच्या साठ्यातील लेखात केलेला नाही. |

| | | |
|---|---|---|
| २५. | **रोकड व बँकेतील शिल्लकी रकमा - ₹३६४.२५ कोटी**<br>**शेडयुल्ड बँकेतील शिल्लक चालू खाते - ₹३१.१९ कोटी (उणे शिल्लक)**<br>उणे चिन्हांकित शिल्लक, ही दि. ३१ मार्च २०११ रोजी दिलेल्या धनादेशामुळे परंतु त्याचे बँक ऑफ इंडिया मधील मुदतीच्या ठेवीच्या खात्यातून स्वयंचलीत पध्दतीने बाजूला काढणे प्रलंबित असल्याने झाली आहे. ही रक्कम चालू दायित्व म्हणून दाखविणे योग्य होते. यामुळे चालू मत्ता व दायित्वे यांच ₹३१.१९ कोटीने कमी विवरण झाले आहे. | दि. ३१.०३.११ रोजी बँक ऑफ इंडियाच्या रोकड जमा पुस्तकात ₹ ६९.४५ कोटी मार्च २०११ मधील देणी यासाठी अखरेची शिल्लक होती कारण ₹ ७२.८६ कोटीचे धनादेश मार्च २०११ देण्यात आले होते. महापारेषणचे बँक ऑफ इंडियात ऑटो स्वीप करंट अकाऊंट आहे. त्याच्या प्रचलित पद्धतीनुसार जेव्हा शिल्लक ₹ १५ लाखापेक्षा जास्त होते तेव्हा बँक सदर रक्कम स्वयंचलित पद्धतीने ऑटो स्वीप करंट अकांऊटमध्ये स्थानांतरित करते. व जेव्हा महापारेषण आर टी जी एस धनादेश देते तेव्हा त्यातील शिल्लक स्वयंचलित पद्धतीने ऑटो स्वीप फिक्स्ड अकांऊटमधून चालू खात्यात स्थानांतरित होते. |
| २६. | **कर्जे व अग्रीमे - ₹ ३६९.१७ कोटी**<br>**भाडेपट्टीवरील वित्त प्रकल्पासाठी दिलेली अग्रीम - ₹१५३.७८ कोटी**<br>कंपनीने आय एफ सी एल च्या अपरिवर्तनीय ऋणपत्रांच्या पूनर्रचनेसाठी वर्ष २००६ मध्ये ₹०.३० कोटीचे शूल्क भरले होते. सदर कर्ज नंतर महानिर्मिती कंपनीने स्थानांतरीत करण्यात आले व कंपनीने महानिर्मिती कंपनीकडे पूनर्रचना शूल्काची मागणी केली. पण ती मान्य केली गेली नाही. यामुळे किरकोळ प्राप्ती मध्ये ₹०.३० कोटीचे जादा विवरण आणि खर्च व नफा यात कमी विवरण झाले आहे. मागील वर्षी याबाबत अभिप्राय देऊनही कंपनीने सुधारणा केली नाही. आधीच्या वर्षी अभिप्राय देऊनही कंपनीने सुधारणेची कृती केली नाही. | महापारेषणने ₹ २९.७७ लाख एवढी रक्कम २००६ मध्ये आय एफ सी आय यांच्या अपरिवर्तनीय ऋणपत्रांच्या पूनर्रचनेच्या शुल्कापोटी दिली. सदर कर्ज नंतर महानिर्मिती कंपनीकडे स्थानांतरित झाले. कंपनीने महानिर्मितीकडे पूनर्रचना शुल्कासाठी दावा केला असून या प्रकरणी पत्रव्यवहार चालू आहे. |
| २७. | **आधीचे खर्च ₹१०.१३ कोटी**<br>दीर्घ मुदतीच्या कर्जाची पुनर्रचना करण्यासाठी केलेले परंतु निर्लेखित करावयाचे हे खर्च आहेत. ते स्थगीत महसूली खर्च या स्वरुपाचे असल्याने त्याचे तसे वर्गीकरण करायला हवे होते. मागील वर्षी अभिप्राय देऊनही कंपनीने यावर्षी सुधारणा केली नाही. | कंपनीने एल आय सी, पी एफ सी आणि आर इ सी यांच्या कर्जाची पुनर्रचना करण्याकरिता दिलेले अधिमूल्य निर्लेखित करीत आहे. आणि पुनर्रचित अधिमूल्याची ही रक्कम कंपनी अधिनियम १९५६ च्या अनुसूची ६ मधील तरतूदीनुसार गटबांधणीसाठी करत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | अनुसूची ८ मधील चालू मत्ता, कर्जे व अग्रीमे (डी) (४) या लेखाशीर्षात दर्शविण्यात आली आहे. |
| २८. | **संवाधित संस्थांविषयी प्रकटने**<br>कंपनीने संचालक मंडळ ठराव क्र. ४९/११ दि. ३०/१०/०९ नुफा मेसर्स अदानी याचे सोबत संयुक्त साहसी उपक्रमाच्या रचनेस मंजुरी दिली व प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर केला व तो प्रलंबित आहे. वरील ठरावाच्या आधारे मे. अदाणी यांनी 'महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड' नावाची संयुक्त साहसी उपक्रम कंपनीची रचना केली आणि म.वि.नि. आयोगाकडून पारेषणाची परवानगी प्राप्त केली. संयुक्त साहस उपक्रमाच्यासाठी महापारेषण सोबत दि.२/०७/१० रोजी केलेल्या करारातील तरतूदींनुसार महापारेषण कंपनीने सदर प्रकल्पासाठी निविदा प्रसारीत करण्यास परवानगी दिली तसेच कंपनीने मंडळास क्र. ५९/३१ दि. ३१/१२/२०१० नुसार सदर सं.सा.कंपनीकडून मत्ता व ₹५.७६ कोटीचा खर्च यांचे हस्तांतरणास मान्यता दिली. कंपनीकडे चेक क्र. ११३६४६ दि.३१/०३/२०११ यानुसार ₹५.९८ कोटी एवढया रकमेचा भरणा झाला आहे. ही वस्तूस्थिती लेखा मानक १८ अंतर्गत प्रकट केलेली नव्हती. | संयुक्त साहस कंपनी (जेव्ही) नुसार महाराष्ट्र इस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समीशन कं. लि. (एम ई जी पी टी सी एल) या कंपनीने ₹ ५.९८ कोटीचा धनादेश ३१.०३.२०११ रोजी दिला. मात्र प्रत्यक्षात हा धनादेश ३१.०५.२०११ रोजी मिळाला. म्हणून सदर वस्तुस्थिती लेखांमध्ये प्रकट करता आली नाही. |

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीकरिता**

सही/-

**अरविंद सिंह**

अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक

भारताचे लेखानियंत्रक व महालेखापरिक्षक यांचे साठी व त्यांच्यावतीने

सही/-

**(पी.एन.शेषाद्रि)**

महालेखापाल

(वाणिज्य लेखापरिक्षण)

स्थळ :- मुंबई

दिनांक :- ३० डिसेंबर २०११

# लेखा परिक्षकांचा अहवाल

प्रति,
सभासद,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

१. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित कंपनीच्या (यानंतर म.रा.वि.पा.कं.म. असे संबोधले आहे.) दि.३१-०३-२०११ रोजीच्या ताळेबंदाचे व त्यास जोडलेल्या ३१ मार्च २०११ रोजीच्या नफा तोटा व रोकड प्रवाह पत्रकाचे आम्ही लेखा परीक्षण केले. या वित्तीय विवरण पत्राची जबाबदारी कंपनी व्यवस्थापनाची आहे. आम्ही केलेल्या लेखा परिक्षणाच्या आधारे आर्थिक विवरण पत्रावर आमचे मत देणे ही आमची जबाबदारी आहे.

२. सर्वसाधारणपणे भारतामध्ये मान्य करण्यात आलेल्या लेखापरिक्षण विषयक पध्दतीनुसार आम्ही लेखा परिक्षण केले आहे. सदर पध्दतीनुसार आमच्याकडून अपेक्षा अशी आहे की वित्तीय विवरण वस्तुगत असत्यकथन पासून मुक्त असल्याची योग्य ती खातरजमा करण्याच्या दृष्टीकोनातून आम्ही योजना व कृती करावी. वित्तीय विवरण पत्रामध्ये दिलेल्या रकमेचे व खुलाशांचे आधारभूत पुरावे नमुन्यादाखल तपासणे या बाबींचा परिक्षणामध्ये समावेश असतो. तसेच उपयोगात आणलेली लेखा तत्त्वे, व्यवस्थापनाने केलेले महत्वाचे अंदाज आणि एकूणच विवरण पत्राचे सादरीकरण याचे मुल्यमापन करणे याचा परिक्षणामध्ये समावेश असतो. आम्हाला विश्वास आहे की आमच्या अभिप्रायाला आमच्या लेखा परिक्षणाचा योग्य आधार आहे.

३. कंपनी अधिनियम १९५६ कलम २२७ उपकलम (४अ) अंतर्गत भारत सरकारने बनविलेल्या कंपनी (लेखा परिक्षकांचा अहवाल) आदेश २००३ आणि कंपनी (लेखा परिक्षकांचा अहवाल) (दुरुस्त) आदेश २००४ मध्ये केलेल्या सुधारणा अंतर्गत नमूद केलेल्या आदेशातील परिच्छेद ४ व ५ मधील कंपनीला लागू असणाऱ्या बाबी संबंधीचे विवरण परिशिष्ट म्हणून जोडले आहे.

४. खालील बाबींकडे आम्ही आपले लक्ष विशेष करुन वेधू इच्छितो.

अ) महाराष्ट्र शासनाने ४ जून २००५ रोजी अधिसूचित केलेल्या महाराष्ट्र विद्युत सुधारणा हस्तांतरण योजना २००५ नुसार (यानंतर हस्तांतरण योजना असे संबोधले आहे) पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामधील पारेषण उपक्रमातील भाग असलेले उपक्रम, ज्यांचे विवरण त्या अधिसूचनेच्या परिशिष्ट अ मध्ये दिले आहे. ६ जून २००५ पासून महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड मध्ये हस्तांतरीत झाले. या हस्तांतरणमुळे ₹२६,९५,९९,२०,४५५/- (दायित्वापेक्षा मालमत्ता जास्त असल्यामुळे) दर्शनी किंमत असलेले समभाग म.रा.वि.मं.सुत्रधार कंपनीच्या नावे वाटप करावयाचे होते (यानंतर सुत्रधार कंपनी असा उल्लेख करण्यात येईल). ही वाटणी अद्याप व्हायची असल्याने सदर रक्कम शेअर सस्पेंस अकाऊंट अशी दाखवली आहे

ब) वरील हस्तांतर योजने अंतर्गत मालमत्ता व दायित्वे कंपनीला ६जून २००५ पासून हस्तांतरीत केलेली आहे. जे राज्य शासनाच्या अंतिम मान्यतेच्या अधिन आहे अशी अधिसूचनेमध्ये राज्य शासनाने अद्याप अधिसूचित करावयाची आहे. अधिसूचनेमधे अशा रक्कमामध्ये काही बदल झाल्यास त्याचा परिणाम वित्तीय विवरणावर होईल.

५. कंपनीची सुरक्षित कर्जे, असुरक्षित कर्जे, ऋणको, किरकोळ ऋणको, कर्जे व अग्रीमे यातील काही शिल्लकी, बारामती मुख्य भांडारातील वस्तुसूची आणि विविध इतर खर्च /जमांच्या शिल्लकी, सुत्रधारी कंपनी इतर सहकंपन्या यातील शिल्लकींसह या

सर्व त्यांचा मेळ घातल्यानंतर करावयाच्या समायोजनाच्या अधीन आहेत. मेळ घातल्यावरचे समायोजन व जुनी बाकी वसुली करणे व अशा बाकीची वसूली पूर्णत: न होणे किंवा अंशत: होणे यामुळे होणाऱ्या तोटयाचा अंदाज करता आलेला नाही. वरील अशा रकमांचा प्रभाव ताळेबंदात त्या प्रमाणे प्रकट केला असून त्याच्या वर्षाच्या नफ्यावर होणारा परिणामाची संख्या मोजणी करता आलेली नाही,

६. वरील परिच्छेद ४ ते ५ मध्ये उल्लेखलेल्या परिशिष्टातील आमच्या निरीक्षणांना अनुसरुन आम्ही असा अहवाल देतो की,

अ) वरील परिच्छेद ४ (ब) आणि ५ मधील आमच्या निरीक्षणांची नोंद घेऊन जी आमच्या सर्ववेक्षक दृष्टीने आणि विश्वासानुसार आमच्या हिशेब तपासणीसाठी जरुर होती अशी सर्व माहिती व स्पष्टीकरणे मिळाली आहेत.

ब) आमच्या मते कंपनीची लेखा पुस्तके कायद्यातील तरतुदींनुसार योग्य अशी आहेत हे आमच्या तपासणी दरम्यान, जेवढे आढळले त्यावरुन सांगू शकतो.

क) या अहवालामध्ये उल्लेख केलेल्या ताळेबंदाचा नफा व तोटा पत्रक व रोकड प्रवाह ही विवरणपत्रे लेखा पुस्तकाशी सुसंगत आहेत

ड) आमच्या मते ताळेबंद, नफा तोटा पत्रक व रोकड प्रवाह ही विवरणपत्रे कंपनी अधिनियम १९५६ मधील कलम २११ उपकलम ३ क यामध्ये उल्लेखलेल्या लेखांकन मानकाच्यानुसार आहेत.

इ) भारत सरकारने जारी केलेल्या अधिसूचना नंबर जीएसआर ८२९(इ) दि. २१-१०-२००३ अनुसार कंपनी अधिनियम १९५६ कलम २७४(१)(ग) च्या तरतुदी कंपनीला लागू नाहीत.

फ) वरील परिच्छेद ४ (ब) आणि ५ वर आमचे शेरे, ज्यामुळे वित्तीय विवरणावर होणाऱ्या परिणामाचे मोजमाप केलेले नाही, या सापेक्ष आमच्या मते आणि जरुर असणाऱ्या आमच्या महितीनुसार आणि आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार ही लेखा पत्रके ज्यांचे लेखा विवरण पत्र / निती आणि लेख्यावरील टिप्पणी जे दोन्ही लेख्याचेच भाग आहेत. यांचा एकत्र विचार केल्यानंतर कंपनी अधिनियम १९५६ प्रमाणे आवश्यक माहिती आवश्यक असलेल्या पध्दतीप्रमाणे देतात आणि खालील बाबी संबंध सत्य व उचित परिस्थिती दर्शवितात.

१ ताळेबंदाच्या बाबतीत ३१ मार्च २०११ रोजी कंपनीची स्थिती दर्शविते.

२ नफा-तोटा पत्रकानुसार हे त्या वर्षी संपलेल्या काळात नफा दाखवितात.

३ रोकड प्रवाह विवरणपत्रात सदर दिनांकाला संपलेल्या वर्षाचा रोकड प्रवाह आहे.

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार<br>
शहा आणि टापडिया<br>
सनदी लेखापाल<br>
सभासद क्र. १०९४६३ डब्ल्यु

रमेशचद्र एस.जोशी<br>
भागीदार<br>
सभासद क्र.३३५९४<br>
स्थळ : मुंबई<br>
दिनांक : ०३/०९/२०११

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
## ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाच्या लेखा परीक्षा अहवालाच्या
## परिच्छेद क्र.३ मध्ये उल्लेखलेले जोडपत्र

१(अ) कंपनीने आपल्या प्रत्येक विभागामध्ये पूर्वीच्या राज्य विद्युत मंडळाची (म.रा.वि.मं) स्थावर मालमत्ता नोंदवही पुढे चालू ठेवली आहे. ही नोंद वही (यामध्ये भांडवली प्रगती पथावरील कामाची ज्यात नोंद होते अशा नोंद वह्याचा समावेश आहे) मात्र स्थावर मत्तेसंबंधी संपूर्ण योग्य तपशील तसेच संख्यात्मक तपशील व परिस्थिती दाखविण्यासाठी त्या अद्ययावत करणे गरजेचे आहे.

१(ब) २००६-०७ म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी मर्यादित (सूत्रधार कंपनी) या कंपनीने, म.रा.वि.पा.कंपनी या कंपनीच्या स्थिर मूल्यांकन करण्यासाठी, बाहेरील सल्लागाराची नेमणूक केली होती. या तज्ञाच्या अहवालानुसार, स्थिर मत्तेचे मूल्य ठरविण्यासाठी त्यापैकी ९० टक्के मालमत्तेची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली. कंपनीच्या सल्लागारानी प्रत्यक्ष तपासणी केलेल्या स्थिर मालमत्तेची, कंपनीने ठेवलेल्या (वरील कलम १(अ)) नुसार स्थिर मालमत्तेची नोंदवहीत नोंद केलेली नाही.

१(क) कंपनीची एकूण स्थिर मत्ता लक्षात घेता या कालावधीत, निकालात काढलेली स्थावर मत्ता ही कंपनीच्या एकूण मत्तेवरील भरीव भाग नसल्यामुळे आमच्या मते, त्याचा कंपनीच्या चालू स्थितीवर काहीही परिणाम होणार नाही.

२(अ) आम्हाला दिलेल्या माहितीनुसार व सादर केलेल्या अहवालानूसार व्यवस्थापनाने मार्च २०११ मध्ये चार भांडार मंडळे चार भांडार केंद्र व फ्रॅब्रिकेशन वर्कशॉप मधील वस्तुसूचीची प्रत्यक्ष तपासणी केली.

२(ब) आमच्या मतानुसार, व्यवस्थापनाने, अमलात आणलेली वस्तूसूचींच्या प्रत्यक्ष तपासणीची पध्दत कंपनीने आकारमान व तिच्या व्यवसायाचे स्वरुप पाहता अधिक बळकट करणे गरजेचे आहे.

२(क) आमच्याकडे दिलेल्या वस्तुसूचीचे आम्ही चाचणी दाखल परिक्षण केले. त्याआधारे आमच्या मते कंपनीने वस्तुसूचीचे व्यवस्थित अभिलेख ठेवलेले आहेत.सामानाची प्रत्यक्ष तपासणी व सामानाची नोंद या मधील त्रुटी कंपनी संचालनाची एकूण व्याप्ती पाहता महत्वाच्या नाहीत असे आम्हाला स्पष्टीकरण देण्यात आले.

३ आम्ही जे अभिलेख तपासले त्यानुसार कंपनी अधिनियम १९५६ कलम ३०१ नुसार तयार केलेल्या रजिस्टर मध्ये नोंद असलेल्या कंपन्या, संस्था व इतर संस्थाकडून कर्ज घेतलेले किंवा दिलेले नाही

४ आमच्या मते व आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, कंपनीचा आकार व व्यवसायाच्या स्वरुपाच्या प्रमाणात, स्थिर मत्तेच्या व सामानाच्या खरेदीचे लेखांकन करण्यासाठी अंतर्गत नियंत्रण कार्यप्रणाली मजबूत करणे आवश्यक आहे. तसेच आम्ही केलेली तपासणी व आम्हाला दिलेल्या स्पष्टीकरणानुसार वर सांगितलेल्या अंतर्गत नियंत्रण प्रणाली कमकुवत किंवा तिला सातत्याने अपयश आलेले दिसले नाही.

५ आम्हाला दिलेल्या माहितीप्रमाणे व स्पष्टीकरणे कंपनी अधिनियम १९५६, कलम ३०१ नुसार ठेवलेल्या नोंदवहीत नोंद करणे आवश्यक आहेत असे करारनामे दुसऱ्या कंपनीबरोबर किंवा इतर कोणाबरोबर केलेले नाहीत. म्हणून खंड ४(५) (अ) आणि ४(५)(ब) या वर्षासाठी कंपनीला लागू नाहीत.

६ कंपनीकडून जी माहिती व स्पष्टीकरण मिळाली त्याप्रमाणे कंपनी अधिनियम १९५६ आणि नियम यामधील कलम ५८ अ मधील तरतुदींप्रमाणे जनतेकडून ठेवी स्विकारलेल्या नाहीत.

७) चालु वर्षी कंपनीने अंतर्गत लेखा परिक्षण कामासाठी बाहेरील सनदी लेखापालाच्या फर्मची नेमणूक केली. आमच्या मते व आम्ही केलेल्या विविध अंतर्गत लेखा अहवालाच्या पाठपुराव्यास अनुसरुन लेख्यामध्ये अधिक अचूकता येण्यासाठी व वेळेवर होण्यासाठी अंतर्गत लेखा परिक्षकांनी कंपनीचे आकारमान व व्यवसायाचे स्वरुप लक्षात घेऊन आतापर्यंत अंगीकारलेल्या लेखापरिक्षणाची पध्दत व व्याप्ती यात सुधारणा करणे आवश्यक आहे.

८) आम्हाला जे अभिलेखे देण्यात आले त्यानुसार प्रथमदर्शनी आमचे असे मत झाले आहे की केंद्र सरकारने कायद्यातील कलम २०९ (१) (ड) खाली विहीत केलेल्या नमुन्याप्रमाणे मुल्याचे अभिलेखे व लेखे कंपनीने तयार केले आहेत. तथापि या अभिलेख्याचे व लेख्याचे सविस्तर परिक्षण आम्ही करणे गरजेचे नाही व तसे परिक्षण आम्ही केलेले नाही.

९(अ) आम्हाला दिलेल्या माहिती व स्पष्टीकरणाप्रमाणे तसेच आम्ही तपासणी केलेली पुस्तके व अभिलेखानुसार कंपनीने मुळातून वजावट केलेला कर ₹२१,८२,८०६.०० व वर्क कॉन्ट्रॅक्ट टॅक्स ₹८,७७,०९२.०० वगळता इतर निर्विवाद स्वरुपाची देणी जसे भविष्य निर्वाह निधी इन्व्हेस्टर एज्युकेशन व प्रोटेक्शन फंड, विक्रीकर, संपत्तीकर, सेवाकर, जकातकर, सीमाशुल्क, जमीनीवरील शुल्क इ. सर्वसाधारणरित्या नियमितपणे योग्य त्या प्राधिकाऱ्याकडे भरणा केलेला दिसत आहे.

९(ब) ₹१५.९० कोटी रकमेची विवादीत वैधानिक देणी की जी.विवादीत कारणास्तव योग्य प्राधिकारी यांचे कडे आहेत अशांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | संविधानाचे नाव | देय रकमेचे स्वरुप रक्कम | रक्कम (₹ कोटी) आहे | कुठल्या कालावधीकरिता न्याय संस्थेचे नांव | विवादीत देणी बाकी असलेल्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | कामगार राज्य विमा अधिनियम | कामगार राज्य विमा | ०.२२ | वित्तीय वर्ष पासून (६८-९६) विविध वर्षे | कामगार राज्य विमा न्यायालय पुणे |
| २. | आयकर अधिनियम १९६१ | आयकर | १४.७७ | कर निर्धारण वर्ष २००८-०९ | आयुक्त आयकर अपील याचेकडे ते सदर मागणीचे समायोजन निर्धारण वर्ष २००९-१० च्या परताव्यात १४३(१) अन्वये केले |
| ३. | आयकर अधिनियम १९६१ | फ्रिंज बेनीफिट कर | ०.१८ | कर निर्धारण वर्ष (०६-०७) | कलम १५४ अंतर्गत दुरुस्तीचे पत्र दाखल केले व ₹०.०७ कोटी सदर मागणी पोटी भरले |
| ४. | आयकर अधिनियम १९६१ | फ्रिंज बेनीफिट कर | ०.७३ | कर निर्धारण वर्ष (०७-०८) | कलम १५४ अंतर्गत दुरुस्तीचे पत्र दिले |
| | **एकूण** | | **१५.९०** | | |

१०  ३१ मार्च २०११ रोजी कंपनीच्या नांवे संचित तोटा नाही. तसेच याच दिवशी संपणाऱ्या आर्थिक वर्षात किंवा या आर्थिक वर्षाच्या आधीच्या लगतच्या कालावधीत कंपनीला रोकडीच्या रुपात नुकसान झालेले दिसत नाही.

११  आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व खुलाशा वरुन या वर्षात बँका, वित्तीय संस्था आणि कर्ज रोखे धारकांच्या देय रकमांची परतफेड करण्यात कंपनीने कसूर केलेली नाही असे आमचे मत आहे.

१२  आम्हाला देण्यात आलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीने समभाग, कर्जरोखे किंवा इतर प्रतिभूती तारणावर कोणत्याही प्रकारची कर्जे किंवा अग्रीमे मंजूर केलेली नाहीत.

१३  कंपनी ही चीट फंड कंपनी नाही किंवा निधी/म्युच्युअल बेनीफिट फंड/सोसायटी नसल्यामुळे आदेशामधील कलम ४(१३) कंपनीला लागू नाही.

१४  आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणाच्या आधारे आमचे असे मत आहे की प्रतिभूती च्या संदर्भात कंपनी विक्रेता किंवा व्यवसायी नाही.

१५  आम्हाला देण्यात आलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार बँका किंवा वित्तीय संस्था यांच्याकडून इतरांनी घेतलेल्या कर्जासाठी कंपनीने कोणतीही हमी दिलेली नाही.

१६  आमच्या मते आणि आम्हाला देण्यात आलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणानुसार कंपनीच्या ताळेबंदाच्या सर्वसाधारण परिक्षणाप्रमाणे कंपनीने घेतलेली मुदतीची कर्जे ज्या कारणासाठी घेतली त्याच कारणासाठी वापरली आहेत असे प्रथम दर्शनी दिसत आहे.

१७  आम्हाला देण्यात आलेल्या माहिती व स्पष्टीकरणानुसार आमच्या मते कंपनीने अल्प मुदतीसाठी उभारलेल्या कर्जाचा विनियोग दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीसाठी केलेला नाही.

१८  ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षात कंपनीने कोणालाही अधिक पसंती दाखवून भागाचे वाटप केलेले नाही.

१९  कंपनीने कोणतेही कर्ज रोखे काढले नाहीत त्यामुळे कर्ज रोख्यांच्या हमी पत्राचा प्रश्न उदभवत नाही.

२०  आमच्या अहवालाच्या वर्षामध्ये निधी उभारण्यासाठी कंपनीने भागाची विक्री केलेली नाही.

२१.  भारतामध्ये सर्वसामान्यपणे मान्य असलेल्या लेखा परिक्षण पध्दतीनुसार आम्ही कंपनीच्या पुस्तकांचे व अभिलेख्यांचे परिक्षण करीत असताना तसेच आम्हाला देण्यात आलेल्या माहिती आणि स्पष्टीकरणावरुन या वर्षामध्ये कंपनीने कोणाची फसवणूक केल्याची किंवा कंपनीची कोणाकडून फसवणूक झाल्याचे आढळत नाही.

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार
**शहा आणि टापडीया**
सनदी लेखापाल
सभासद क्र. १०९४६३ डब्ल्यु

रमेशचद्र एस.जोशी
भागीदार
सभासद क्र.३३५९४
स्थळ : मुंबई
दिनांक : ०३/०९/२०११

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितचा
## आर्थिक ताळेबंद ३१ मार्च २०११ कालावधीचा

| तपशील | अनुसूची क्रमांक | ३१ मार्च २०११ | ३१ मार्च २०१० |
|---|---|---|---|
| | | ₹ | ₹ |
| **१. निधी स्त्रोत** | | | |
| **(१) भागधारकांचा निधी** | | | |
| **अ) भाग भांडवल** | १ | ५००,००० | ५००,००० |
| ब) भाग भांडवल निलंबित हिशेब (नोंद नं. ३(अ) पहा | | २६,९५९,९२०,४५५ | २६,९५९,९२०,४५५ |
| **क) राखीव आणि अतिरिक्त** | २ | ७,१४८,९४५,६५४ | ३,८५५,५३४,३२१ |
| **(२) कर्ज निधी** | | | |
| **अ) सुरक्षित कर्जे** | ३ | ५८,३९६,४१०,२७२ | ३८,५५२,५१६,०८९ |
| **ब) असुरक्षित कर्जे** | ४ | १,०४१,१६३,५७३ | १,१११,१६३,५७३ |
| (३) प्रलंबित कर दायित्व (नक्त) नो नं. ५(जे) पहा | | ८,०४२,१६५,७९८ | ७,१७०,४६०,५८० |
| एकूण | | १०१,५८९,१०५,७५२ | ७७,६५०,०९५,०१८ |
| **२. निधी वापर विवरण** | | | |
| **(४) अ) स्थावर मालमत्ता** | | | |
| एकूण गट | ५ | १३९,१८६,०९४,९०८ | ११५,६९६,५४०,९६४ |
| वजा : घसारा | | ६१,७२१,२४२,१५० | ५८,६९३,६९९,९०१ |
| नक्तगट | | ७७,४६४,८५२,७५८ | ५७,००२,८४१,०६३ |
| ब) प्रगतिपर कामाचे भांडवल | ६ | ३६,८३९,८५१,८५४ | ३०,९५१,४२१,५७४ |
| क) वापरात नसलेली मत्ता | | ३९१,६४७,९३७ | १२७,९०१,०३८ |
| (५) गुंतवणूकी | ७ | ३०२,७००,९४० | १५२,१७६,८०० |
| (६) चालू मत्ता / कर्जे व अग्रीम | ८ | | |
| अ) माल सामान यादी / याद्या | | २,१३७,०९१,८३५ | १,९८९,९११,७०९ |
| ब) किरकोळ येणी/देणेदार | | २,७९१,२०७,११४ | १,३३८,९८५,८२३ |
| क) रोख व बँकेतील शिल्लक | | ३,६४२,४८९,८८८ | ३,५९०,७७८,७०८ |
| ड) कर्ज व अग्रिम रक्कमा | | ३,६९१,७१८,६०३ | ६,९००,८४६,१४३ |
| **(अ)** | | १२,२६२,५०७,४४० | १३,८२०,६०२,३८३ |
| (७) वजा : चालू देणी/दायित्वे व त्यासंबंधी योजना | | | |
| अ) चालू दायित्वे | ९ | २०,५५३,६७८,७५९ | १९,५५५,०७०,२६२ |
| ब) तरतूदी | १० | ५,१२४,२३३,९१८ | ४,८४९,७७७,५७८ |
| **(ब)** | | २५,६७७,९१२,६७७ | २४,४०४,८४७,८४० |
| (८) नक्त चालु मत्ता (अ) – (ब) | | (१३,४१५,४०५,२३७) | (१०,५८४,२४५,४५७) |
| (९) अन्य संकिर्ण खर्च (निर्लेखित/समायोजित न केलेले) | ११ | ५,४५७,५०० | -- |
| **एकूण** | | १०१,५८९,१०५,७५२ | ७७,६५०,०९५,०१८ |
| **(१०) हिशेबावरील टीप** | २० | -- | -- |

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार
**शहा आणि टापडिया**
सनदी लेखापाल
(सभासद क्र. १०९४६३ डब्ल्यु.)
**रमेशचद्र एस जोशी**
भागीदार
सभासद क्र. ३३५९४
ठिकाण : मुंबई
दिनांक : ०३/०९/२०११

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित करीता**

सही/–
**प्रताप मोहिते**
संचालक (वित्त)

सही/–
**अरविंद सिंह**
अध्यक्ष आणि
व्यवस्थापकीय संचालक

सही/–
**डॉ. ज्योती अरोरा**
कंपनी सचिव

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितचा
## नफा-तोटा विवरण पत्र ३१ मार्च २०११ रोजी संपणाऱ्या वर्षासाठी

| | तपशील | अनुसूची क्रमांक | २०१०-२०११ ₹ | २००९-२०१० ₹ |
|---|---|---|---|---|
| | **उत्पन्न / मिळकत** | | | |
| (१) | व्यवहारातून मिळणारा महसूल | १२ | २०,९७७,७६९,८५१ | १५,९९७,३१५,६३८ |
| (२) | इतर उत्पन्न | १३ | ५०४,५२६,२८४ | १,०८३,६७४,५५९ |
| | | | २१,४८२,२९६,१३५ | १७,०८०,९९०,१९७ |
| | **खर्च** | | | |
| (३) | देखभालीचे खर्च | १४ | २,८७७,७०१,७८५ | ३,०४३,३१५,२१४ |
| (४) | कर्मचाऱ्यांवरील खर्च | १५ | ५,२९०,३५३,९६७ | ३,९३९,७३५,९६० |
| (५) | प्रशासन खर्च | १६ | १,३६६,७९१,९३३ | १,०३४,४३२,४५५ |
| (६) | घसारा आणि इतर हस्तांतरण खर्च | १७ | ३,६८६,३५७,६७५ | २,९९६,१५४,७७७ |
| (७) | व्याज आणि वित्तीय आकार | १८ | २,८२९,९६२,८३८ | २,०९९,८६५,२३० |
| | | | १६,०५१,१६८,१९८ | १३,११३,५०३,६३६ |
| | **करपूर्व नफा** | | **५,४३१,१२७,९३७** | **३,९६७,४८६,५६१** |
| **(८)** | **वजा : करभरणा तरतूद** | | | |
| | (अ) चालू कर भरण्यासाठी | | १,०३६,७६०,००० | ६४०,०००,००० |
| | (ब) स्थगित कर भरण्यासाठी | | ८७१,७०५,२१८ | ५९०,२१३,६५५ |
| | (क) फ्रिंज बेनीफिट कर भरण्यासाठी | | -- | -- |
| | **निव्वळ नफा कर भरल्यानंतर** | | ३,५२२,६६२,७१९ | २,७३७,२७२,९०७ |
| (९) | मागील वर्षात कराची केलेली अल्प तरतूद | | -- | |
| (१०) | गतकालीन आकार (नक्त) | १९ | २२९,२५१,३८६ | २८७,१३८,२२१ |
| | **या वर्षातील नफा** | | **३,२९३,४११,३३३** | **२,४५०,१३४,६८६** |
| (११) | अधिक : गतवर्षाची पुढे घेतलेली रक्कम | | २,१६३,४३४,३२१ | ९३,८९९,६३५ |
| (१२) | वजा : विशेष राखीव निधीसाठी अंशदान | | - | १३५,२००,००० |
| (१३) | वजा : आकस्मिक (संभाव्य) खर्चासाठी राखीव अंशदान | | २६५,५००,००० | २४५,४००,००० |
| (१४) | वजा : राहिलेला करभरणा दायित्व | | - | - |
| | **शिल्लक ताळेबंद तक्त्यावर** | | **५,१९१,३४५,६५४** | **२,१६३,४३४,३२१** |
| | प्रति समभाग उत्पन्न (रुपयात) नोंद नं. ५ (इ) पहा | | | |
| (१६) | प्रति समभाग | | ६५,८६८ | ४९,००३ |
| (१७) | प्रति समभाग कमी झालेले उत्पन्न | | १.२२ | ०.९१ |
| (१८) | हिशोबावरील टिप्पणी | २० | | |

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार
**शहा आणि टापडिया**
सनदी लेखापाल
(सभासद क्र. १०९४६३ डब्ल्यु.)
**रमेशचद्र एस जोशी**
भागीदार
सभासद क्र. ३३५९४
ठिकाण : मुंबई
दिनांक : ०३/०९/२०११

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित करीता**

सही/-
**प्रताप मोहिते**
संचालक (वित्त)

सही/-
**अरविंद सिंह**
अध्यक्ष आणि
व्यवस्थापकीय संचालक

सही/-
**डॉ. ज्योती अरोरा**
कंपनी सचिव

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितचा
## ताळेबंद अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

| अ.क्र. | तपशील | ३१ मार्च २०११ रोजी ₹ | ३१ मार्च २०१० रोजी ₹ |
|---|---|---|---|
| १ | **भाग भांडवल** | | |
| | **अधिकृत** | | |
| | ५०,००० समभाग प्रत्येकी ₹ १० किंमतीचा प्रत्येकी | **५००,०००** | **५००,०००** |
| | **प्रचलित, अभिदत्त आणि भरणा झालेली** | | |
| | ५०,००० समभाग प्रत्येकी ₹ १० किंमतीचा (वरील सर्व समभाग हे नामनिर्देशित महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने धारण केलेले असून सर्व विभाजन/बदल झाल्यावर ते महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या सुत्रधार कंपनी कडे जातील) | ५००,००० | ५००,००० |
| | **एकूण** | **५००,०००** | **५००,०००** |
| २ | **राखीव आणि अतिरिक्त** | | |
| | **(१) संभाव्य राखीव निधी** | | |
| | प्रारंभिक शिल्लक | १,३५५,५००,००० | १,११०,१००,००० |
| | अधिक वर्षेभरात झालेली भर (नोंद ३ (ब)) पहा | २५९,९००,००० | २४८,१००,००० |
| | अधिक / वजा : जादा / कमी केलेली तरतूद अधिच्या वर्षी (कमी केली) (नोंद क्र.( ३ ब) पहा) | ५,६००,००० | (२,७००,०००) |
| | | **१,६२१,०००,०००** | **१,३५५,५००,०००** |
| | **(२) खास राखीव निधी** | | |
| | प्रारंभिक शिल्लक | ३३६,६००,००० | २०१,४००,००० |
| | अधिक यावर्षी त्यात पडलेली भर (नोंद क्र. ३ (ब) पहा) | – | १३५,२००,००० |
| | | **३३६,६००,०००** | **३३६,६००,०००** |
| | **(३) नफा-तोटा पत्रकातील शिल्लक** | ५,१९१,३४५,६५४ | २,१६३,४३४,३२१ |
| | **एकूण** | **७,१४८,९४५,६५४** | **३,८५५,५३४,३२१** |
| ३ | **सुरक्षित कर्जे** | | |
| | **नोंद क्र. ३ (क) पहा** | | |
| | (१) मुक्त बाजार रोखे (ओ.एम.बी.) (एका वर्षात परतफेड ₹ १०२.४२कोटी) (मागील वर्षी ₹९३.११ कोटी) | १,०२४,२००,००० | १,९५५,३००,००० |
| | (२) भारतीय आयु विमा महामंडळ (एल.आय.सी.) कडून एकावर्षात परफेडण्याच्या बोलीने रक्कम ₹ २०.५१ कोटी मागील वर्षी रक्कम ₹२४.७० कोटी) | ७५९,०५९,९९३ | १,००६,०९९,९९७ |
| | (३) ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ मर्यादित (आर.ई.सी.)एक वर्षात परतफेडीच्या बोलीने रक्कम ₹ १८६.९७ कोटी, मागील वर्षाची रक्कम ₹ ८४.४१ कोटी) | २९,६५०,२२९,९१२ | २२,६९०,१८८,६०४ |
| | (४) वीज वित्तिय महामंडळ मर्यादित (पी.एफ.सी.)एक वर्षात परतफेडीच्या बोलीने ₹ १३१.४५ कोटी मागील वर्षाची ₹ १९६.२८ कोटी | १६,९६७,००८,३७७ | ९,५००,३९३,६९० |
| | (५) आई. एफ. सी. कडून कर्ज | २,४४६,०००,००० | |
| | (६) युनियन बँक ऑफ इंडिया कडून कर्ज | ७८९,३१४,६६५ | |
| | (७) बँक ऑफ बडोदा कडून कर्ज | २४७,१८९,१५७ | |
| | (८) बँक ऑफ महाराष्ट्र कडून कर्ज | ७००,५८१,०५९ | |
| | (९) जपान अंतरराष्ट्रीय सहकारी संस्थेकडून कर्ज (JICA) एक वर्षात परतफेडीच्या बोलीची रक्कम. ₹ निरंक | ५,८१२,८२७,१०९ | ३,४००,५३३,७९८ |
| | **एकूण** | **५८,३९६,४१०,२७२** | **३८,५५२,५१६,०८९** |
| ४ | **असुरक्षित कर्जे** | | |
| | व्यापारी बँकाकडून कर्जे (बँक ऑफ महाराष्ट्र/युनीयन बँक) | १,०००,०००,००० | १,०७०,०००,००० |
| | (एका वर्षात परत करण्याजोगी रक्कम ₹ १००.०० कोटी मागील वर्षी ₹ ०७.०० कोटी) | | – |
| | भांडवली दायित्व देणी | | |
| | के.ई.सी. इंटरनॅशनल कडुन कर्ज | ४१,१६३,५७३ | ४१,१६३,५७३ |
| | (एका वर्षात परत करण्याजोगी रक्कम निरंक आहे) | | |
| | **एकूण** | **१,०४१,१६३,५७३** | **१,१११,१६३,५७३** |

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
## ताळेबंद अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

अनुसूची ५ : स्थावर मत्ता

(रक्कम ₹ मध्ये)

| | एकूण गट (मूळ किंमत) | | | | घसारा / कर्जफेड | | | | नक्त गट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मत्ता | ०१-०४-१० रोजी | वाढ | वजावट समायोजन | ३१-०३-११ रोजी | ०१-०४-१० रोजी | घसारा कालावधी करिता | वजावट / समायोजन | ३१-०३-११ रोजी | ३१-०३-११ रोजी | ३१-०३-१० रोजी |
| मूर्त मत्ता | | | | | | | | | | |
| जमीन | ९४,१२,५१,४९९ | ४,०७,१२,३५९ | (४२,८७,०६,८९५) | ५५,३२,५६,९६३ | - | - | - | - | ५५,३२,५६,९६३ | ९४,१२,५१,४९९ |
| भाडे पट्टी जमिन विकास खर्च | ५५,१०,०५,४८३ | १०,०८,८९,५७८ | ३७,२८,१९,७३० | १,०२,४७,१४,७९१ | ६,६३,५५,३४८ | ६५,२५,३४३ | ४,३२,९९६ | ७,३३,१३,६८७ | ९५,१४,०१,१०४ | ४८,४६,५०,१३५ |
| इमारती | २,९२,१४,०५,६८२ | २४,११,५९,५३० | (३२,३०,३९४) | ३,१५,९३,३४,८१८ | १,५२,६६,८७,१२० | ९,६८,२६,२१९ | ३,२३,१९,१९० | १,६५,५८,३२,५२९ | १,५०,३५,०२,२८९ | १,३९,४७,१८,५६२ |
| जल विषयक कामे | २३,५८,२६,७१६ | १,३३,०४,४९९ | (८१,६५९) | २४,९०,४९,५५६ | ८,५२,३७,९४१ | ६५,४३,४८७ | १,२८,५४५ | ९,१९,०९,९७३ | १५,७१,३९,५८३ | १५,०५,८८,७५५ |
| इतर बांधकामे | | | | | | | | | | |
| रेल्वे सायडिंग | २,८१,९८,८०१ | | | २,८१,९८,८०१ | ७२,०७,२९८ | ५,०७,५७६ | | ७७,१४,८७४ | २,०४,८३,९२७ | २,०९,९१,५०३ |
| रस्ते व इतर | ३,३३,५१,०१,०२७ | ९८,०६,५०,००२ | (५,६५,६२,४५१) | ४,२५,९१,८८,५७८ | ८९,०८,७२,११७ | ७,१६,२१,१७७ | १५,१०,८९६ | ९६,४०,०४,१९० | ३,२९,५१,८४,३८८ | २,४४,४२,२८,९१० |
| सयंत्र, मशीन व सामान | ६५,७६,८१,३४,३४९ | १८,२६,३३,६२,१७२ | (१,२६,४८,३४,०१९) | ८२,७६,६६,६२,५०२ | ३४,६२,७३,३४,६९८ | २,३९,०७,४४,८०४ | (६२,३२,११,३९८) | ३६,३९,४८,६८,१०४ | ४६,३७,१७,९४,३९८ | ३१,१४,०७,९९,६५१ |
| लाईन्स आणि केबल्स नेटवर्क | ४१,४६,५८,९९,७६२ | ५,३२,५२,८५,८२२ | (१९,१४,८७,९२६) | ४६,५९,९६,९७,६५८ | २१,२१,०६,५५,१७४ | १,०८,७५,१९,१२१ | (५,७३,७५,१२२) | २२,२४,०७,९९,१७३ | २४,३५,८८,९८,४८५ | २०,२५,५२,४४,५८८ |
| वाहने | १४,०७,९९,७९० | १३,१२,००७ | (१,२४,२२८) | १४,१९,८७,५६९ | १२,५८,३५,४११ | ४,६७,१७६ | (१०,४५,१०२) | १२,५२,५७,४८५ | १,६७,३०,०८४ | १,४९,६४,३७९ |
| फर्निचर व इतर सामान | १२,४७,७२,०९२ | ३,९०,६४,९१७ | ९१३ | १६,३८,३७,९२२ | ८,४८,२७,७५६ | ४३,८८,६१२ | (४,०९,४६६) | ८,८८,०६,९०२ | ७,५०,३१,०२० | ३,९९,४४,३३६ |
| कार्यालयीन साहित्य (संगणक साहित्य) | १४,५९,०८,२६९ | ५,४१,६४,९२९ | १८,५५,०५८ | २०,१९,२८,२५६ | ६,१०,०८,५२३ | ८१,८६,४०२ | ४,८५,२४३ | ६,९६,८०,१६८ | १३,२२,४८,०८८ | ८,४८,९९,७४६ |
| भांडवली खर्च मत्ता मिळविण्यासाठी पण कंपनीची मालकी नसलेली | ३,८२,३७,४९४ | - | - | ३,८२,३७,४९४ | ७६,७८,५१५ | १३,७६,५५० | - | ९०,५५,०६५ | २,९१,८२,४२९ | ३,०५,५८,९७९ |
| अमूर्त मत्ता | | | | | | | | | | |
| सॉफ्टवेअर विकसित करण्याचा खर्च | | | | | | | | | | |
| **एकूण** | **१,१५,६९,६५,४०,९६४** | **२५,०५,९९,०५,८१५** | **(१,५७,०३,५१,८७१)** | **१,३९,१८,६०,९४,९०८** | **५८,६९,३६,९९,९०१** | **३,६७,४७,०६,४६७** | **(६४,७१,६४,२१८)** | **६१,७२,१२,४२,१५०** | **७७,४६,४८,५२,७५८** | **५७,००,२८,४१,०६३** |
| गेल्या वर्षाची आकडेवारी | १,०४,४५,४८,४०,३५३ | १२,१६,७३,२९,९५० | (९१,९२,७६,४९९) | १,१५,६९,६५,४०,९६४ | ५६,१४,०१,६३,३३३ | ३,०१,४२,९०,५४३ | (४५,४४,०१,१३५) | ५८,६९,३६,९९,९०१ | ५७,००,२८,४१,०६३ | ४८,३१,४६,७७,०२० |

टिप : वरील वर्गीकरण हे विद्युत पुरवठा वार्षिक लेखा नियमावली, १९८५ नुसार केले आहे.

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितचा
## ताळेबंद अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

| अ.क्र. | तपशील | ३१ मार्च २०११ रोजी ₹ | ३१ मार्च २०१० रोजी ₹ |
|---|---|---|---|
| ६ | **प्रगती पथावरील भांडवली कामे** | | |
| | प्रगती पथावरील कामाचे भांडवल | ३४,८७५,९९२,४५३ | २९,०१९,३४९,६४३ |
| | चालु कंत्राटी कामे | – | ४२,४२६,८१३ |
| | पूर्ण झालेल्या कामाची तरतूद | – | २३०,१४०,८६९ |
| | कंत्राटदारांना व्याजमुक्त अग्रीम | ७२८,४३१,००८ | ४८१,८१५,३९४ |
| | पूरवठादारांना व्याजमुक्त अग्रीम | १,१२२,५८९,९०८ | १,१३१,०१७,८२२ |
| | कंत्राटदाराच्या ताब्यातील साहित्याचे खाते | – | २९८,६२६ |
| | बांधकाम भांडारांतील साहित्याचा साठा | १३,९९६,६८४ | ४५,७३५,५४३ |
| | साईटवर असलेल्या साहित्याचे भांडवल | ९८,८४१,८०१ | ६३६,८६४ |
| | **एकूण** | **३६,८३९,८५१,८५४** | **३०,९५१,४२१,५७४** |
| ७ | **गुंतवणूकी (दर जाहिर नसलेली, किमती नुसार)** | | |
| | **व्यापारी गुंतवणूक – दिर्घ मुदतीची** | | |
| | जयगड वीज पारेषण मर्यादित (संयुक्त उपक्रम) (३०२७००७४ समभाग ₹ १० प्रत्येकी १५२१७६७० समभाग ₹ १० प्रत्येकी मागील वर्षाचे) | **३०२,७००,९४०** | **१५२,१७६,८००** |
| | **एकूण** | **३०२,७००,९४०** | **१५२,१७६,८००** |
| ८ | **चालु मत्ता कर्जे व अग्रीमे** | | |
| | **चालु मत्ता** | | |
| | **(अ) वस्तु सूची (मुळ किमतीत)** | | |
| | (व्यवस्थापनाने मुल्यांकित करुन प्रमाणित केलेली) | | |
| | भांडार व सुटे भाग | २,१५७,५२७,८५८ | २,०१०,७९८,५६३ |
| | वापरात नसलेल्या आणि अप्रचलीत झाल्यामुळे हानीची तरतूद | (२०,४३६,०२३) | (२०,८०६,८५४) |
| | **एकूण** | **२,१३७,०९१,८३५** | **१,९८९,९९१,७०९** |
| | **(ब) किरकोळ देणेकरी** | | |
| | (असुरक्षित, चांगली) | | |
| | – कर्जे ६ महिन्यातून अधिक काळ येणे असलेली नोंद क्र. ३ (इ) पहा | १५०,६९१,२७९ | ९६,३५९,०६२ |
| | – इतर कर्जे | २,६४०,५१५,८३५ | १,२४२,६२६,७६१ |
| | **एकूण** | **२,७९१,२०७,११४** | **१,३३८,९८५,८२३** |
| | **(क) रोकड व बँकेतील शिल्लक** | | |
| | (१) हाती असलेली रोकड व स्टॅम्प | २,५७८,४५९ | (३,३४९,४९८,७३६) |
| | (२) हातात असलेले धनादेश | -- | ३,३५१,८००,००० |
| | (३) प्रवासातील रोकड | ७,५०७,५७४ | ४,६७४,३४१ |
| | (४) अनुसूचित बँकेतील शिल्लक | | |
| | (अ) चालू खाते | (३११,९२१,१४५) | १,९२९,६७५,४६८ |
| | (ब) बँकातील मुदतीच्या ठेवी | ३,९४४,३२५,००० | १,६५४,१२७,६३५ |
| | **एकूण** | **३,६४२,४८९,८८८** | **३,५९०,७७८,७०८** |

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितचा
## ताळेबंद अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

| अ.क्र. | तपशील | ३१ मार्च २०११ रोजी | ३१ मार्च २०१० रोजी |
|---|---|---|---|
| | | ₹ | ₹ |
| | **(ड) कर्जे व अग्रीमे** | | |
| | (असुरक्षित तथा चांगल्या समजल्या जाणाऱ्या व निश्चित न केलेल्या) | | |
| | (१) आंतर कंपन्यातील ठेवी नोंद क्र. ३ (ड) | ४३,९७१,७५८ | १,०३६,९०५,१७८ |
| | (२) अग्रीम रकमा संचलन व सुव्यवस्था पूरवठ्यादारांसाठी | २९१,९५५,४२२ | ३,१७५,६८५,१०२ |
| | (३) ठेवी | ९१,२८०,९०४ | ७८,६०५,८८० |
| | (४) आधी भरलेला खर्च | १०१,२९६,२९१ | १०१,३४८,०९६ |
| | (५) उपार्जित पण देय नसलेले व्याज | ५८,६७६,९७५ | ६६,०६१,६०८ |
| | (६) येणे असलेले दावे व इतर चालू मत्ता | २३३,८८९,२७७ | १४७,२१८,६६८ |
| | (७) पूरवठादार व ठेकेदारांकडून सुरक्षा ठेवी (मुदतीच्या ठेवीच्या रुपात) | ११६,१९०,६७६ | १३०,२३६,२४० |
| | (८) आगाऊ कर भरणा (निव्वळ तरतूद) | २,४७६,५७४,६१८ | १,९५८,२२७,२९२ |
| | (९) इतर कर्जे व अग्रीम | २७७,८८२,६८२ | २०६,५५८,०७९ |
| | एकूण | **३,६९१,७१८,६०३** | **६,९००,८४६,१४३** |
| ९ | **चालू दायित्वे / देणी** | | |
| | **(१) किरकोळ धनको** | | |
| | भांडवली खर्चासाठी | | |
| | सूक्ष्म, लहान, मध्यम दर्जाचा (नोंद क्र. ४ (ज) पहा) | | |
| | इतरांची देणी. | ४,३०७,८०८,३०३ | ४,०८०,४५९,५१४ |
| | **भांडवली खर्चा व्यतिरिक्त** | | – |
| | सूक्ष्म, लहान, मध्यम दर्जाचा (नोंद क्र. ४ (ज) पहा) | | |
| | इतर देयके | ४,३७४,४३७,७३३ | ५,५२६,०४७,७५२ |
| | (२) एकाच व्यवस्थापना खालील कंपन्यांची देणी | २,४२०,३४८,२८० | २,४५२,४३४,९२६ |
| | (३) ग्राहक वर्गणी | ७,४८६,१९८,४७१ | ४,८४४,२९०,९२० |
| | (४) सरकारी अनुदान कर्जावरील (नोंद क्र. २(ड) पहा) | ६४०,७०३,८०६ | १,१०२,५७२,४१७ |
| | (५) उपार्जित पण देय नसलेले कर्जावरील व्याज | ७२२,२०९,५०५ | ५४६,५३८,९१५ |
| | (६) कर्मचाऱ्यासंबंधी दायित्वे व तरतूदी | ५५५,१४१,३०१ | ९३२,४८६,५५२ |
| | (७) इतर दायित्व आणि तरतूदी | ४६,८३१,३६० | ७०,२३९,२६६ |
| | **एकूण** | **२०,५५३,६७८,७५९** | **१९,५५५,०७०,२६२** |
| १० | तरतूदी | | |
| | उपदानासाठी तरतूद | ३,०३२,६८८,९२९ | ३,०५८,०४८,३८९ |
| | रजा रोखीकरणाची तरतूद | २,०९१,५४४,९८९ | १,७९१,७२९,१८९ |
| | **एकूण** | **५,१२४,२३३,९१८** | **४,८४९,७७७,५७८** |
| ११ | **संकिर्ण खर्च पुढे चालु ठेवले, निर्लेखित / समायोजित केले नाहीत** | | |
| | (निर्लेखित/समायोजित न केल्याच्या मर्यादेत) | | |
| | चौकशी प्रलंबित असल्याने स्थिर मत्तेची हानी | | |
| | इतर स्थगित महसूल खर्च | – | – |
| | अद्याप मंजूर न झालेल्या योजनांवरील | – | – |
| | प्रकल्पाचे सर्वेक्षण/शक्यता व अभ्यास यावरील खर्च | ५,४५७,५०० | – |
| | **एकूण** | **५,४५७,५००** | – |

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितचा
## नफा / तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

| अ.क्र. | तपशील | २०१०-२०११ ₹ | २००९-२०१० ₹ |
|---|---|---|---|
| १२ | **व्यवहारातून मिळणारा महसूल** | | |
| | पारेषण आकाराच्या वसुल्या | २०,०४०,२८९,११४ | १५,५६२,४२९,०४४ |
| | पारेषण आकाराच्या वसुल्या (गोवा) | २०५,७८५,००० | ८८,९५५,००४ |
| | मुक्त प्रवेश आकार | ५७६,९२०,७३७ | २३७,१४०,५९० |
| | राज्य भार प्रक्षेपण केंद्राचा आकार | १४२,७८२,००० | १०१,७८०,००० |
| | पूर्ननिधरिण आकार | ११,९९३,००० | ७,०११,००० |
| | पर्यवेक्षण आकार | -- | -- |
| | | **२०,९७७,७६९,८५१** | **१५,९९७,३१५,६३८** |
| १३ | **इतर उत्पन्न** | | |
| | व्याजाचे उत्पन्न (टी डी एस ₹ ३९३२५०१२१, मागील वर्षी ₹ ५५२७१८३८२) | १२०,९२२,७७१ | १५४,३३४,००५ |
| | भाडे | ७,१५३,१४६ | ४,९२९,३१३ |
| | कंत्राटदार व इतर यांच्यापासून भाडे उत्पन्न | ६८४,९२६ | ११,४०७,४०९ |
| | भंगार विक्री | १८१,४५७,८८५ | ५५,६१४,३८० |
| | निविदा नमुने विक्री (फॉर्म) | १९,३३६,२११ | ३३,५८८,८३८ |
| | इतर किरकोळ उत्पन्न | ५४८,०१६,५०३ | ६७९,७३०,२११ |
| | विनिमय दरातील फरक | (५२५,९३६,०७५) | ९७,२७२,६४६ |
| | जादा तरतूद पुर्नलेखित केलेली | १२७,७०२,९५२ | २०,०८९,६७८ |
| | आयकर परताव्यावरील व्याज | २५,१८३,९६५ | २६,७०८,०७९ |
| | | **५०४,५२६,२८४** | **१,०८३,६७४,५५९** |
| १४ | **चालु खर्च** | | |
| | **दुरुस्ती व देखभाल** | | |
| | संयत्र व यंत्र सामुग्री | २,४५१,४८९,१९३ | २,४४३,०३६,१३२ |
| | इमारती | ६७,११५,७७२ | ९८,९१४,२८६ |
| | इतर | ३६५,४८९,१५७ | ५०६,१६३,९०२ |
| | | २,८८४,०९४,१२२ | ३,०४८,११४,३२० |
| | **वजा - दुरुस्ती व देखभाल खर्चाचे भांडवलीकरण (नोंद क्र. २ (क) (III))** | ६,३९२,३३७ | ४,७९९,१०६ |
| | | **२,८७७,७०१,७८५** | **३,०४३,३१५,२१४** |
| १५ | **कर्मचारी खर्च** | | |
| | **वेतन, भत्ते, बोनस इत्यादी** | ४,५२२,१६८,८७६ | ३,६८६,७२९,७६२ |
| | **कर्मचारी कल्याण निधी** | ३४,३४९,२६९ | २७,६३८,०२० |
| | **इतर कर्मचारी खर्च** | १८०,०२९,१४० | ९५,०८६,८६४ |
| | **रजेचे रोखीकरण** | ५०७,७१४,९८० | १२३,०६२,२३४ |
| | **उपदान** | ३४८,९८०,०८० | २८२,२८०,५६० |

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितचा
# नफा तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

| अ.क्र. | तपशील | २०१०-२०११ ₹ | २००९-२०१० ₹ |
|---|---|---|---|
| | भविष्य निर्वाह निधी अंशदान आणि इतर निधी | ४६५,५२२,५३७ | ३७१,२७८,६३७ |
| | नियोजित मत्तेतील तुट / अधिक्य | (७९,२००,०००) | (१२८,६००,०००) |
| | भविष्य निर्वाह निधी व्याजाच्या दायित्वामध्ये पडणाऱ्या तुटीसाठी तरतुद | २५,६७१,७४२ | ५५,४०८,७६१ |
| | | **६,००५,२३६,६२४** | **४,५१२,८८४,८३८** |
| | वजा : कर्मचारी खर्चाचे भांडवलीकरण (नोंद क्र. २ (क) (iii)) | ७१४,८८२,६५७ | ५७३,१४८,८७८ |
| | | **५,२९०,३५३,९६७** | **३,९३९,७३५,९६०** |
| १६ | **प्रशासन व इतर खर्च** | | |
| | पाणी पट्टी | ४३,०३३,३५६ | ४०,२१२,९९८ |
| | भाडे पट्टी | १२७,९६६,९७६ | १२४,७४७,९१९ |
| | पट्टी व कर | १२८,५३३,२९२ | १४४,११३,३३४ |
| | विमा आकार | ९,४७९,८६९ | ९,०६७,५४३ |
| | विधी व व्यवसायिक देणी | ९४,८६६,४११ | ५०,२४८,७६८ |
| | सनदी लेखापरिक्षकांचे परिश्रमिक (नोंद क्र. ४ (ड) | १,९८५,४०० | १,३२३,६०० |
| | इतर प्रशासकीय खर्च | १,०३५,९७१,५५७ | ७३०,८८८,३५९ |
| | अमुर्त मालमत्तेचे निर्लेखन | - | - |
| | स्थगित खर्च महसुल खर्च निर्लेखित केले | - | - |
| | किरकोळ नुकसान व निर्लेखन | १०,३६८,६६१ | ८,५९५,५०४ |
| | | **१,४५२,२०५,५२२** | **१,१०९,१९८,०२५** |
| | वजा : प्रशासकीय खर्च व मुख्य कार्यालयाचा निरीक्षण आकाराचे भांडवलीकरण (नोंद क्र. २ (क) (iii) आणि २ (क्यु)) | ८५,४१३,५८८ | ७४,७६५,५७० |
| | | **१,३६६,७९१,९३४** | **१,०३४,४३२,४५५** |
| १७ | **घसारा आणि इतर कर्ज फेडीची तरतुद** | | |
| | घसारा /कर्ज फेडीची तरतुद | ३,६८८,३७१,४५२ | २,९९७,७५९,५०० |
| | लहान व कमी किंमतीच्या निर्लेखित बाबी | ४४८,०१० | ३९९,८५३ |
| | वजा : घसाऱ्याचे भांडवलीकरण (नोंद क्र. २ (क) (३) (iii)) | २,४६१,७८७ | २,००४,५७६ |
| | | **३,६८६,३५७,६७५** | **२,९९६,१५४,७७७** |
| १८ | **व्याज आणि वित्तिय आकार** | | |
| | **स्थिर कर्जावरील व्याज** | | |
| | आई. एफ. सी. | ४०,३९१,२९० | -- |
| | मुक्त बाजार रोखे | १५९,०२०,६३४ | २७०,४११,६३३ |
| | ग्रामीण विद्युतीकरण महामंडळ मर्यादित | २,८३८,९७७,९१५ | २,०८८,३६१,६४२ |
| | भारतीय आयु विमा महामंडळ | ७७,६१०,१५७ | १२९,८४३,८२५ |
| | वीज वित्त महामंडळ मर्यादित | १,४२३,३३७,४४० | १,०५४,३७७,००४ |
| | बँकेकडून घेतलेल्या परदेशी चलनाचे कर्ज | -- | ४८,३५९ |
| | | **४,५३९,३३७,४३६** | **३,५४३,०४२,४६३** |
| | आंतराष्ट्रीय सहकारी संस्था जपान (जायका) कडून घेतलेल्या कर्जावरील व्याज | १७,२५८,१२९ | ४,५६२,७५१ |

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितचा
## नफा तोटा अंतर्गत येणाऱ्या अनुसूची

| अ.क्र. | तपशील | २०१०-२०११ | २००९-२०१० |
|---|---|---|---|
| | | ₹ | ₹ |
| | इतर कर्जावरील व्याज (अल्प मुदतीचे कर्ज) | १६६,११४,२१५ | ५२,०३३,७७८ |
| | खेळत्या भांडवलाच्या कर्जाचे व्याज | – | २,०८८,८९६ |
| | **वित्तीय आकार** | | |
| | हमी आकार | ९३,७०४,२९९ | १३५,०९१,५९१ |
| | बँक आकार | ३,४८०,५७६ | २,८८४,०९६ |
| | कर्ज प्रक्रियेवरील आकार | ४५,४५९,८५० | ३१,८७१,४३६ |
| | | **४,८६५,३५४,५०५** | **३,७७१,५७५,०११** |
| | वजा : व्याज वित्त आकाराचे भांडवलीकरण (नोंद क्र. २ (ई) पहा) | २,०३५,३९१,६६७ | १,६७१,७०९,७८१ |
| | | **२,८२९,९६२,८३८** | **२,०९९,८६५,२३०** |
| १९ | **गतकालीन बाबी (नक्त)** | | |
| | **उत्पन्न** | | |
| | पर्यवेक्षण आकार | २३२,५०० | ४,६०५,००० |
| | गतकालीन उत्पन्नावरील व्याज | १९,२३८,८१४ | २,०१२,०९१ |
| | इतर उत्पन्न | २७,३०६,६४१ | ४०,५६९,५४१ |
| | आयकरवरील जादा केलेली तरतुद | | – |
| | गतकालीन घसारासाठी जादा केलेली तरतुद | १८३,१२५,५४५ | ४२६,१२४,६०३ |
| | | **२२९,९०३,५००** | **४७३,३११,२३५** |
| | **खर्च** | | |
| | देखभालीचे खर्च | ६६,९५४,५६५ | १७३,४५७,३०० |
| | कर्मचारी खर्च | ७०,४७३,८२० | ४६,२३१,६४२ |
| | प्रशासकीय आणि इतर खर्च | ६६,३५०,१६७ | ४७,५५५,८२९ |
| | मागिल वर्षाच्या माला संबंधी खर्च | २०,३८८,२९१ | ११०,७५३,०४९ |
| | गतकालीन घसाऱ्यासाठी कमी केलेली तरतूद | २२२,२४५,८८७ | ३५३,७५१,६३६ |
| | व्याज व इतर वित्तीय आकार | १२,६६४,५८७ | २८,७००,००० |
| | मागील वर्षी आयकरासाठी कमी केलेली तरतूद | ७७,५६९ | |
| | | **४५९,१५४,८८६** | **७६०,४४९,४५६** |
| | | **२२९,२५१,३८६** | **२८७,१३८,२२१** |

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
## निधीचा स्त्रोत ३१-०३-२०११ संपलेल्या वर्षा करिता

| तपशील | २०१०-२०११ | | २००९-२०१० | |
|---|---|---|---|---|
| | रक्कम ₹ | | रक्कम ₹ | |
| **करपूर्व नफा गत कालीन बाबींच्या आधी** | | ५,२०१,८७६,५५१ | | ३,६८०,३४८,३४० |
| अधिक/वजा समायोजन | | | | |
| घसारा | ३६८६३५७६७५ | | २९९६१५४७७७ | |
| तात्पुरता भांडवली खर्च /निलेखित केलेल्या अमूर्त मत्ता | (५४५७५००) | | -- | |
| व्याज व वित्तीय आकार | ४८६५३५४५०५ | | ३७७१५७५०११ | |
| चालू मत्तेत वाढ | १७७४०५३७६७ | | २७७३९५६२०० | |
| चालू दायित्वात वाढ | १२७३०६४८३७ | | २७५४३०००८३ | |
| | ११५९३३७३२८४ | | १२२९५९८६०७१ | |
| भरलेला आयकर | (१२०१००७६४४) | १०३९२३६५६४० | (१२०४९६०८२१) | ११०९१०२५२५० |
| कामकाजापासून मिळणाऱ्या पैशाचा ओघ | | १५५९४२४२१९१ | | १४७७१३७३५९० |
| गुंतवणूकी पासून मिळणाऱ्या पैशाचा ओघ | | | | |
| भांडवली खर्चात वाढ | | | | |
| (व्याजाची भांडवलीकरण ₹ २,०३,५३,९१,६६७) | | | | |
| (त्यात मागील वर्षाचे समाविष्ट ₹ १,६७,१७,०९,७८१) | (३०३००५४६५४९) | | (२४१५४१५५७१२) | |
| गुंतवणूकीत वाढ | (१५०५२४१४०) | | (१००) | |
| | | (३०४५१०७०६८९) | | (२४१५४१५५८१२) |
| **वित्तीय कार्यापासून मिळणाऱ्या पैशाचा ओघ** | | | | |
| कर्जे | १९७७३८९४१८३ | | ११५६८२५७९०६ | |
| व्याज आणि वित्तीय आकार | (४८६५३५४५०५) | | (३७७१५७५०११) | |
| | | १४९०८५३९६७८ | | ७७९६६८२८९५ |
| रोकड प्रवाहातील निवळ वाढ / घट | | ५१७१११८० | | (१५८६०९९३२७) |
| आरंभिक रोख रक्कम समान बाबी | | ३५९०७७८७०८ | | ५१७६८७८०३४ |
| अखेरची रोख रक्कम व रोख समतुल्य बाबी | | ३६४२४८९८८८ | | ३५९०७७८७०७ |

**टिप**

| रोख आणि रोख समान समाविष्ट | | २०१०-११ (₹) | | २००९-१० (₹) |
|---|---|---|---|---|
| (१) हातातील रोख व स्टॅम्प | | २५७८४५९ | | २३०१२६४ |
| (२) हातातील धनादेश | | ० | | ० |
| (३) प्रवासातील रोकड | | ७५०७५७४ | | ० |
| (४) बँकेतील शिल्लक | | -- | | -- |
| (अ) अनुसूचित बँक मधील | | (३११९२११४५) | | १९३४३४९८०९ |
| (ब) बँकातील कायम स्वरुपी ठेवी | | ३९४४३२५००० | | १६५४१२७६३५ |
| **एकूण** | | ३६४२४८९८८८ | | ३५९०७७८७०८ |

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार
**शहा आणि टापडिया**
सनदी लेखापाल
(सभासद क्र. १०९४६३ डब्ल्यु.)
**रमेशचद्र एस जोशी**
भागीदार
सभासद क्र. ३३५९४
ठिकाण : मुंबई
दिनांक : ०३/०९/२०११

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित करीता**

सही/-
**प्रताप मोहिते**
संचालक (वित्त)

सही/-
**अरविंद सिंह**
अध्यक्ष आणि
व्यवस्थापकीय संचालक

सही/-
**डॉ. ज्योती अरोरा**
कंपनी सचिव

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
# ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षाचा भाग असलेल्या अनुसूची
# अनुसूची - २० लेख्यांवरील टिपा

## १. पार्श्वभूमी -

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (MSETCL) या कंपनीची रचना दि. ३१मे २००५ रोजी कंपनी अधिनियम १९५६ नुसार करण्यात आली. कंपनी निबंधक यांचेकडून उद्योग व्यवहार सुरु करण्याचे प्रमाणपत्र दि. १५ सप्टेंबर २००५ रोजी मिळाले. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य विद्युत सुधारणा हस्तांतरण योजना २००५ ही अधिसूचना दि. ४ जून २००५ रोजी जाहीर केली होती. (यापुढे हिचा उल्लेख 'हस्तांतरण योजना' असा केला आहे) या अधिसूचनेतील तरतुदीनसार ही कंपनी संघटीत करण्यात आली आहे. या अधिसूचनेतील अनुसूची 'अ' मध्ये दिलेली पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ या कंपनीच्या पारेषण उपक्रमाच्या मत्ता व दायित्वे, पारेषण कंपनीकडे दि. ६ जून २००५ पासून हस्तांतरीत व निहीत करण्यात आली. महाराष्ट्र शासनाने सदर योजनेनुसार मत्ता व दायित्वे यांचे हस्तांतरण केले. उपक्रमाचे हस्तांतरण मत्तेचे दायित्वावर असलेल्या अधिक्याचा हिशेब करुन रु. २६,९५,९९,२०,४५५/- चे समभाग मराविमं सूत्रधारी कंपनी लि. ला देण्यात येतील.

दि.०६ जून २००५ रोजीच्या कंपनीच्या मत्ता व दायित्वे यामध्ये महाराष्ट्र विद्युत सुधारणा योजना २००५ (हस्तांतरण योजना) यानुसार हस्तांतरीत केलेल्या शिल्लकीचा समावेश आहे. या शिल्लकीस मराविमं सूत्रधारी कंपनीची मान्यता मिळाली आहे. अंतीम हस्तांतरण योजना अद्याप महाराष्ट्र शासनाकडून अधिसूचित व्हायची आहे. त्याचा परिणाम कंपनीच्या वित्तीय विवरणपत्रांवर होऊ शकेल.

## २) महत्त्वाच्या लेखा धोरणाचे माहिती पत्रक

### २(अ) वित्तीय विवरणपत्रे तयार करण्याचा आधार

ही कंपनी अधिनियम १९५६ अनुसार ही कंपनी एक सार्वजनिक मर्यादित कंपनी आहे. तिच्यावर विद्युत अधिनियम २००३ चा अमल आहे. कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतुदींशी विसंगत असेल तेथे विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १७४ अनुसार विद्युत अधिनियम २००३ व त्या अंतर्गत केलेली नियमावली अभिभावी होईल.

वित्तीय विवरणपत्रे चालू असलेली संस्था या संकल्पनेनुसार तयार करण्यात आली असून ती खर्चाच्या ऐतिहासिक परंपरेनुसार आहेत. सर्वसाधारण स्वीकृत लेखा तत्वे (GAPP) व अधिसूचना क्र. जी.एस.आर. ७३९(इ) दि. ७ डिसेंबर २००६ यानुसार कंपनी (लेखामानके) नियमावली २००६ यात दिलेल्या लेखा मानकांनुसार त्यातील प्रत्यक्ष दृष्टीकोनांची पूर्तता करण्यासाठी महापारेषण कंपनीने उपार्जन तत्त्व लेखा तयार करण्यासाठी अंगीकारलेले आहे.

लागू होणाऱ्या विद्युत कायद्यांनुसार निर्माण केलेल्या मत्ता व दायित्वे योग्य त्या लेखाशीर्षाखाली दर्शविणे चालू ठेवण्यात आलेले आहे.

## २(ब) अंदाजाचा वापर :-

सर्वसाधारण स्वीकृत लेखातत्वानुसार अनुरुप वित्तीय विवरणपत्रे तयार करण्याकरिता वित्तीय विवरणपत्राच्या तारखेला मत्ता व दायित्वे यात मांडलेल्या रकमांवर परिणाम करणारे अंदाज व गृहीते यांची तसेच या मांडणीच्या काळातील महसूल व खर्च यांची गरज असते. प्रत्यक्ष परिणाम व अंदाज यातील फरकाला ज्याकाळात परिणाम माहीत झाले त्या काळाकरता मान्यता दिली जाते.

## २(क) स्थिर मत्ता व प्रगतीपथावरील भांडवली कामे

(१) कंपनीच्या स्थिर मत्ता या लेखा पुस्तकात नोंदल्या जातात आणि वार्षिक लेख्यात ऐतिहासिक खर्चाप्रमाणे प्रकट केल्या जातात. स्थिर मत्ता संपादनाच्या खर्चाप्रमाणे किंवा बांधकाम खर्च वजा संचित घसारा याप्रमाणे नमूद केल्या जातात.

(२) संपादनाच्या खर्चात भाडे, शुल्क व कर (कर प्राधिकारी यांचेकडून नंतर पुनप्राप्य असणारे कर सोडून अन्य) वसुली व पात्र मत्तेसाठी केलेला कर्जाचा खर्च आणि सदर मत्ता उपयोगाच्या स्थितीत आणण्यासाठी केलेले सर्व प्रासंगिक खर्च यांचा समावेश होतो.

(३) ज्या मत्ता कंपनीच्या बांधकाम विभागाने निर्माण केल्या आहेत, त्यासाठी मत्ता उभारणीसाठी सदर विभागाने केलेले सर्व खर्च म्हणजे कर्मचारी प्रशासकीय खर्च व विभागाने वापरलेल्या मत्तांचा घसारा या खर्चाचे भांडवलीकरण करण्यात येते.

(४) कंपनीने मालकीचा हक्क नसलेल्या स्थिर मत्ताच्या निर्मितीवर केलेला खर्च व 'विभिन्न बाब' असा दर्शविला जातो.

(५) अनामत घेऊन कामाचा कंत्राट दिलेली प्रगती पथावरील कामे यांच्या जेथे कंत्राटदारांची देयकाची अंतीम अद्याप व्हायचे आहे. त्यांचे भांडवलीकरण हंगामी तत्वावर व अंतीमाकरणाच्या वर्षी करावयाच्या आवश्यक त्या समायोजनाच्या अधीन राहून केले जाते.

(६) भांडवली कंत्राटाच्या किंमतीतील बदलासंबंधीच्या दाव्यांचा लेखा कंपनीकडून स्वीकारल्याप्रमाणे केला जातो.

(७) एकाच व नियोजित घटक यांच्यासाठी कालावधीत कंपनीने केलेला संपूर्ण खर्च संबंधित प्रगतीपथावरील कामाच्या लेखांमध्ये त्याच्या पासून होणाऱ्या अर्थवृध्दीनुसार संविभाजित केला जातो.

(८) मंजुरी मिळालेल्या योजनेतील प्रकल्पावर केलेला सर्वेक्षण व शक्यता अजमावण्याबाबतचा खर्च हा सदर प्रकल्प नाकारण्यापर्यंत किंवा तीन वर्षे यामध्ये जे आधी असेल त्या कालावधीसाठी 'प्रगती पथावरील भांडवली कामे' यात ''विभिन्न बाब'' म्हणून दाखविला जातो. जर तो प्रकल्प नाकारला गेला तर सदर खर्च नाकारण्याच्या वर्षाच्या महसूलात आकारला जातो. जर वर्षाच्या अखेरीस सदर योजनेची ओळख करण्यात आली नाही तर असे खर्च ''निर्लेखित न केलेला संकीर्ण खर्च'' या लेखा शीर्षात दाखविण्यात येते.

(९) ज्या स्थिर मत्ताचा प्रत्येकी खर्च ₹५०००/- पर्यंत आहे. ते नफा व तोटा लेखा निर्लेखित केले जातात.

(१०) अमूर्त मत्तांचे भविष्यातील अर्थिक लाभ जर कंपनीच्या मत्तांना मिळणार असण्याची शक्यता असेल आणि जर हया मत्तांची मोजणी विश्वासार्ह असेल तर अशा मत्तांचे किमती इतके भांडवलीकरण केले जाते.

११)	शासकीय अनुदान / ग्राहकांचे योगदान / अर्थसहाय्य याच्या प्राप्तीतून झालेल्या स्थिर मत्ता लेखा त्यांच्या नफा रकमेनुसार दर्शविण्यात येतात.

१२)	स्थिर मत्तांचे नुतनीकरण किंवा आधुनिकीकरण करण्यासाठी आयुष्य वर्धीष्णू योजना (Life Extension Scheme) यावरील खर्चाचे भांडवलीकरण पुढील दोन्ही अटींची पूर्तता केली तर केले जाते.

अ) जर अशा खर्चामुळे विद्यमान मत्तेच्या महत्वाच्या घटका इतकी किंवा कार्यक्षमता यांच्या सममुल्य तिची जागा घेणारी नवीन मत्ता निर्माण झाली असेल तर

ब) बदललेल्या मत्तेचा खर्च एकूण गटातून तिच्या अंदाजे खर्चाच्या आधारे संचित घसाऱ्यातुन काढुन टाकला असेल तर

**२(ड) शासकीय अनुदान व अर्थ सहाय्य :-**

विशिष्ट स्थिर मत्तांशी संबंधित शासकीय अनुदाने / अर्थसहाय्य याचा खर्च त्या स्थिर मत्ताच्या एकुण मुल्यातून वजा केला जातो. अशा स्थिर मत्तांचे भांडवलीकरण होईपर्यंत अपूर्ण प्रकल्पांची शासकीय अनुदाने, अर्थसहाय्य या चालू दायित्वांमध्ये दाखविल्या जातात. या स्थिर मत्तांचे भांडवलीकरण झाल्यावर संबंधित शासकीय अनुदान / अर्थसहाय्य ज्या विशिष्ट स्थिर मत्तांसाठी ते मिळालेल्या त्याबाबीतून वजा केले जाते.

**२(इ) कर्जाचे खर्च** –

ज्या पात्र मत्तांचे संपादन किंवा बांधकाम करण्यासाठी कर्जाचे खर्च (इतर सहाय्यक खर्च वगळून) केले जातात त्यांचे भांडवलीकरण अशा मत्ताच्या खर्चाचा भाग म्हणून केले जाते. पात्र मत्ता म्हणजे अशी मत्ता जी तिच्या वापराच्या हेतूसाठी किंवा विक्रीसाठी तयार होण्यासाठी बराच वेळ लागतो. अशा पात्र भांडवली मत्ता व्यतिरिक्त अन्य कर्जाचे खर्च यांना ज्या काळात ते केले त्यातील खर्च म्हणून मान्यता दिली जाते.

**२(एफ) मत्ता कमी करणे** –

कंपनी ताळेबंदाच्या तारखेचा प्रत्येक स्थिर मत्तेचे मूल्यांकन करते व जर परिस्थिती तसा निर्देशित करीत असेल किंवा तशी खात्रीचे मुल्यांकन करीत असेल त्याप्रमाणे 'रोकड निर्मितीचे घटक' (CGU) अशा मत्ताचे गट तयार करते. जर अशा रोकड निर्मितीच्या घटक असणाऱ्या मत्ताचे गट चालू ठेवण्याच्या खर्चापेक्षा त्या कमी करुन मिळणारी रक्कम ताळेबंदाच्या दिवशी जास्त असण्याची शक्यता असेल तर त्या कमी करण्याची तरतूद केली जाते.

**२(जी) घसारा/ कर्जाची फेड करणे**

**१) मूर्त मत्ता** –

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) नियमावली २००५ यात अधिसूचित केलेल्या वीज दरानुसार सरळ रेषा पध्दती नुसार मत्तेच्या किमतीच्या ९० टक्के पर्यंत घसाऱ्याची तरतूद कंपनी करते. मत्तेवरील भर / वजावट यातील घसारा ज्या महिन्यात मत्ता वापरांसाठी उपलब्ध झाली / निकाली निघाली त्या महिन्या पासून / पर्यंत व प्रमाण दराने लावण्यात येतो.

२)　**अमूर्त मत्ता - भाडेपट्टीच्या जमीनीच्या भाडयाची फेड भाडयाच्या कालावधीपर्यंत करण्यात येते.**

३)　**विविध वर्गातील मत्तेसाठी वापरण्यात येणारे घसाऱ्याचे दर**

| तपशील | दर |
|---|---|
| हायड्रॉलिक कामे | १.८० टक्के ते ३.६० टक्के |
| इमारत व इतर स्थापत्य कामे | १.८० टक्के ते १८.०० टक्के |
| कारखाने व यंत्रसामुग्री | २.५७ टक्के ते १८.०० टक्के |
| पारेषण तारा, केबलचे नेटवर्क इ. | १.८० टक्के ते ६.०० टक्के |
| फर्नीचर, जोडणी व कार्यालयीन साहित्य | ६.०० टक्के |
| वाहने | १८.०० टक्के |

२(एच)　**भांडार साठा**

भांडारातील साहित्य, माल व सुटे भाग यांचे मूल्य किमतीप्रमाणे केले जाते. प्रती वजनी सरासरी किंमत पध्दतीनुसार किंमत निश्चित केली जाते. किमतीमध्ये वस्तू खरेदीची किंमत व ती वस्तू सध्याच्या जागेवर आणून त्या स्थीतीत ठेवण्याच्यासाठी केलेल्या इतर खर्चाचा समावेश होतो. वस्तूसूची प्रथम आगमन-प्रथम निर्गमन तत्त्वावर केली जाते. (FIFO)

सेवा देण्यास अयोग्य झालेल्या वस्तु व जुने माल व सुटे भाग तांत्रिक मूल्यांकना प्रमाणे निश्चित केले जातात व लेख्यामध्ये समाविष्ट केले जाते.

२(आय) **महसूल मान्यता**

**पारेषणचे उत्पन्न**

(अ)　विजेचे पारेषण करुन मिळालेला महसूल याचा लेखा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांनी दिलेल्या मासिक राज्यांतर्गत (Intrastate) पारेषण आदेशाच्या आधारे केला जातो. या आदेशानुसार वार्षिक कामगिरीचा आढावा (APR) आणि त्यानंतरच्या वर्षाची एकूण महसूलाची गरज यांच्या मंजूरीच्या आधारेही घेतला जातो. वरील आदेशात मागील वर्षाच्या लेखा परिक्षण केलेल्या लेखांची सत्य परिस्थिती सुध्दा विचारात घेतली जाते. अशा प्रकारे वरील नमूद केलेल्या आदेशात मागील वर्षाची अंतीम सत्य परिस्थिती अधिक चालू वर्षातील हंगामी सत्य परिस्थिती व पुढील वर्षाची प्रक्षेपित सरासरी महसूलाची गरज व अन्य काही समायोजने असल्यास ती, अशा सर्वाचा समावेश होतो.

(ब)　जर काही जादा / कमी वसूली असल्यास त्याचे समायोजन महाराष्ट्र विज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या सरासरी महसूल गरजेच्या आदेशात केले जाते. व या सरासरी महसूल गरजेच्या आदेशानुसार नवीन मासिक राज्यांतर्गत पारेषण आदेश आयोग काढते. अशाप्रकारे पूर्वीच्या काळातील तूट/ जादा वसूली याचे समायोजन आयोगाच्या राज्यांतर्गत पारेषणाच्या दराच्या आदेशात केले जाते.

२)　**इतर उत्पन्न** ( यास उपार्जन तत्वावर मान्यता दिली जाते. मात्र जेव्हा असे उत्पन्न अनिश्चित असते तेव्हा अपवाद केला जातो.)

**३)	भंगाराची विक्री :**

हा लेखा जेव्हा त्याच्या विक्रीचा करार केला जातो तेव्हा होतो.

**२(जे)	गुंतवणूकी –**

दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकी किमतीनुसार होतात. त्यात तात्कालिक वगळता होणाऱ्या अन्य घटीसाठीची तरतूद वजा केली जाते.

**२(के)	परदेशी चलनातील व्यवहार :**

परदेशी चलनातील व्यवहार प्रारंभी इतिवृतातील चलनात मान्य केला जातो. परकीय चलनाच्या रकमेत इतिवृतात चलन व परकीय चलन यांतील व्यवहाराच्या तारखेला प्रचलीत असलेला विनिमय दर लागू केला जातो. पैसे देण्याचा दिवस व व्यवहाराचा दिवस यात विनिमय दरातील फरकामुळे प्राप्ती किंवा हानी झाल्यास त्याला त्या वर्षाच्या नफा व तोटा लेख्यात मान्यता दिली जाते.

ताळेबंदाच्या तारखेला परकीय चलनातील पैशाचे व्यवहाराच्या बाबींचे अहवाल बंद होण्याच्या तारखेचा वापर करुन नोंदले जातात. यात काही प्राप्ती किंवा हानी झाल्यास त्या वर्षाच्या नफा व तोटा पत्रकात मान्यता दिली जाते.

**१(एल) कर्मचारी लाभ**

**१) अल्पकालिन कर्मचारी लाभ**

कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सेवेच्या बदल्यात त्यांना देण्यात येणाऱ्या कर्मचारी लाभाची विना सवलत रकमेला कंपनी दायित्व (उपार्जित खर्च) म्हणून मान्यता देते. त्यातून काही रक्कम आगाऊ दिली असल्यास ती कापली जाते.

**२) नोकरी नंतरचे लाभ**

**अ) विशिष्ट योगदान योजना :**

विशिष्ट वर्गणी योजना म्हणजे नोकरी नंतर द्यायचे लाभ, यातील निश्चित केलेल्या योगदानाला कंपनी दायित्व मानते (उपार्जित खर्च) आधी काही वर्गणी भरली असल्यास ती कापण्यात येते. विशिष्ट योगदान योजनेतील कंपनीची वर्गणी योगदान यास ज्या वित्तीय वर्षाशी संबंध असेल त्या वर्षाच्या नफा व तोटा विवरणपत्रात मान्यता दिली जाते.

**ब) विशिष्ट लाभ योजना :**

**१) उपदान व रजा रोखीकरण**

निवृत्तीनंतर उपदान व रजा रोखीकरण याच्या दायित्वासाठी उपार्जित तत्वावर वर्षा अखेरीस विमा गणकाने (Actuary) निश्चित केलेली उपार्जित दायित्वाची तरतूद करण्यात येते.

**२) भविष्य निर्वाह निधी :**

कंपनी भविष्य निर्वाह निधीसाठी पूर्व निश्चित दराने निश्चित केलेली वर्गणी कर्मचाऱ्यांच्या वर्गणीसह एका वेगळया विश्वस्त न्यासाकडे भरते. ही न्यास इतर कंपनींच्या गटातील निधीचेही व्यवस्थापन करीत असल्याने त्यामुळे ती एक बहूविध मालक विशिष्ट लाभ योजना आहे. हा निधी नंतर परवाना प्राप्त प्रतिभूतीमध्ये गुंतविला जातो. या निधितील योगदान हे त्या कालावधीतील खर्च मानण्यात येतो व तो नफा व तोटा पत्रकात आकारला जातो.

विशिष्ट लाभाची तरतूदी खर्चा प्रक्षेपित घटक पत पध्दती नुसार निश्चित केला जातो. प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला त्याचे विमा गणक मूल्यांकन केले जाते. मागील सेवेच्या खर्चाला यापूर्वी निहित केलेल्या लाभाच्या मर्यादेपर्यंत तात्काळ मान्यता दिली जाते. अन्यथा सुधारीत लाभ निहित होईपर्यंत त्याची सरळ रेषा तत्वाच्या आधारे फेड केली जाते.

ताळेबंदात विशिष्ट लाभाच्या बंधने मान्य केली असून ती त्यांच्या सध्याच्या मूल्याने मान्य न केलेल्या प्राप्ती व हानीच्या समायोजित बंधनाचे, तसेच पूर्वीच्या सेवा खर्चाचे प्रतिनिधीत्व करतात व लागू असल्यास योजना मत्तेच्या रास्त मूल्याने कमी केले जातात, कोणतीही विशिष्ट लाभ मत्ता (या हिशेबाने येणारी नकारार्थी विशिष्ट लाभाची बंधने) मान्य केली जाते. ती मान्यता नसलेल्या पूर्वीच्या सेवेचा खर्च अधिक उपलब्ध परताव्याचे सध्याचे मूल्य व योजनेतील कमतरता यांचे प्रतिनिधीत्व करते.

**३) अन्य दीर्घकालिन कर्मचारी लाभ :**

वार्षिक रजा व आजारीपणाची रजा यांच्या हक्काने उपार्जन कर्मचाऱ्यांकडून जेव्हा होते तेव्हा त्याला मान्यता दिली जाते. कंपनी संचित रजेचे दायित्व प्रत्येक ताळेबंदाच्या तारखेला प्रक्षेपित घटक पत पध्दत विमा गणकाच्या मूल्यांकनाप्रमाणे निश्चित करते.

**२ -एम) भाडेपट्या**

**१) वित्त भाडेपट्टी**

महाराष्ट्र विद्युत सुधारणा हस्तांतरण योजना २००५ (हस्तांतरण योजना), अंतर्गत वित्त भाडयाने संपादन केलेल्या मत्तांच्या बाबत, त्यांचे भाडे जसे व जेव्हा त्यांचे उपार्जन होईल त्याप्रमाणे नफा व तोटा पत्रकात आकारले जाते.

५ जून २००५ नंतर संपादन केलेल्या मत्तांचे वर्गीकरण वित्त भाडे असे होते जेथे मत्तांच्या मालकीच्या जोखीमी व मोबदले कंपनीकडे मूळ स्वरुपात हस्तांतरीत होतात. अशा मत्तांचे भांडवलीकरण भाडेपट्टीच्या आरंभी रास्त मूल्याच्या कमी किंवा सध्याच्या भाडयाचे किमान देणे या प्रकारे केले जाते व तितक्याच सममुल्याचे दायित्व निर्माण केले जाते. दिलेल्या भाडयाचे वाटप दायित्व व व्याजाचा खर्च यात केले जाते. त्यातून प्रत्येक कालावधीसाठी उर्वरित दायित्वाच्या त्या मुदतीचा स्थीर व्याजदर मिळविण्यात येतो.

**२) प्रवर्तनातील भाडे**

भाडयाने घेतलेल्या मत्तांच्या जोखेमा व मोबदला या भाडे पट्टयाने देणाऱ्याकडे असतात व त्याचे वर्गीकरण 'प्रवर्तनातील भाडेपट्टी' असे केले जाते. अशा प्रवर्तनातील भाडेपट्टीचे पैसे देणे यास सरळ रेषा पध्दतीच्या तत्वानुसार 'खर्च' मानले जातो.

**२ एन) कर**

**१) आयकर / प्राप्तीकर**

दरवर्षीच्या कर पात्र उत्पन्नावरील कर, परवानगी योग्य सूट, कपात नामंजूरी यांचा हिशेब केल्यानंतर सध्याचा कर आयकर अधिनियम १९६१ च्या तरतूदीनुसार निश्चित केली जातो.

**२) स्थगित कर**

स्थगित कराची मान्यता एका मुदतीत करपात्र उत्पन्न आणि त्यामुदतीत निर्माण झालेले लेखा उत्पन्न याच्या फरकानुसार मान्यता दिली जाते व ते नंतरच्या एक किंवा जास्त काळासाठी कराचे दर व केलेले कायदे किंवा नंतर ताळेबंदाच्या तारखेपर्यंत करण्यात आलेले कायदे यांचा सुज्ञपणे वापर करुन केलेल्या हिशेबाच्या अधीन असते.

स्थगित कर लेखा हा मान्य करुन भविष्यात मत्तां साकार होतील याची निश्‍चिती असल्यास, तो अग्रेषित केला जातो.

**२ ओ) पूर्व कालिन बाबी**

पूर्वीच्या काळातील वित्तीय विवरणपत्रांत चूक–भूल झाल्यास केलेल्या समायोजनांचा लेखा वेगळे लेखाशीर्ष 'पूर्व कालिन बाबी' यात केला जातो.

**२ पी) तरतुदी, आकस्मिक दायित्वे व आकस्मिक मत्ता**

पूर्व कालिन घटनांमुळे सध्या काही बंधने येणार असल्याचा पुरेसा अंदाज असल्यास त्यासाठी संसाधने पुरवावी लागणार असल्यास त्यासाठी केलेल्या तरतुदींना मान्यता देण्यात येते.

आकस्मिक दायित्वांना मान्यता दिली जात नाही पण ती टिपा मध्ये प्रकट केली जातात. आकस्मिक दायित्वांचा वित्तीय विवरणपत्राच्या तारखेपर्यंत होणारा वित्तीय परिणाम त्याची माहिती उपलब्ध असल्यास ती प्रकट केली जाते.

आकस्मिक मत्तांना मान्यता नसते व ती वित्तीय विवरणपत्रात प्रकट सुध्दा केली जात नाही.

**२ क्यू) मुख्यालय पर्यवेक्षण आकाराचे भांडवलीकरण**

प्रकल्प व नियोजन खाते (प्र.व.नि.कक्ष) येथे केलेले खर्चाचे कमाल गुंतवणूकीच्या खर्चात भांडवलीकरण केले जाते.

**२ आर) महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (मेडा) यांच्याकडून प्राप्त झालेल्या अनुदानाचा लेखा**

अपारंपारिक स्त्रोतांकडून ऊर्जा निर्मितीला देण्याच्या महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार खाजगी विकासकांनी विकसीत केलेल्या प्रकल्पातील वीज वाहून नेण्याच्या ५० टक्के खर्च कंपनी करणार असून उर्वरीत ५० टक्के खर्चाची प्रतिपूर्ती मेडा कडून विकासकांना मिळणार आहे.

**२ एस) ग्राहकांकडून मिळणाऱ्या संपूर्ण वर्गणीची कृती**

१) जर स्थिरमत्तेवर अभ्यास न केलेल्या खर्चापोटी अग्रीम मिळाला असेल तर चालू दायित्व मानण्यात येते.

२) जर ते पर्यावेक्षणाचा आकार म्हणून मिळाला असेल तर ते महसूल उत्पन्न मानण्यात येते.

३) जर तो स्थीरमत्ताच्या निर्मितीसाठी 'भांडवल प्राप्ती' म्हणून मिळाला असेल तो सर्वाधिक स्थीर मत्ताच्या खर्चातून कमी करण्यात येतो.

**२ टी) प्रकल्पांची ओळख, सर्वेक्षण व शक्यता यासाठीचे खर्च**

कंपनीचे धोरण आहे की वर नमूद केलेले खर्च 'प्रगती पथावरील भांडवली कामे' या अंतर्गत तो प्रकल्प नाकारणे किंवा तीन

वर्षाचा कालावधी यापैकी जे आधी असेल तो पर्यंत 'विभिन्न बाब' म्हणून दाखविण्यात यावा. जर एखाद्या योजनेची निश्चित ओळख वर्षाच्या अखेरी पर्यंत झाली नाही तर तो खर्च ''निर्लेखित न केलेला–मर्यादेपर्यंतचा संकीर्ण खर्च'' अशा लेखाशीर्ष अंतर्गत दाखवावा.

**३ अनुसूचीसाठी जादा प्रकटीकरण**

**३ अ) संशयीत भागाचा लेखा**

संशयीत भागांच्या लेखांमध्ये ₹२६,९५,९९,२०,४५५ एवढी दाखवलेली रक्कम कंपनीकडे पूर्वीच्या म.रा.वि.मं.च्या पूनर्रचनेसाठीच्या हस्तांतरण योजनेनुसार दायित्वापेक्षा जास्त मत्तांचे प्रतिनिधीत्व करते, या योजनेनुसार कंपनीला सदर रकमेचे समभाग भांडवल मराविमं सूत्रधारी कंपनी लि. ला द्यायचे आहेत. भाग हस्तांतरण योजना महाराष्ट्र शासनाच्या अंतीम मंजूरीच्या अधीन आहे.

**३ ब) आकस्मिक राखीव आणि विशेष आकस्मिक राखीव :**

म.वि.नि. आयोगाने दि. १० सप्टेंबर २०१० रोजी दिलेल्या आदेश क्र.१०३ वर्ष २००९ नुसार कंपनीने आकस्मिक राखीव साठी ₹२५,९९,००,०००/– (मागील वर्षी ₹ २४,८१,००,०००/–) आणि विशेष आकस्मिक राखिव करिता रु.निरंक (मागील वर्षी ₹१३,५२,००,०००) एवढ्या रकमेचे विनियोजन केले आहे. याच आदेशानुसार कंपनीने ₹ ५६,००,०००/– आकस्मिक राखीवची अल्प तरतूद वित्तीय वर्ष २००९–१० च्या मंजुरी प्राप्त शिलकीच्या सत्यचित्रानुसार केली आहे

**३ क) प्रतिभूत कर्जे:**

**कर्जाची प्रतिभूती कर्जे** **(रक्कम ₹ )**

| संस्थेचे नांव | राज्यशासनाची हमी | भविष्यातील मत्तेसाठी तारण | विद्यमान मत्ता - गहाण | एकूण |
|---|---|---|---|---|
| ग्रा.वि.म. | १,५१,३६,३४,५५४ | २८,१३,६५,५९,०५९ | --- | २९,६५,०१,९३,६१३ |
| वि.वि.मं. | १,८४,७३,३९,६३१ | १५,१५,०८,१२,९६६ | --- | १६,९९,८१,५२,५९७ |
| एल.आय.सी | --- | --- | ७५,९०,५९,९८८ | ७५,९०,५९,९८८ |
| *ओएमबी | १,०२,४२,००,००० | --- | --- | १,०२,४२,००,००० |
| युनीयन बँक ऑफ इंडिया | --- | ३,३५,७०,००,००० | --- | ३,३५,७०,००,००० |
| बँक ऑफ बडोदा | --- | २,६४,००,००,००० | --- | २,६४,७०,००,००० |
| बँक ऑफ महाराष्ट्र | --- | ३,९५,४०,००,००० | --- | ३,९५,४०,००,००० |
| आय एफ सी | --- | २,४४,६०,००,००० | --- | २,४४,६०,००,००० |

**परकीय चलनातील कर्जे** **(रक्कम ₹ )**

| कर्जाची प्रतिभूती कर्ता | जे आय सी ए (₹) | जे आय सी ए (येन) |
|---|---|---|
| केंद्र सरकारकडून हमी | ५,२८,७१,३४,५३४ | १०,७६,०५,०९,२६९ |
| **एकूण** | **५,२८,७१,३४,५३४** | **१०,७६,०५,०९,२६९** |

ओपन मार्केट बाँड्सच्या व्याजाचा दर आणि विमोचनाचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| तपशील | विमोचनाचे वर्ष | व्याजाचा दर (प्रतीवर्ष) | अदत्त बाकीची रक्कम |
|---|---|---|---|
| एम.एस.इ.बी.बॉंड्स २०११ (२० वर्षे) | २०११ | १२.००% | १,०२,४२,००,००० |
| **एकूण** | --- | --- | **१,०२,४२,००,०००** |

**३डी) कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३७०(१बी) च्या अर्थानुसार समान व्यवस्थापनाखाली असलेल्या कंपन्याकडून वसूल करावयाच्या रकमांचा समावेश आहे.**

| कंपनीचे नांव | २०१०-११ (₹) | २००९-१० (₹) |
|---|---|---|
| महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. | २१,७४,२४,५६७ | २२,४७,७४,७९७ |
| महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. | १,९५,१०,३४,६५७ | १,९२,८५,०३,२५६ |
| मराविमं सूत्रधारी कंपनी लिमिटेड | १२,०८,५१,५६९ | ११,६९,९४,९०५ |
| मराविमं उर्वरीत कंपनी (Residual Co.) (महाराष्ट्र शासनाकडून म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनीकडे) | --- | १,०३,६९,०५,१७८ |
| **एकूण** | **२,२८,९३,१०,७९३** | **३,३०७,१७८,१३८** |

**३ इ)** किरकोळ ऋणको यात मे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड – कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ३७०(१बी) यातील अर्थाप्रमाणे समान व्यवस्थापना खालील कंपनी द्वारे वसूल करावयाच्या ₹९,६३,५९,०६२ (मागील वर्षी ₹ ९,६३,५९,०६२) याचा समावेश आहे.

**३ एफ)** कंपनीने स्थिर मत्तांच्या हानीसाठी सक्षम प्राधिकारी यांची मंजुरी प्रलंबित असणारी तरतूद केलेली नाही. सूज्ञपणाची तरतूद म्हणून रु. निरंक (मागील वर्षी ₹ ३६८८४/-) एवढी तरतूद यासाठी केली.

**३ जी)** पारेषण आकारापासून उत्पन्नामध्ये ₹ ५९.८३ कोटी या म.वि.नि. आयोगाने दि. ३० नोव्हेंबर २०१० रोजी प्रकरण क्र.७३ वर्ष २०१० यात दिलेल्या आदेशात मंजूरीत दिलेल्या रकमेचा समावेश आहे. महापारेषणने वि. वर्ष २००८-०९ च्या सुधारीत वार्षिक महसूल गरजांच्यासाठी दि. २२ ऑक्टोबर २०१० रोजी आयोगाच्या १० सप्टेंबर २०१० रोजी दाखल केलेल्या आढावा याचिकेवर हा आदेश होता.

**४ अनुसूची सहा (६) नुसार प्रकटीकरण**

**४अ. भांडवल बांधिलिकी**

भांडवली लेख्यावर कार्यान्वित न झालेल्या कंत्राटाची तरतूद न केलेले अंदाजे रक्कम ₹६५४३.८७ कोटी आहे. (निव्वळ अग्रीम – ₹ ७३२.०६ कोटी) (मागील वर्षी – ₹२०९०.१० कोटी)

## ४ ब. आकस्मिक दायित्वे (ज्यांचे मूल्य व्यक्तिश: रु.दहा लाखापेक्षा जास्त आहे)

१. २२० केव्ही उपकेंद्र, म.औ.वि.म. जालना येथे गँन्ट्री इक्विपमेंट फाउंडेशन व अन्य कामे (प्रकरण-१) आणि डब्यू बी एम रोड, गटार इतर कामे (प्रकरण २) या बांधकामाचे कंत्राट मे. बाळराजे कंस्ट्रक्शन, गेबराई यांना पूर्वी अस्तित्वातील म.रा.वि.मं. यांनी दिले होते.

मात्र हे काम कंत्राटाच्या अटी व शर्ती याप्रमाणे करण्यात कंत्राटदार अयशस्वी झाला, म्हणून त्याचे पैसे राखून ठेवले. कंत्राटदाराने त्यावेळी म.रा.वि.मं. चे लवादा मार्फत निर्णय करण्याचा पर्याय वापरला. एकमेव लवाद श्री एम.डी.तांबेकर यांनी ₹३३,३७,६५१/ (प्रकरण-१साठी) आणि ₹११,९६,८०१/- (प्रकरण २ साठी) व व्याज प्रतीवर्ष १५% दराने कंत्राटदाराला द्यावे असे जाहीर केले. कंपनीने याबाबत कायदेशीर सल्ला घेतला असून सदर एकमेव लवादाच्या निर्णयाविरुध्द मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद न्यायासनाकडे अपील केले आहे.

दरम्यान दि.१८.०१.२०१० रोजी प्रधान जिल्हा न्यायालय औरंगाबाद यांनी कंपनीच्या बाजूने निर्णय दिला. मा. प्रधान जिल्हा न्यायाधिश, औरंगाबाद यांच्या निर्णयानुसार दावे व त्यावरील व्याजाची आकारणी यांचे मूल्यांकन करुन ते संबंधित वकीलांना सादर केले. मे. बालराजे कन्स्ट्रक्शन यांना एकूण रक्कम रु.६,५३,६०८/- (प्रकरण-२ साठी) व ₹२,६३,४६८ (प्रकरण-२ साठी) आणि त्यावर निकालाच्या तारखेपासून पैसे देण्याच्या तारखेपर्यंत एकूण रकमेवर दरवर्षाला १५% टक्के या दराने व्याज देय आहे.

त्यापूढे मा. उच्च न्यायालय मुंबई यांचे औरंगाबाद न्यायासन यांनी अपील क्र. ८/२०१० व ७/२०१० यासाठी लवादाकरीता १६/०७/२०१० रोजी समन्स बजावले होते. मा. उच्च न्यायालय, मुंबई औरंगाबाद न्यायासन यांनी दि.२५-०४-२०११ रोजी निर्णय दिला व हे प्रकरण एकमेव लवादाकडे पाठविले. मात्र महापारेषण कंपनीने या निर्णयाविरुध्द विशेष परवानगी याचिका दाखल करण्याचा पर्याय स्वीकारला. आता अशा याचिका एस एल पी क्र. १५४५७/२०११ दि.०९/०५/२०११ (प्रकरण-१ साठी) आणि एस एल पी १५३०९/२०११ दि.०६/०५/२०११ (प्रकरण-२साठी) मा. सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली येथे दाखल केल्या. मा.सर्वोच्च न्यायालयाने एस एल पी क.१५४५७/२०११ संबंधी दि. ०९/०५/२०११ रोजी स्थगित ठेवण्याचा आदेश दिला आणि एस एल पी १५३०९/२०११ या प्रकरणी रक्कम अल्प असल्याने ते फेटाळले व पून: एकमेव लवादाकडे पाठविला.

या प्रकरणी महापारेषण कंपनीवरील भाराचे दायित्व ₹१३,०६,५१०/- असून ते जिल्हा न्यायालय औरंगाबाद यांचेकडे जमा केले आहे.

२. १३२ केव्ही - शहादा - तळोदा तारा उभारणीचे काम मे. मिस्त्री कन्स्ट्रक्शन कंपनीला दिले होते. त्याचा खर्च ₹९.२५ लाख होता. परंतु कंत्राटदाराने हे काम पूर्ण केले नाही. म्हणून ६३ वीज मनोऱ्यांचे काम महापारेषण कंपनीच्या विभागांनी पूर्ण केले . प्रतिवादीने पूर्ण झालेल्या कामाचे अंतीम देयक सादर केले. मात्र त्याने हे काम केले नसल्याने त्याचा दावा फेटाळण्यात आला.

त्यानंतर सदर कंत्राटदार न केलेल्या कामाचे पैसे मिळावे म्हणून जळगाव न्यायालयात गेला होता.

जळगांव न्यायालयाने दि. २३.०३.२००१ रोजी पूर्वीच्या म.रा.वि.मं. विरुध्द निर्णय दिला व अर्जकर्त्यांकडून महापारेषण कंपनीला देय असलेले ₹१०,३५४/- आणि पाणी पुरवठयाच्या खर्चाचे व जोखमीचे ₹१०,३५४/- वसूल करुन एकूण ₹६,९६,९८०/- कंत्राटदाराला अंतीम देयकासाठी द्यावेत असा आदेश दिला. म.रा.वि.म.ने न्यायालयात वर नमूद केलेली रक्कम वजा करुन ₹५,३२,०००/- जमा केले. या निकालाची प्रमाणित प्रत मिळाल्यावर म.रा.वि.मं.ने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दि. ०३.०३.२००२ रोजी मा. वरीष्ठ विभागीय न्यायालय, जळगाव यांच्या निर्णयावर

अपील दाखल केले.

सदर प्रकरण मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाकडे अजून प्रलंबित आहे. यातील आकस्मिक दायित्वाचे रक्कम ₹५.३२ लाख इतकी आहे.

३. १३२ केव्ही चिखली–धाड पारेषण तारमार्गासाठी खोदकाम, पाया उभारणी व ताणणे यासाठीचे काम मेसर्स एच. टी. असोसिएशन यांना दिले होते. कंत्राटदार हे काम पूर्ण करु न शकल्याने उर्वरित कामासाठी निविदा मागवून ते अन्य कंत्राटदाराकडे सोपविण्यात आले. कंत्राटदारामुळे महापारेषणला नुकसान महापारेषणने दरवर्षी ₹१८ टक्के या व्याजदराने ₹२०,७८,४४८/– या रकमेवर आजपावतो ₹५७,७३,४६५/– चा दावा केला आहे. या व्यवस्थेने ग्रस्त झालेल्या मे.एच.टी. असोसिएट्स उच्च न्यायालयात अपील करुन सदर निविदेवर स्थगिती आणली. मे.एच.टी.असोशिएट्सने महापारेषन कडून ₹ ८१,१४,५९४/– चा प्रती दावा केला. एच.टी.आसोसिएट्स लवादासाठी लवकर कृती करण्याची विनंती केली आहे. सध्या हे प्रकरण अमरावती परिमंडळ कार्यालयाकडे लवादासाठी आहे.

४. देवचंद प्रागजी ओसवाल,पुणे यांनी दि. ३१–०१–२००७ रोजी भरलेल्या लिलावात लॉट.नं. १ए खरेदी केला आहे. अटी व शर्तीनुसार मूल्याधारीत कर (व्हॅट) सह रक्कम ₹२९,५३,९४४/– आणि विलंब भरणा आकार अशी होती. ती न भरल्यामुळे सुरक्षा अनामत रक्कम ₹८,१०,०००/– महापारेषण कंपनीने जप्त केली. त्याची माहिती श्री देवचंद प्रागजी ओसवाल, पुणे यांना पत्र क्र. इदू (एस टी) / एम एस ए/ बी एम टी/ टेक / ऑक्शन / २००७ / १९१२ नुसार नोंदणीकृत टपालाने दि. १३–०७–२००७ रोजी कळविण्यात आली. या विरुध्द श्री. देवचंद प्रागजी शहा, पुणे यांनी ग्राहक न्यायालयात प्रकरण दाखल केले. व त्यांना आणि लिलावानुसार दि. ३१/०३/२००७ रोजीच्या लिलावानुसार सदर भंगार गॅस कटींग करुन देण्याची परवानगी द्यावी किंवा दि.०६/१०/२००७ रोजी जमाकेलेली सुरक्षा रक्कम परत करावी आणि भरपाई ₹१,००,०००/– द्यावी असा दावा केला आहे. मुख्य अभियंता, महापारेषण, कऱ्हाड यांना याची नोटीस मिळाली त्यापुढील कार्यवाही अद्याप सुरु झालेली नाही.

या प्रकरणी कंपनीवर दायित्व ₹९,१०,०००/– (यापैकी नुकसानीची भरपाई ₹१,००,०००/– आणि ₹८,१०,०००/– सुरक्षा अनामत परत करणे) असे असेल.

५. अधीक्षक अभियंता, अ.उ.व्होल्टता बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी १३२/३३ केव्ही उपकेंद्र, सिंदेवाडी, जि. चंद्रपूर, येथील गँट्रीचे व साहीत्य उभारण्यासाठी पायाचे व नियंत्रण कक्षाच्या इमारतीचे काम जी.आय. पाईप लाईन, वॉटर पंप, मेटल स्प्रेडींग इ. पुरविणे या कामासाठी मे. एस. के. साहनी यांची निविदा स्वीकारली होती. मे.एस के.साहनी यांनी महापारेषण कंपनीवर मुक्कामी कामगार रिकामे रहाणे, केलेल्या कामाचे पैसे न देणे, किंमत वाढ, दाव्यावर व्याज ई. साठी ₹१९,२७,०५७/– चा दावा केला आहे.

याची अंतीम सुनावणी दि.०९.०७.२०१० रोजी झाली पण ती अनिर्णयीत आहे. व सुधीर साहनी वि. महापारेषण यांतील दावा क्र. ५६९/२००९ दिवाणी न्यायालय, नागपूर येथे प्रलंबित आहे. याचे देणे ₹ १९.२७ लाखाचे आकस्मिक दायित्व आहे.

६. श्री. एन. एस सुर्यवंशी व इतर यांनी महापारेषण विरुध्द जिल्हा न्यायालय, नाशिक येथे दावा दाखल केला. मा. जिल्हा न्यायालय नाशिक यांनी जमीन संपादनासाठी भरपाई ₹१४५,५८,४२२/– (₹ १४५.५८ लाख) देण्याचा आदेश दिला.

महापारेषण ने या विरुध्द मुंबई उच्च न्यायालयात अपील केले . मा. उच्च न्यायालयाने नाशिक जिल्हा न्यायालयाच्या आदेशावर स्थगिती दिली आहे. नंतर मा. उच्च न्यायालयाने महापारेषण ला नाशिक जिल्हा न्यायालयात ₹८०,३८,९२२/– जमा

करण्याचा आदेश दिला. सदर रक्कम दि.५ जून २००२ व ६ जून २००३ रोजी नाशिक जिल्हा न्यायालयात जमा करण्यात आली. मा. उच्च न्यायालयाने दि. ३१ जानेवारी २०१० रोजी अपील कर्त्यांना जिल्हा न्यायालयात नाशिक येथून सदर रक्कम काढून घेण्यास सांगितले. दि ३०मार्च २००५ रोजी महापारेषणने मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे व्याजापोटी ₹७१.७३ लक्ष भरले.

(या प्रकरणी वेळोवेळी पाठपुरावा करुन व सुनवणी घेऊन लवकर निवाडा करावा अशी विनंती करुनही सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित आहे.)

७. दिवाणी न्यायालय अहमदनगर यांनी श्री. बहिरु आर. गुंजाळ (दिवंगत) आणि त्याचे वारस यांनी दाखल केलेला दावा ग्राह्य धरला व महापारेषण ला अपिल कार्यांस जमीन संपादनाची अतिरिक्त भरपाई पोटी ₹१३,२६,६९९/- देण्याचा आदेश दिला. सदर जमिन २२० केव्ही उपकेंद्र अहमदनगर उभारणीसाठी संपादन केली होती. निर्णयाविरुध्द महापारेषण ने औरंगाबाद उच्च न्यायालयात अपील दाखल केली त्यांनी जिल्हा न्यायालयाच्या निर्णयावर स्थगितीचा आदेश दिला आहे. अंतीम निर्णय प्रलंबित आहे.

या प्रकरणी आकस्मिक दायित्व ₹ १३,२६,६९९/- (₹१३.२७ लक्ष) आहे.

८. श्री सतीश आर. वाणी व इतरांनी दिवाणी न्यायालय शेगांव येथे १३२ केव्ही उपकेंद्र उभारणीसाठी संपादन केलेल्या जमिनीसाठी अतिरिक्त भरपाईचा दिवाणी दावा क. एल. ए. ५३६१९९४ महापारेषण विरोधात दाखल केला. दिवाणी न्यायलय, शेगांव यांनी तो वैध ठरवून महापारेषण कं.ली.अतिरिक्त भरपाई पोटी ₹१४,५८,८७३/- ३० टक्के दिलासा रक्कम ₹ ५,५७,६६१.९०/- आणि अधिसूचना विभाग -४ याच्या तारखेपासून (०२.०१.१९९२) पासून निकालाच्या तारखेपर्यंत (०३.११.१९९३) १२ टक्के घटक रक्कम ₹३,३८,४६२.१३/- आणि कब्जा घेण्याच्या प्रथम वर्षी ९ टक्के व्याज व त्यानंतर अतिरिक्त भरपाईची रक्कम देण्याच्या तारखेपर्यंत वर्षासाठी १५ टक्के व्याज अशी अतिरिक्त भरपाईसाठी ₹ ३२,८२,४६४.२५/- भरण्याचा आदेश दिला. महापारेषण या प्रकरणी अपील दाखल करणार आहे व त्याबाबत कार्यवाहीची प्रक्रीया चालू आहे.

या प्रकरणी आकस्मिक दायित्व सुमारे ₹५७.६९ लाख होईल

९. मे. गणेश इंजिनिअरींग कंपनीने वर्ष १९८७-८८ मध्ये ४०० केव्ही चंद्रपूर-परळी डी.सी.लाईन उभारणीच्या कामासाठी दिलेल्या सबसेटींग व उभारणीच्या कामासाठी दिलेल्या टी-१३, टी-१६, टी-१७ व या निविदा व दोन कार्यादेश यातील थकीत ₹८०,९५,९२५/- या दाव्यासाठी नागपूर जिल्हा न्यायालयात दावा दाखल केला. पूर्वीच्या म.रा.वि.मं.ने ₹३,०८,४२६/- या प्रतिदाना टी ॲंड पी चार्जेस सामान, वाहने इ. त्यांची वसूली आकारापोटी विरोधात दाखल केली.

मा.न्यायालयाने सदर प्रकरणी मे. गणेश इंजीनीयर कंपनीच्या बाजूने निर्णय दिला. व ₹ ८०,९५,९२५/- चा दावा त्यावर दावा दाखल करण्याच्या तारखेपासून रक्कम जमा करण्याच्या नियोजित तारखेपर्यंत ६२ वे दराने व्याज (२०.०८.२००९) जे ₹ ७३,२३,६०६/- हेने एवढी रक्कम जमा करण्याचा आदेश दिला. प्रती दावा नाकारण्यात आला. मात्र महापारेषण कंपनीच्या अर्जानंतर आणि ₹१,६०,७३,४३४/- न्यायालयात जमा केल्यावर मा. न्यायालयाने डिक्रीवर स्थगिती दिली. नागपूर जिल्हा न्यायालयाच्या या आदेशावर महापारेषण कंपनीने उच्च न्यायालयात विनंती अर्ज दाखल केला. या प्रकरणी आकस्मिक दायित्व ₹१,६०,८५,४१०/- होईल

१०.	सुक्ष्म व लघु उद्योग सुविधा मंडळ (MSEFC) यांनी दि.२८ जानेवारी २०१० रोजी एक आदेश काढून महापारेषण कंपनी एकूण व्याजाची रक्कम ₹२,६७,६९,१७६/- म्हणजे मेसर्स मिनर्व्हा स्वीचगेअर्स नागपूर ₹ १,९४,६०,०२८/- आणि मे. सिग्मा ट्रान्सफॉर्मर्स प्रा.लि. ₹७३,०९,१४९/- अशी आहे. या एकूण व्याजाच्या दाव्यासाठी ७५ टक्के रक्कम महापारेषन ने ₹२,००,७६,८८४/- दि. २६.०४.२०१० रोजी ''प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश, नागपूर'' यांचेकडे अपील दाखल करतेवेळी जमा केली या प्रकरणातील आकस्मिक दायित्व ₹२,६७,६९,१७६/- होईल.

११.	खालील उपकेंद्राकरिता संपादनाचे वाद न्यायालयात प्रलंबित आहेत. न्यायालयाच्या निकालानंतर देय असणारे व्याज व अन्य आकार यांचा विचार करता आलेला नाही.

| **उपकेंद्राचे नांव** | **अपेक्षित रोकडता जावक प्रवाह** ( ₹ लाखात) | **न्यायालयात जमा केलेली रक्कम** | **मंडळ संहिता क्रमांक** |
|---|---|---|---|
| १३२ किव्हो चोपडा उपकेंद्रा जळगांव | २२.९८ | ---- | ७८० (४५४) |
| १३२ किव्हो रावेर उपकेंद्र जळगांव | ७५.०० | ---- | ७८० |
| ४०० किव्हो धुळे उपकेंद्र धुळे | २५.०० | ---- | ७८० |
| २२० किव्हो शहादा उपकेंद्र नंदूरबार | ७५.९४ | ---- | ७८० (४५४) |
| १३२ किव्हो म्हसरुळ उपकेंद्र | ५३.९४ | ---- | ७८० |
| १३२ किव्हो संगमनेर उपकेंद्र | १८.०३ | ---- | ७८० |
| १३२ किव्हो मनमाड उपकेंद्र | २४.०० | ---- | ७८० |
| १०० किव्हो नेरुळ उपकेंद्र | १०.०० | ---- | ४६५ |
| १३२ किव्हो शहादा, नंदूरबार | १०.२५ | ---- | ७८० (४५४) |
| २२० किव्हो उपकेंद्र मुरुड ता व जि. लातूर | ०८.४६ | ४.२३ लक्ष | ७६० |
| १३२ किव्हो उपकेंद्र, अहमदपूर, जि. लातूर | १०७.०० | १०.७९ लक्ष | ७६० |
| २२० किव्हो उपकेंद्र, अहमदपूर | ६.६९ | ---- | ७६० |
| २२० किव्हो उपकेंद्र, उस्मानाबाद | २५.०० | ---- | ७६० |
| २२० किव्हो उपकेंद्र, बीड | ७९.२५ | ---- | ७६० |
| १३२ किव्हो उपकेंद्र, चाकूर, जि.लातूर | १०.७२ | १.०० कोटी | ७६० |
| १३२ किव्हो उपकेंद्र, कळंब, जि.उस्मानाबाद | १०.०० | ---- | ७६० |
| १३२ किव्हो उपकेंद्र, रेणापूर, जि. लातूर | १२५.६६ | ---- | ७६० |

**४ क)	व्यवस्थापकीय परिश्रमिक**

| **तपशील** | **२०१०-२०११ (₹)** | **२००९-१० (₹)** |
|---|---|---|
| पगार आणि भत्ते | २८५२२०३ | ५८६९०४६ |
| भविष्य निर्वाह निधीसाठी अंशदान इतर निधी | ३,५३,२४१ | ३९९६७४ |
| **एकूण** | **३२०५४४४** | **६२६८७२०** |

**४ ड) सांविधिक लेखापरिक्षकांचे परिश्रमिक**

| **तपशील** | **२०१०-२०११(₹)** | **२००९-१० (₹)** |
|---|---|---|
| लेखा परिक्षणासाठी | १२,००,००० | ८,००,००० |
| इतर स्वत: केलेल्या खर्चाची भरपाई | ६,००,००० | ४,००,००० |
| सेवा कर | १,८५,४०० | १,२३,६०० |
| **एकूण** | **१९,८५,४००** | **१३,२३,६००** |

**४ इ) आयात केलेल्या मालाची किंमत सी.आय.एफ.आधारे**

| **तपशील** | **२०१०-११ (₹)** | **२००९-१० (₹)** |
|---|---|---|
| भाग आणि सुट्टे भाग | निरंक | निरंक |
| भांडवली साहित्य | निरंक | निरंक |

**४एफ) खर्च / मिळकत परदेशी चलनाद्वारा रोख स्वरुपात**

| **तपशील** | **२०१०-११ (₹)** | **२००९-१० (₹)** |
|---|---|---|
| बँकेतून घेतलेल्या परदेशी चलनावरील व्याज | ११७२५८१२० | ४५६२७५१ |

**४जी) चालू वर्षात पाठवण्यात आलेल्या परदेशी चलनाच्या रुपातील लाभांशसाठी रक्कम रुपये निरंक आहे.**
(मागील वर्षी निरंक)

**४एच) एकूण पारेषित केलेल्या विजेच्या उत्पन्नाचा तपशील**

| **तपशील** | **२०१०-११ (₹)** | **२००९-१० (₹)** |
|---|---|---|
| एकूण पारेषित केलेली वीज (दशलक्ष युनिट्स मध्ये) नक्त | १,०७,८०७,४४२ | ९७१८४२४८ |
| संचलनापासून उत्पन्न (₹) | २०९७७७८५१ | १५९९७३१५६३८ |

**४आय)** यंत्र सामुग्रीच्या दुरुस्ती आणि देखभालीसाठी भांडार सुटेभाग वापरले यांचा समावेश आहे.

**४जे)** मायक्रो स्मॉल व मिडीयम एन्टरप्रायझेस ॲक्ट २००६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कंपनी आपल्या धनकोंना साधारणपणे ४५ दिवसामध्ये रक्कम देते. म्हणून याबाबतची माहिती उघड केलेली नाही. वरील कायद्याप्रमाणे आवश्यक असलेल्या मायक्रो आणि स्मॉल एन्टरप्रायझेस कडून कंपनीकडे कोणत्याही प्रकारच्या व्याजाची मागणी केलेली नाही किंवा देय असलेल्या व्याजाची कंपनीने तरतूद केलेली नाही. ही माहिती जरी उपलब्ध नसली तरी देय असलेल्या व्याजाची रक्कम मोठी असेल असे वाटत नाही.

**४ के)** सेवा कारखानाच्या काळापासून, उत्पादक करण्याबाबतीत लेखांकन मानकांची असलेली गरज, म्हणजेच, परवाना क्षमता स्थापित क्षमता, उत्पादन, विक्री, वस्तुची आणि इतर संबंधित लेखांकन मानकांची असलेली गरज भाग २ च्या अनुसूची ६ या प्रमाणे करण्यात आलेली नाही.

**५ लेखांकन मानकानुसार केलेले प्रकटीकरण :**

**५(अ) कर्मचाऱ्याचे लाभ (लेखा मानक १५ नुसार आवश्यक असलेले)**

**१. अल्प मुदतीचे कर्मचारी लाभ**

अल्प मुदतीचे कर्मच्याऱ्याचे फायदे जसे पगार, वेतन, भत्ते, उपांत लाभ बोनस, प्रोत्साहने, वैद्यकीय लाभ त्या विषयी खर्चाचा पुर्नभरणा, गट विमा योजनेला अंशदान,रजा प्रवास, सवलतीचा खर्च व इतर फायदे जे वर्ष अखेरीच्या बारमाही देय होतात, तो त्या काळातील कर्मचाऱ्यांच्या काळातील खर्च म्हणून दाखवला जातो. सानुग्रह अनुदान सोडून ते जेव्हा जाहीर होतो तेव्हा त्याचे लेखांकन केले जाते.

**२) सेवा मुक्ती नंतरचे लाभ**

**विशिष्ट लाभ योजना**

**अ) भविष्य निर्वाह निधी -**

कंपनी भविष्य निर्वाह निधीचे अंशदानाचा भरणा एका विशिष्ट लाभाच्या निवृत्ती योजनेत करते. या भविष्य निर्वाह निधीने प्रशासन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ भविष्य निर्वाह निधी विश्वस्त संस्था या संस्थेतर्फे होते. या योजनेनुसार कंपनीला वेतनाच्या निश्चित केलेल्या टक्केचा इतके अंशदान या निवृत्ती लाभ योजनांच्या निधीकरीता करण्याची आवश्यकता असते कंपनी (लेखा मानके) नियमावली २००६ यात अधिसूचित केलेल्या कर्मचारी लाभाविषयी लेखा मानक १५(सुधारीत) यात दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार, मालक संस्थापित भविष्य निर्वाह निधी यांना विशिष्ट लाभ योजना समजण्यात येते. कारण त्या लाभाचे छत्र दिलेल्या कर्मचाऱ्यांसंबंधी कोणतीही व्याजाची तूट आल्यास ती भरुन काढण्याचे कंपनीवर बंधन असते.

कंपनीच्या व्यवस्थापनाच्या सांगण्यानुसार, संबंधित विमा गणक तज्ञ यानी असे मत दिले आहे की त्यांच्या 'ॲक्च्यूरीयल सोसायटी ऑफ इंडीया' या संस्थेने भविष्य निर्वाह निधीच्या दायित्वाची विमागणक शास्त्राप्रमाणे निश्चित मोजणी करण्यासाठी कोणतेही मार्गदर्शन केलेले नसल्यामुळे विमागणक पध्दतीने मूल्यमापन लागू करता येत नाही. म्हणून उपरोक्त लेखा मानक १५, ज्याचे सहवाचन अकाऊंटींग स्टॅंड्र्डस् बोर्ड मार्गदर्शन या सह होते, त्यासाठी आवश्यक असणारी संवंधित प्रकटनांची तरतूद करण्यास कंपनी करण्याच्या स्थितीत सध्या कंपनी नाही.

मात्र विमागणक तज्ञ यांनी भविष्य निर्वाह निधीच्या लाभधारकांना वर्षाअखेरीस देय असणाऱ्या व्याजातील तूटीसाठी ₹२,४५,५६,३०४/- इतकी रक्कम प्रमाणित केली आहे. **(मागील वर्षी ₹५,५४,०८,७६१/-)** त्यानुसार कंपनीने त्यासाठी तरतूद केलेला आहे. सदर मूल्यमापन करताना, विमागणक यांनी वेतन वाढीचा दर प्रती वर्षी ५ टक्याने व सवलती ८.२५ टक्के दराने असेल असे गृहीत धरले आहे.

सदर निधीच्या स्थितांची एकूण दायित्वाशी तूलना केल्यास कंपनीच्या अतिरिक्त वर्गणीमूळे होणारी तूट/अधिक्य खास खर्च /उत्पन्न म्हणून मान्यता देण्यात येते. त्यानुसार वर्षातील कर्मचाऱ्यांची अंशदान व व्याज या एकूण दायित्वाची नियोजित मत्तेच्या लाभाशी तूलना करुन त्यासाठीची तरतूद ₹ निरंक अशी कमी करण्यात आली आहे. (मागील वर्षीची तूट ₹१२.८६ कोटी)

भविष्य निर्वाह निधी विश्वस्त संस्थेचे व्यवस्थापन केलेल्या निधीसाठी कंपनीची मत्ता व दायित्वे यासाठी पुढील प्रमाणे वाटा ताळेबंदामध्ये मान्य केला आहेत.

| तपशील | (₹ कोटीत) ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्ष अखेरीस | (₹ कोटीत) ३१ मार्च २०१० रोजी संपलेल्या वर्ष अखेरीस |
|---|---|---|
| १) वर्षाच्या अखेरीस कर्मचाऱ्याना देय असलेली वर्गणी व व्याजाचे दायित्व | ८४२.९१ | ७८२.३६ |
| २) वर्षाच्या अखेरीस नियोजित मत्तेचे रास्त मूल्य | ८४३.०५ | ७७४.४४ |
| **नक्त दायित्व** | **(०.१४)** | **७.९२** |

**नियोजित मत्तेची वर्णन**

| तपशील | ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्ष अखेरीस (टक्केवारीत) | ३१ मार्च २०१० रोजी संपलेल्या वर्ष अखेरीस (टक्केवारीत) |
|---|---|---|
| १) विशेष ठेव योजना | ३८.८७ | ४०.४५ |
| २) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे कर्ज रोखे | ३३.६० | ३०.०२ |
| ३) राज्य शासनाच्या रोख्यातील गुंतवणूक | १४.८७ | १६.४४ |
| ४) केंद्र सरकारच्या रोख्यातील गुंतवणूक | ११.६७ | ११.४६ |
| ५) परस्पर निधी भाग (म्युच्युअल फंड युनिट) | ०.०० | ००.५७ |
| ६) इतर | ०.९९ | १.०६ |

**ब) उपदान :**

**(निधीविना विशिष्ट लाभ योजना)**

निवृत्ती नंतरचे लाभ, या योजने खाली येणाऱ्या कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या उपदानाचे दायित्व कंपनीला आहे. या योजनेनुसार ही योजना ज्यांना लागू आहे. अशा कर्मचाऱ्यांना निवृत्ती, नोकरीमध्ये असताना मृत्यू किंवा नोकरीतून बडतर्फ केल्यास प्रत्येक पूर्ण केलेल्या वर्षाला १५ दिवसाच्या पगाराएवढी रक्कम किंव जास्तीत जास्त २० महिन्याचा पगार दिला जातो. किंवा उपदान अधिनियम (सुधारित) १९९७ च्या तरतुदींनुसार जी जास्त फायदेशीर आहे ती द्यायची असते ५ वर्षे नोकरी केल्यानंतरच ही योजना लागू होते. प्रोजेक्टड बेनिफिट आब्लिगेशन युनिट क्रेडिट पध्दतीने काढले जाते वर्षाच्या शेवटी मुल्यांकन केल्यानंतर नफा-तोटा पत्रकातील विमा गणक शास्त्रानुसार मिळकत किंवा नुकसान समजू शकते.

## क) रजा रोखीकरणाचा लाभ (निधी विना ठरविलेली लाभ योजना)

रजेचा पगार (रजा न घेतल्या बद्दल रोख देणे) ठराविक लाभ योजना (निधी नसलेली) कंपनीच्या योजनेनुसार सर्व कर्मचारी वर्गाला त्यानी न उपभोगलेल्या रजेच्या काळाचे पैसे द्यावयाचे असतात संपूर्ण रजेचा काळ (PL) अर्ध सरासरी पगार (HAP) कर्मचाऱ्यांच्या खात्यावर जमा होतात, हे सर्व निवृत्ती नंतर अथवा अंतिम निवृती नंतर देय असते केवळ त्याला लागु असलेली (PL & HAP) पगारानुसार रोख रजेचा पगार दिला जातो.

## ड) व्याख्यांकित लाभ योजना

उपदान व दीर्घ कालीन गैरहजेरीची नुकसान भरपाई :– विमागणक शास्त्रानुसार ३१मार्च २०११ पर्यंत वित्तीय विवरणपत्रात मान्यता असलेली.

**नफा-तोटा तक्तात मान्य झालेले खर्च**

(₹ कोटीत)

| तपशील | ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षा करिता | | ३१ मार्च २०१० रोजी संपलेल्या वर्षा करिता | |
|---|---|---|---|---|
| **मालकांचे खर्चाचे भाग** | **उपदान** | **रजेचे रोखीकरण** | **उपदान** | **रजेचे रोखीकरण** |
| १) चालु सेवा खरेदी किंमत | १२.३६ | ७.८३ | १२१.६४ | ६.९७ |
| २) व्याज | २४.४६ | १४.३३ | २२.०० | १२.८३ |
| ३) विमागणक शास्त्रानुसार नुकसान / फायदे | (१.९३) | ४०.१५ | (११६.१५) | (४.११) |
| **नफा तोटा पत्रकात मान्य झालेला एकूण कर्मचारी खर्च** | **३४.८९** | **६२.३१** | **२७.४९** | **१५.६९** |

विशिष्ट फायदे योजना बंधनाच्या खर्चाचे मेळ करणे

(₹ कोटीत)

| तपशील | ३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षा करिता | | ३१ मार्च २०१० रोजी संपलेल्या वर्षा करिता | |
|---|---|---|---|---|
| **ठराविक फायदा योजनेतील बंधनातील बदल** | **उपदानरजेचे निधी शिवाय** | **रोखीकरण निधी शिवाय** | **उपदान निधी शिवाय** | **रजेचे रोखीकरण निधी शिवाय** |
| १) ठराविक लाभ योजनेतील बंधनाचे सुरुवातीच्या काळातील सध्याचे मुल्य | ३०५.८० | १७९.१७ | ३०५.८० | १७९.१७ |
| २) चालू सेवा खर्च | १२.३६ | ७.८३ | १२१.६४ | ६.९७ |
| ३) व्याजावरील खर्च | २४.४६ | १४.३३ | २२.०० | १२.८३ |
| ४) वजा देण्यात आलेले लाभ | ३७.४३ | ३२.३४ | ३६.७७ | १९.८५ |
| ५) विमा गणक शास्त्रा प्रमाणे प्राप्ती / हानी | १.९३ | (४०.१५) | ११६.१५ | ४.११ |
| **ठराविक फायदा योजनेतील बंधनांचे वर्षाअखेरीची सध्याची किंमत** | **३०३.२७** | **(२०९.१५)** | **३०५.८०** | **१७९.१७** |

उपदानासाठी केलेली तरतूदा ही उपदान तरतुद अशीच मान्य झाली आहे. रजेच्या रोखी करण्यासाठी तरतूद ही अनुसूची ९ अंतर्गत येते.

**विमा गणक शास्त्राच्या गृहीतांचा गोषवारा :**

| **तपशील** | **३१ मार्च २०११ रोजी संपलेल्या वर्षा करिता** | | **३१ मार्च २०१० रोजी संपलेल्या वर्षा करिता** | |
|---|---|---|---|---|
| **विमा गणक शास्त्राची गृहीते** | **उपदान** | **रजेचे रोखीकरण** | **उपदान** | **रजेचे रोखीकरण** |
| | **निधी शिवाय** | **निधी शिवाय** | **निधी शिवाय** | **निधी शिवाय** |
| १) वाढीचा दर | ५% | ५% | ५% | ५% |
| २) सुट देण्याचा दर | ८.२५% | ८.२५% | ८% | ७.७५% |
| ३) झीज प्रमाण | वयाशी संबधित २% | वयाशी संबधित २% | वयाशी संबधित २% | वयाशी संबधित २% |
| ४) मृत्युसंख्या तक्ता | एलआयसी (१९९४-९६) अंतिमता | एलआयसी (१९९४-९६) अंतिमता | एलआयसी (१९९४-९६) अंतिमता | एलआयसी (१९९४-९६) अंतिमता |

५ **ब) विभागीय अहवाल :**

**१) व्यवसाय विभाग:**

कंपनीचा प्रमुख व्यवसाय वीज पारेषण आहे, लेखा मानक १७ नुसार अहवाल देण्यास योग्य होईल अशी कोणतीही कृती नाही.

**२) दुय्यम विभाग :**

कंपनीचा व्यवसाय मुख्यतत्वे महाराष्ट्र राज्यातच केला जातो. म्हणून कुठल्याही भौगोलिक विभागाचा अहवाल सादर करणे लागू नाही.

**क) लेखा मानक १८ नुसार प्रकट करावयाच्या संबंधित संघटना/ व्यक्ती यांचे सोबतचे व्यवहार.**

लेखा मानक १८ च्या परिच्छेद ९ नुसार संबंधित संघटना व्यक्ती याचे बद्दलचा कुठलाही व्यवहार जर त्या संघटना राज्य सरकारच्या अखत्यारीतील असतील तर तो प्रकट करणे आवश्यक नाही.

लेखा मानक १८ नुसार आवश्यक इतर व्यवहार खालील प्रमाणे :

**१) संबंधित संघटनांची यादी :**

**संयुक्त व्यवसायिकांची यादी**

**जयगड पॉवर ट्रान्सको लि. (जेपीटीएल)**

**२) व्यवस्थापनातील मुख्य व्यक्ती**

| | |
|---|---|
| श्री अरविंद सिंह | व्यवस्थापकीय संचालक ( २१-०८-२००९ पासून) |
| श्री पी जी खंडाळकर | संचालक (वित्त) ( ०४.०५.२००७ ते ०७.०५.२०१० ) |
| श्री डब्ल्यु.आर.अस्वार | संचालक (प्रकल्प) दि. ३१.०३.२०११ पर्यंत |
| श्री यु.जी.झाल्टे | संचालक (संचलन) दि. ०५.०५.२०१० पासून |

**३) संबंधित संस्थाबरोबरचे व्यवहार (एक) वरील प्रमाणे :**

अ) चालु वर्षी सामान्य व्यवहारात सहभाग घेतलेल्या संस्था

| **व्यवहाराचे स्वरुप** | **कंपनीचे नाव - जयगड पावर ट्रान्सको मर्यादित (₹)** | |
|---|---|---|
| | **आर्थिक वर्ष २०१०-११** | **आर्थिक वर्ष २००९-१०** |
| समभाग भांडवलीसाठी दिलेली रक्कम | १५०,५२४,१४०/- | निरंक |
| समभाग अर्जासाठी रक्कम | १००/- | निरंक |
| टर्मिनल वे बांधकामाचा खर्च | ७,९७२,७४३/- | निरंक |

**ब) वर्षा अखेरीस शिल्लक**

| व्यवहाराचे स्वरुप | कंपनीचे नाव - जयगड पावर ट्रान्सको, मर्यादित. (₹) |
|---|---|
| समभाग भांडवल | ३०,२७,००,८४०/- |
| समभाग अर्ज रक्कम | १००/- |

**४) संचालकांना दिलेले परिश्रमिक (नोंद ४ (क) पहा)**

| **संबंधिताची नावे** | **२०१०-११ (रु.)** | **२००९-१० (रु)** |
|---|---|---|
| श्री अरविंद सिंह | ११२४७४० | १७०४३८९ |
| श्री डब्ल्यु. आर. आस्वार | १०३७१८० | १११७६७८ |
| श्री यु.जी. झाल्टे | ६८६१२२ | --- |
| श्री पी. जी. खंडाळकर | ९७६११ | १४७२८७७ |
| **एकूण** | **२९४५६५३** | **४२९४९४४** |

**५ (ड) भाडेपट्ट्या संबंधी प्रकटन (लेखा मानक -१९)**

या परिच्छेद अंतर्गत फक्त विशेष महत्वाच्या भाडेपट्ट्याच्या प्रकटीकरणासाठी विचार केलेला आहे.

चालू भाडे पट्ट्या

| | तपशील | २००१०-११ | २००९-१० |
|---|---|---|---|
| | कार्यालय / राहत्या इमारती आणि विश्रामगृह म.रा.वि.मं. सूत्रधार कंपनीकडून भाडेपट्ट्यांनी घेतलेल्या व ज्यांचा करार रद्द करता येण्यासारखा नाही अशा महत्वाच्या तपशीलाचे प्रकटीकरण | -- | -- |
| १ | नफा तोटा पत्रकात मान्य झालेले भाडेपट्टा देयक | १२३१०२५८२ | १०६६८६३९५ |
| २ | महत्वाची भाडेपट्टा व्यवस्था | -- | -- |
| | कंपनीने करारामध्ये कोणत्याही प्रकारची सुरक्षा ठेव दिलेली नाही | -- | -- |
| | भाडेपट्टीचा करार १.०४.२००८ पासून २४ महिन्याच्या कालावधीसाठी असून वर उल्लेखी कालावधीत तो रद्द होऊ शकत नाही | -- | -- |
| | भाडेवाढीची करारात तरतूद नाही | -- | -- |
| ३ | भविष्यातील कमीत कमी असलेले भाडेपट्टा देयक | -- | -- |
| | एक वर्षानंतरचे नसलेले | १७०५४४६९ | १९४६२२६ |
| | एक वर्षापेक्षा जास्त व ५ वर्षापेक्षा कमी असलेले | ४०८११३०० | १५९३९५१ |
| | ५ वर्षानंतर | -- | ७७९१४७९ |

**२) वित्तीय भाडेपट्ट्या**

**कंपनीने साहित्य संदर्भात कोणतेही वित्तीय भाडेपट्टा करार केलेला नाही**

टिप : पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन मर्यादित नवी दिल्ली व पुर्वाश्रमीचे म.रा.वि.मंडळ, यांच्यामध्ये २१ मे १९९७ रोजी भाडेपट्टा संबंधीचा करार करण्यात आला. पॉवर फायनान्स कॉर्पोरेशनने त्यामध्ये अशा स्वरुपाची काही उपकरणे भाडेपट्ट्याने दिली होती, ज्यांचा भाडेपट्टा कालावधी स्थिर व रद्द न करता येण्याजोगा होता. जरी भाडेपट्टी करारात ह्या कराराचे स्वरुप वित्तीय भाडेपट्टा करार असे असले तरी लेखांकनासाठी सदरचा करार चालू भाडेपट्टा असे गृहीत धरण्यात आले आहे. कारण हा करार कंपनी अस्तित्वात येण्यापूर्वी म.रा.वि.मं. व लेखा मानक – १९ अनिवार्य करण्यापूर्वी केला गेला.

**५इ) प्रतिसमभाग मिळकत (लेखा मानक २०)**

| तपशील | २०१०-११ | २००९-१० |
|---|---|---|
| लेख्यानुसार करोत्तर नफा (मुलभूत आणि सौम्यकृत प्रत्येक भागातून मिळकत : (अ) (रुपये) | ३२९३४११३३३ | २४५०१३४६८६ |
| वर्षभरात मुलभूत प्रतिभाग मिळकतीसाठी बाकी असलेल्या सरासरी भागांची संख्या | ५०००० | ५०००० |
| अधिक : संशयित भाग लेख्यांकरिता संभाव्य समभागाचा प्रभाव | २६९५९९२०४५ | २६९५९९२०४५ |
| वर्षभरात सौम्य केलेल्या प्रतिभाग मिळकतीसाठी बाकी असलेल्या सरासरी भागांची संख्या | २६९६०४२०४५ | २६९६०४२०४५ |
| प्रत्येक मुलभूत भागापासूनची मिळकत रुपये (अ)/(ब) | ६५८६८ | ४९००३ |
| प्रत्येक कमी केलेल्या भागापासूनची मिळकत रुपये (अ)/(क) | १.२२ | ०.९१ |

**५ एफ) चालू करदान**

कंपनाने ह्या वर्षासाठी आयकर तरतूद ₹ ६४.०० कोटी केलेली आहे.

**५ जी) स्थगित कर (लेखा मानक २२)**

| | दि. ०१.०४.२०१० रोजी स्थगित कर / दायित्व | चालू वर्षाचे देणे/ जमा नफा तोटा पत्रकात दाखविल्याप्रमाणे | ३१.०३.२०११रोजा स्थगित कर मत्ता / दायित्वे |
|---|---|---|---|
| अ) स्थगित कर दायित्वे | | | |
| स्थिर मत्ता घसारा | ९,००,२८,५३,४४८ | १,१२,९३,२२,१४६ | १०,१३,२१,७५,५९४ |
| एकूण | ९,००,२८,५३,४४८ | १,१२,९३,२२,१४६ | १०,१३,२१,७५,५९४ |
| ब) स्थगित कर मत्ता | - | - | - |
| १) उपदान | १,०३,९४,३०,६४७ | (८४,२३,७७९) | १,०३,१०,०६,८६८ |
| २) कलम ४३ ब मधील बाबी | ७६,०६,४२,१९६ | - | ७६,०६,४२,१९६ |
| ३) रजा रोखीकरण | ३,२३,२०,०२५ | ९,९५,९१,३१३ | १३,१९,११,३३८ |
| ४) कलम १४९ नुसार अमान्य | - | ३४,८४,३८१ | ३४,८४,३८१ |
| एकूण | १,८३,२३,९२,८६८ | ९,४६,५१,९१५ | १,९२,७०,४४,७८३ |
| आरंभाच्या स्थगित कर | | | |
| दायित्वाच्या उलट | - | १६,२९,६५,०१३ | १६,२९,६५,०१३ |
| स्थगित कर दायित्वे / मत्ता निव्वळ | ७,१७,०४,६०,५८० | ८७,१७,०५,२१८ | ८,०४,२१,६५,७९८ |

## ५(एच) संयुक्त साहस उपक्रमातील प्रवर्तन (लेखा मानक २७)

जयगड पॉवर ट्रान्स्को लि.(जे पी टी एल) हा कंपनी (२६ टक्के) व जे (एस डब्ल्यू) एनर्जी लि. (७४ टक्के) यांच्यातील संयुक्त साहस उपक्रम दि.२३ एप्रिल २००८ रोजी संघटीत झाला व त्याला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १४ नुसार पारेषण परवाना दि.८ फेब्रुवारी २००९ प्रदान केला.

संयुक्त नियंत्रणाखाली असलेल्या ४०० केव्ही क्षमतेची डायरेक्ट करंट जयगड-कराड पारेषण लाईन स्थापित करणे हे या कंपनीचे उद्दिष्ट आहे. सध्या या प्रकल्पाचे काम चालू असून त्यावरील वाणिज्यक प्रवर्तन सुरु व्हायचे असल्याने सदर जे.पी.टी.एल. कंपनीने नफा व तोटा लेखा तयार केलेला नाही.

वित्तीय वर्ष २००८-०९ ने महापारेषण कंपनीने जे.पी.टी.एल कंपनीचे १,५२,१७,६७० या संस्थेचे समभाग संपादन करण्यासाठी एकूण ₹१५,२१,७६,७०० भरले. पुढे वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये कंपनीने ₹१५,०५,२४,१४० एवढी रक्कम आणखी १५०५२४२४ जे पा टी एल चे समभाग घेण्यासाठी भरले.

या संयुक्त उपक्रमात कंपनीचे हितसंबंध दीर्घकालीन गुंतवणूक स्वरुपाचे आहेत आणि ते खर्च वजा तात्कालिक व्यतिरिक्त अन्य घट अशा प्रकारच्या गुंतवणूकीचे मूल्य नमूद केली जाते.

सदर संयुक्त साहस कंपनी भारतामध्ये संघटीत केली आहे. दि ३१ मार्च २०११ रोजा असलेल्या या कंपनीची मत्ता व दायित्वे व या तारखेला लेखा परिक्षित केलेल्या वित्तीय विवरणपत्राच्या आधारे उत्पन्न व खर्च खाली दिले आहेत.

| तपशील | ३१-०३-११<br>₹ | ३१-०३-१०<br>₹ |
|---|---|---|
| १. मत्ता | | |
| दिर्घ मुदतीची मत्ता | १,२५,४३,९७,७२० | १०४२७०४९४६ |
| चालू मत्ता | १२,३६,६६,२०६ | १०४०६३७६६ |
| एकूण | १३७८०६३९२६ | ११४६७६८७१२ |
| २. दायित्वे | | |
| दिर्घ मुदतीचे दायित्वे | ८४२४२६००० | ५६६८००००० |
| चालू दायित्वे आणि तरतुदी | १७९७८३२९९ | ३९०३८२७४४ |
| एकूण | १०२२२०९२९९ | ९५७१८२७४४ |
| ३ आकस्मिक दायित्वे | निरंक | निरंक |
| ४ भांडवली बांधिलकी | १२,४०,००,००० | २६६५००००० |
| ५ उत्पन्न | ५७४४०८७६ | निरंक |
| ६ खर्च | ५८२२८४९३ | निरंक |

**५ आय) मत्ता कमी करणे (लेखा मानक -२८)**

लेखा मानक १८ 'मत्ता कमी करणे' यानुसार कंपनीच्या पारेषण कार्याच्या मत्तेचे रोकड निर्मिती करणाऱ्या घटक नुसार मूल्यमापन एका बाह्य संख्येच्या कडून वर्ष २००६ - ०७ मध्ये करण्यात आले होते. त्यातून मिळणारी रक्कम चालू रकमेपेक्षा जास्त असल्याने कोणतीही मत्ता कमी करण्यास योग्य अशी नव्हती. चालू वर्षी मत्तेपासून मिळणाऱ्या रकमेचा पून: अंदाज करावा व तो कमी करावी असे काहीही निदर्शनास आले नाही.

**६ इतर टिपा :**

**६ अ)** किरकोळ ऋणकोंच्या शिल्लक रकमा, कर्जे व अग्रीमे या जर काही कायम करणे व मेळ घालणे असल्यास. त्याच्या अधिन आहेत.

**६ ब)** मंडळाच्या मते चालू मत्ता, कर्जे व अग्रीमे ही जर सर्वसाधारण व्यवसाय काळात वसूल केल्यास त्या त्यांच्या अंदाजे मूल्या प्रमाणे तसेच चांगल्या व वसूली योग्य व जर लेख्यामधे अन्य काही नमूद केलेले नसेल तर त्या मर्यादेपर्यंत आहेत.

**६क)** मागील वर्षातील आकडेवारीचे वित्तीय विवरणपत्राच्या योग्य त्या सादरीकरणासाठी आवश्यक तेथे पुनर्गटीकरण केले आहे.

आमच्या सोबत जोडलेल्या अहवालानुसार
**शहा आणि टापडिया**
सनदी लेखापाल
(सभासद क्र. १०९४६३ डब्ल्यु.)
रमेशचद्र जोशी
भागीदार
सभासद क्र. ३३५९४
ठिकाण : मुंबई
दिनांक : ०३/०९/२०११

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित करीता**

सही/-
**प्रताप मोहिते**
संचालक (वित्त)

सही/-
**अरविंद सिंह**
अध्यक्ष आणि
व्यवस्थापकीय संचालक

सही/-
**डॉ. ज्योती अरोरा**
कंपनी सचिव

# ताळेबंदाचा सारांश आणि कंपनीच्या सर्वसाधारण व्यवसायाची रुपरेखा

(कंपनी अधिनियम १९५६ च्या भाग ४ व अनुसूची २ नुसार)

**१. नोंदणीचा तपशील**

नोंदणी क्र. यु ४०१०९ एमएच २००५ पीएलसी १५३६४६ — राज्य संकेत: १ १

ताळेबंदाची तारीख: ३ १ | ० ३ | २ ० १ १ (दिवस / महीना / वर्ष)

**२. या वर्षामध्ये उभारलेले भांडवल**

| | | | |
|---|---|---|---|
| सार्वजनिक समभाग विक्री | लागूनाही | हक्काचे समभाग | लागूनाही |
| अधिलाभांश समभाग | लागूनाही | खाजगी संस्था | लागूनाही |

**३. निधी प्राप्ती / वापर यांची स्थिती (रक्कम ₹ हजारात)**

| | |
|---|---|
| एकूण दायित्व | एकूण मत्ता |
| १०१५८९१०५ | १०१५८९१०५ |

**निधीचा स्त्रोत**

| | |
|---|---|
| भरणा झालेले भांडवल | राखीव आणि अधिक्य |
| * ५०० | 7148945 |
| सुरक्षीत कर्जे | असुरक्षित कर्जे |
| ५८३९६४१० | १०४११६३ |
| स्थगित कर देयी | |
| ८०४२१६५ | |

**निधीचा वापर**

| | |
|---|---|
| नक्त स्थिर मत्ता | गुंतवणूकी |
| ११४६९९६३५२ | ३०२७०० |
| नक्त चालू मत्ता | किरकोळ खर्च |
| (-) १३४१५४०५ | ५४५७ |
| संचित तोटा | |
| निरंक | |

**४. कंपनीचा व्यवहार (रक्कम ₹ हजारात)**

| | |
|---|---|
| उलाढाल ** | एकूण खर्च |
| २१४८२२९६ | १६२८०४२० |
| नफा /तोटा कर भरण्यापूर्वी (+ ✓) | नफा / तोटा करोत्तर (+ ✓) |
| ५४३११२७ | ३२९३४११ |
| प्रतिसमभाग उत्पन्न रुपये | लाभांश दर (%) |
| ६५८६८ | निरंक |

**इतर समाविष्ट उत्पन्न

(कृपया नफ्यासाठी + व नुकसानासाठी वजा (–) अशी खूण करा)

५. तीन प्रमुख उत्पादने मालाचे वर्णन प्रमाणानुसार

बाब संहिता क्र.: निरंक

उत्पादनाचे वर्णन:

विद्युत पारेषण करणे

पारेषण सुविधा विकसित करणे

पारेषण विषयक सल्लागार

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितसाठी**

| | | |
|---|---|---|
| सही/– | सही/– | सही/– |
| **डॉ. ज्योती अरोरा** | **प्रताप मोहिते** | **अरविंद सिंह** |
| कंपनी सचिव | संचालक (वित्त) | अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक |